## ९) आजचे विज्ञान :-

स्वामी चिन्मयानंद हे उच्चविद्या विभुषित होते. विज्ञानाचाही त्यांचा अभ्यास दांडगा होता. त्यामुळेच अध्यात्म आणि विज्ञान ह्याच्या संकल्पना व ह्यातील भेद त्यांनी प्रभावीपणे मांडला आहे. त्यांनी आपल्या विवेचनात बऱ्याच ठिकाणी ह्या बाबींचा उल्लेख केलेला आपणास आढळतो. शाखांतील विज्ञान शाखातील ज्ञानास ते खरे ज्ञान मानत नाही. ते म्हणतात "आपल्याला ज्ञात असलेल्या वेगवेगळ्या विज्ञान शाखात निरनिराळ्या शास्त्रज्ञांनी प्राप्त करुन दिलेले सर्व प्रकारचे ज्ञान हे वास्तविक खरे ज्ञानच नव्हे कारण त्यातील प्रत्येक ज्ञान हे सर्व मर्यादित व औपरोधिक ज्ञान आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, ज्योतिषशास्त्र, गणितशास्त्र ह्यापैकी कोणत्याही शास्त्राचे ज्ञान वस्तुत: ज्ञानस्वरुप नाही तर ते कशांतना कशाचे ज्ञान असते. ज्याच्या प्रकाशात बाकी सर्व प्रकारचे ज्ञान जाणले जाऊ शकते ते खरे ज्ञान होय. शास्त्र व गुरु ह्यांच्याकडून मिळालेली आत्मस्वरुपाची इतर वस्तुची माहिती म्हणजे ज्ञान आणि विज्ञान म्हणजे माहिती करुन घेतलेल्या अशा सत्याची साक्षात अनुभूती होय.'' अर्थात आधुनिक संदर्भात आपण ज्याला विज्ञान म्हणतो ते विषय खऱ्या अर्थाने "विज्ञान ह्या विषयांतर्गत येत नाही''. ज्ञान विज्ञानाबाबत अनेक मते प्रगट केली आहेत. आधुनिक विज्ञानाच्या मर्यादा त्यांनी लक्षात आणून दिल्या आहेत. विज्ञान आणि ज्ञान ह्यातील फरक स्पष्ट करतांना ध्यान आणि जीवन या पुस्तकात ते म्हणतात, "विविध प्रकारच्या अमर्याद वस्तुमात्रांचा आणि सजीव प्राण्यांचा शोध लावल्यानंतर आणि त्याचे यथार्थ ज्ञान प्राप्त झाल्यानंतर प्रगत झालेल्या विज्ञानाने आपली दृष्टी संशोधनासाठी वस्तुच्या मुलभूत घटकाकडे वळविली. आठव्या शतकात शास्त्रज्ञांना हा शोध लागला की, मुलद्रव्याचे परिमाण "ॲटम'' (परमाणु) असून ह्या जगात सर्वसाधारणपणे नव्याण्णऊ विविध प्रकारची मूलद्रव्ये अस्तित्वात असावीत. विसाव्या शतकात ह्या ॲटमचे सुध्दा आणखी विभाग करणे शक्य आहे, असा शोध लागला आणि वस्तुचे अंतीम स्वरुप हे दुसरे-तिसरे काही नसून शक्तीच आहे, असे लक्षात आले. ज्या प्रमाणात विज्ञान ह्या जगातील वस्तुमागाचे मूलस्वरुप आणि त्याचे व्यवहार यांचे अन्वेषण करण्याचा प्रयत्न करीत आहे त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानही काळाच्या सुरुवातीपासूनच मानवाच्या अंतर्जगतातील घडामोडींचे तसेच त्यातील त्याच्या वर्तनाचे अन्वेषण करण्याची धडपड करीत आहे. म्हणून तत्त्वज्ञांनी हे केवळ दिवास्वप्नात रमणारे लोक आहेत किंवा वाया

गेलेले कवी आहेत किंवा काल्पनिक आदर्श आहे, असे म्हणणे म्हणजे तत्त्वज्ञानाबद्दल हे आपले अज्ञान उघडपणे आहे. तत्त्वज्ञानी लोक शास्त्रज्ञांइतकेच आपल्या ज्ञानाची व्याप्ती वाढविण्याचा झटून प्रयत्न करीत आहेत. तत्त्वज्ञानाची दृष्टी ही शास्त्रज्ञांइतकीच उदात्त दिव्य असते. दोघेही मानवाला अकािधिक सुख प्राप्त करुन देण्याकरिता धडपडत आहेत. तत्त्वज्ञानी आणि शास्त्रज्ञ ह्यामध्ये फरक इतकाच आहे की, दोघांचे अन्वेषणाचे क्षेत्र भिन्न आहे. विज्ञान व तत्त्वज्ञान ह्यामध्ये मुलभूत फरक हा पुढीलप्रमाणे आहे. अध्यात्म मार्ग व्यक्तिच्या पूर्णत्वातून समष्टीचे पूर्णत्व घडवून आणू पाहतो. विज्ञान हे प्राय: आपल्या सभोवतालच्या जगातील वस्तुमात्र आणि त्यांचे आकृतीबंध ह्याचे पुनर्समायोजन आणि पुनर्आखणी करुन सुख मिळवून देण्याची आशा बाळगते. याउलट धर्म आपल्या आध्यात्मिक मुलाशय समाजातील वैयक्तिक व्यक्तिमत्वाचे पुनर्समायोजन करुन आणि त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रियेत तेच उद्दिष्ट साधण्याचा प्रयत्न करतो. विज्ञान आपल्या अन्वेषणात मुख्यत्वे करुन बहिर्मुख असते आणि आपल्या जीवनात बाह्य जगतापासून सौख्याची प्राप्ती करुन घेता येईल, असा विश्वास बाळगते. तत्त्वज्ञान आपल्या अन्वेषणात प्राधान्यकरुन अंतर्मुख असते. म्हणून सहाजिकच तत्त्वज्ञान विषयक अन्वेषणात आणि आध्यात्मिक प्रयत्नात या संबंधीचा जोर हा आवश्यक रित्या मानवी व्यक्तिमत्वे त्याची घडण, त्याचे व्यक्तिगत सामुहिक आचरण ह्या घटकावर असायला हवा. गीता अध्याय ११ च्या विवेचनात गुरुदेवांनी विश्वामधील अनेकत्वामधील एकत्वाकडे पाहण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन विषद केलेला आहे. ते म्हणतात, ''अस्तित्वात असलेल्या सर्व पदार्थांचे वर्गीकरण करण्याचा रसायनशास्त्राच्या पध्दतीत वस्तु जेव्हा प्रयोगशाळेतील टेबलावर आणल्या जातात तेव्हा असे आढळून येते की, त्या सर्व संख्येने ९२ मुलद्रव्यापासून बनलेल्या आहेत. मुलद्रव्यामधील अणुचे स्वरुप दुसरे काही नसून इलेक्ट्रान, प्रोटॉन व न्युट्रॉन आहे, असे लक्षात येते. तेव्हा मुलद्रव्याच्या ज्ञानाची जागा लवकरच हे नवीन ज्ञान घेते ज्याला हे तीन ट्रान्स माहीत आहेत.'' अशा एखाद्या शास्त्रज्ञाला त्याच्या ज्ञानावर या अनेकविध पदार्थाकडे पहावयाचे झाल्यास प्रत्येक अणुमधील ह्या तीन घटकाकडे हे सर्व पदार्थ आहेत असे पाहणे त्याच्या दृष्टीने सोपे होईल किंबहूना आता जगामध्ये ही तीनच मुलद्रव्ये आहेत अर्थात वस्तुमधील विविधतेत एकता पाहण्याची ही वैज्ञानिक पध्दतीची संकल्पना आहे. पुढे जाऊन ह्याच अध्यायाच्या विवेचनात त्यांनी वैज्ञानिक निर्मितीचे अध्यात्मिक अधिष्ठानही व्यक्त केले

आहे. ते म्हणतात, ''सर्व ठिकाणी आपल्या सर्व कृतीमध्ये जेव्हा आपण आपल्या प्रत्येक कृतीचे विश्लेषण करतो तेव्हा आपल्याला असे दिसून येईल की, निसर्गाने जे पुरविले व त्या अदृष्य शक्तीने जे आपल्यासाठी प्राप्त केले त्याच्या तुलनेने त्या सर्वांमधील आपला प्रत्यक्ष वाटा अगदीच अत्यल्प असतो. त्या आधीच अस्तित्वात आहेत त्यागोष्टी एकत्र मिसळणे आणि त्याचे स्वत:चे नैसर्गिक गुणधर्म व लक्षणे ह्यावरुन काही फलनिष्पत्ती करणे आणि मग आपण काही तरी नवीन निर्माण केले आहे अशी प्रौढी मिळविणे एवढे जास्तीत जास्त आपण करु शकतो. रेडिओ, विमान, मोठा आवाज करणारी इंजिने, नाजुक यंत्रसामग्री, अद्भूत औषधे थोडक्यात संपूर्ण साहसी आधुनिक जग (Brave New World) आणि प्रगतीमधील त्याच्या सर्व सिध्दी ही सर्व म्हणजे दुसरेतिसरे काही नसून त्या परमेश्वराच्या ज्याने लोखंड, आकाश, हवा याची त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मासह व्यवस्था लावून दिली व आपल्याला उपलब्ध करुन दिली त्याच्याच अंगावर बसून चालविलेला मुलांचा खेळ आहे. त्या विना कोणतीच फलप्राप्ती कधीच शक्य नाही आणि प्राप्ती होणे म्हणजे देखील परमेश्वराने दिलेला ह्याच गोष्टीचा सुबुध्दपणे समन्वय करणे व पुनर्समन्वय साधने ह्याशिवाय दुसरे काहीही नसते.

मानवाने आज विलक्षण वैज्ञानिक प्रगती केली आहे पण जोपर्यंत मानव सदाचारी असेल तोपर्यंतच विज्ञानातील सिध्दी मानवास वरदानदायी ठरते. पण मानवाचा विवेक सुटतो आणि जीवनाच्या सर्व नैतिक आणि सदाचार विषयक गुणांचा तो उपमर्द करतो तेव्हा तो मानवजातीला विनाशाच्या मार्गाकडे आपले ज्ञान उपयोगात आणतो.

विज्ञानाला अनेक मर्यादा आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर विज्ञानाकडे नाही. ह्या संदर्भात गुरुदेव गीता अध्याय १५ व्या विवेचनात म्हणतात, ''आधुनिक प्रायोगिक विज्ञानाला विशेषत: जीवशास्त्राला जेव्हा त्या शास्त्राचे अज्ञान वा त्याच्या क्षेत्राच्या मर्यादा मान्य कराव्या लागतात. तेव्हा त्याला पुष्कळदा काही शब्दांचा व वाक्यांशाचा आधार घ्यावा लागतो. उदा. ते शास्त्रज्ञ संपूर्ण रक्ताभिसरण संस्थेचे वर्णन आणि असा निष्कर्ष काढतील की हृदय म्हणजे रक्त खेचणारा आहे. ज्याविना धमन्यातून व शिरातून रक्त सळाळले असते पण आम्ही जर विचारले की हृदयाला रक्तप्रवाह खेचण्याची शक्ती कोण देतो अशावेळी ते हृदयाच्या आतील पडद्याच्या स्नायुच्या अनैच्छिक किंवा अशा वरकरणी समाधानकारक वाक्याचा शब्दप्रयोगाचा शिताफीने

आश्रय घेऊन ह्याचे उत्तर देतील. विचारवंतांच्या दृष्टीने हे मुळीच नव्हे या उपरही तो विचारील की ह्या अनैच्छिक क्रियांचे नियमन कोण करतो?'' तर विज्ञानाजवळ ह्या प्रश्नाचे उत्तर नाही ही विज्ञानाची मर्यादा आहे.

आधुनिक विज्ञानाची आणखी मर्यादा म्हणजे आधुनिक विज्ञान अमूर्त बाबीवर संशोधन करण्यास धजावत नाही. उदा. प्राणाचे उगम स्थान कोणते? ह्या प्रश्नावर विज्ञानात संशोधन झालेले नाही. गुरुदेव प्रश्नोपनिषदाच्या विवेचनात म्हणतात की, आईनस्टाईन आणि न्युटन ह्यांनी ह्या प्रश्नामध्ये डोकावण्याचा प्रयत्नही कधी केला नाही. आधुनिक विज्ञान प्राणाच्या सीमेपर्यंत पोहोचताच स्वत:स कृतकृत्य झाल्याचे समजते आणि ते आणखी पुढे विचारणा करण्यास किंवा प्रेरक शक्तीच्या उगमाचा शोध घेण्यास अजूनही धजावले नाही. तत्वज्ञानात ह्याच प्रश्नाने संशोधनाचा प्रारंभ होतो.

## १०) तत्वज्ञानातील काही संज्ञा :-

स्वामी चिन्मयानंद हे अद्वैतवादाचा वेदांताचा पुरस्कार करणारे तत्वज्ञ होते. त्यांनी आपल्या भाष्यात अनेक वेदांतिक संकल्पना ह्या सर्वसामान्य माणसाला समजतील अशा रितीने मांडल्या आहेत. गंगोत्री प्लॅन जेव्हा गुरुदेवांनी बनविला त्याच्या मागील विचार हाच होता की, ज्ञानाची गंगा ही सर्वसामान्यांपर्यंत नेणे. वेदांताचे ज्ञानाचा प्रचार व प्रसार सर्वसामान्यांमध्ये करणे ह्या महत्वाच्या उद्देशास अनुसरुन गुरुदेवांनी आपली तत्वमिमांसा, ज्ञानमिमांसा व मूल्यमिमांसा केली आहे. त्यांनी वेदांतातील सर्व संकल्पना अतिशय सोप्या भाषेत मांडल्या. त्यातील काही निवडक संज्ञाचा उहापोह ह्या प्रकरणात करण्यात आला आहे.

### १) सत्य :-

सत्य ते की ज्यात कसलाही बदल होत नाही. भूत, वर्तमान व भविष्य ह्या तीनही काळात त्यांचे अस्तित्व असते त्याला सत् म्हणतात.

### २) असत्य :-

जे आधी नव्हते व जे नंतरही असणार नाही पण जे वर्तमान काळात

असल्यासारखे भासते ते असत्य होय. जे आधीच, नंतर अस्तित्वात असत नाही ते निश्चित मधल्या काळातही अस्तित्वात असू शकत नाही.

### ३) **अंतिमसत्य** :-

आपल्या मधील असंख्य परिवर्तनामध्ये जणु अपरिवर्तनशील असे काही आहे की जे आपल्या जीवनातील स्पष्ट अनुभवांना माळेतील मण्याप्रमाणे एकत्र धरुन ठेवते. आपल्यातील स्वरुपा शिवाय शुध्द चैतन्य स्वरुपाशिवाय दुसरे काहीही असणे शक्य नाही. आपल्या जाणीवेत येणारे अनुभव हे काही आपल्या आत्मस्वरुपाचा कोणताही भाग असू शकत नाही.

### ४) **आत्मतत्व** :-

आत्मा हा नित्य सर्वदा असणारा असल्यामुळे शरीराप्रमाणे जन्मत नाही. समुद्रात लाटा उत्पन्न होतात आणि नाश पावतात पण लाटेचा जन्म होतांना समुद्राचा जन्म होत नाही. तसेच लाट नाहीशी होतांना समुद्राचा मृत्यु होत नाही. ज्या अर्थी तेथे जन्म नाही त्या अर्थी मृत्युही नाही. ज्या वस्तुंना आदी असतो त्यांना अंत असू शकतो. उसळणाऱ्या लाटांना विरुन जाण्याचे दु:ख होऊ शकेल. शिवाय ज्याप्रमाणे आधी अस्तित्वात नसणारे बालक जन्माला येते त्याप्रमाणे शरीर जन्मल्यामुळे आत्म्याचा नाश होते असे होत नाही. आत्मा आज व नित्य आहे. अस्तित्व वाढ आणि क्षय इ. विकास आत्मस्वरुपात नाही. शरीर मारले तरी आत्मस्वरुप मारले जात नाही.

### ५) **जीवन** :-

जीवन म्हणजे स्वभावत: जन्ममृत्युचा प्रवाह असेल तर असा अटळ व अपरिहार्य गोष्टीबद्दल कोणत्याही बुध्दीमान मनुष्याने शोक करणे उचित नाही. उन्हाळ्याच्या दिवसात उन्हात उभे राहून उष्म्याची व प्रखर निरोपीची तक्रार करणारा व त्याबाबत शोक करणारा खरोखरच मूर्ख असला पाहिजे. त्याचप्रमाणे जन्माला आल्यानंतर जीवन जगण्यास जीवनाच्या स्वभावाविरुध्द तक्रार करणे ही अक्षम्य भ्रांती आहे.

## ६) मृत्यु :-

प्रसंगानुसार मनुष्य ज्याप्रमाणे आपले कपडे बदलतो त्याप्रमाणेच जीवभावही एक शरीर टाकून देतो व पुढील जरुर ते अनुभव घेण्यात दुसरे सोयिस्कर असे शरीर धारण करतो. आपणच वापरलेली जुनी झालेली वस्त्रे वापरतांना कोणालाही दु:ख होऊ शकणार नाही. त्यातूनही नवीन कपडे घालण्यासाठी जुने उतरावयाचे असतील तर ते मुळीच दु:खदायक होणार नाही. त्याचप्रमाणे मन व बुध्दीच्या उपकरणाच्या जेव्हा असे आढळून येते की उत्क्रांतीच्या मागे त्यांच्या वाटेवर त्याला पुढे घेऊन जातील असे अनुभव घेण्यास दिलेले सध्याचे शरीर आता असमर्थ आहे तेव्हा ते जीर्ण झाले आहे असे त्याला वाटू लागते. शरीराची ही जीर्णावस्था त्याच्या वयावरुन ठरवावयाची नसते किंवा त्याच्या शारीरिक स्थितीवरुनही नाही.

## ७) शांती :-

शांतीमध्ये सर्व सुख दु:खे नाहीशी होतात. शांत मन हे सुखाचे लक्षण आहे. शांती म्हणजेच सुख व सुख म्हणजेच शांती. कमीतकमी विक्षिप्त असलेले मन हीच उत्कृष्ट दु:ख विरोधाची खुण आहे. दु:ख विरोधक आहे. मन शांत नसेल तर स्वत:ची सांस्कृतिक प्रगती करुन घेण्यास बुध्दीला फुरसद मिळणार नाही. शिवाय अजाणतेपणी मनुष्य ज्याची इच्छा करीत असतो ती आंतरिक शक्तीही त्याला मिळणार नाही. मन:शांती नसेल तर आयुष्यात येणाऱ्या अडचणींवर बुध्दी शांतपणे विचार करु शकणार नाही.

## ८) देव :-

ह्या संकल्पनेवरील गुरुदेवांचे भाष्य म्हणजे पारंपारिक संकल्पनेला धक्का लावणारे भाष्य आहे. देवता म्हणजे दिलेल्या कार्य क्षेत्रातील ती संभाव्य उच्चारण क्षमता असते. जेव्हा एखाद्या परिस्थितीत आपण आपले खरे व प्रामाणिक प्रयत्न कामाला लावतो तेव्हा ते प्रयत्न व आपला त्याग जणुकाही त्या कार्यक्षेत्रातील संभाव्य उत्पादन क्षमतेला एकप्रकारे आवाहन करीत असतात. ज्या योगे ती क्षमता प्रत्यक्षात फल रुपाने व्यक्त होऊन त्या कष्ट करणाऱ्यावर अनुग्रह करते. आधुनिक जगात भारतमाता किंवा ब्रिटानीया असे शब्द प्रयोग आपण करतो. त्यामागील अर्थ समजाऊन घेण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करतो तेव्हा हे अधिकच सहजपणे स्पष्ट होते.

## ९) आत्मतत्व :-

आत्मा हा जाणीवेच्या तीनही अवस्थांचा साक्षी म्हणून राहत असल्याने तो खचित पंचकोशाहून वेगळा असतो. आत्मा हा एकाही कोषाशी तादात्म्य साधत नाही. त्याला एकाही कोषाच्या मर्यादा पडत नाही. आत्मतत्व ह्याहून भिन्न असते. माझ्यातील ज्या शक्तीमुळे मी जागृत स्वप्न आणि सुषुप्ती अवस्थेतील अनुभव सतत जाणू शकतो. त्या शक्तीलाच आत्मतत्व म्हणतात. ह्या शक्तीमुळे आंतर उपकरणाची जाणीव मानवाला होते. आत्मतत्वाच्या दृष्टिकोनातून माझ्यातील सर्व आंतर उपकरणे ही माझ्या ज्ञानाचे विषय होत. माझ्यातील वृत्तीचीही मला जाण असते. मनोविक्षेपाचा भाव व अभाव ह्याचीही जाणीव मला असते. आत्मिक सारतत्व म्हणून जे प्राप्त करुन घ्यायचे असते ते महान जाणीव तत्व होय. जे ज्ञानेद्रियांना प्रकाश पुरविते पण जे ह्यापैकी एकाही उपकरणांनी जाणले जात नाही ज्याच्यामुळे हे सर्व व्यापले जाते. परंतु दुसरे काही त्याला व्यापू शकत नाही, ते सर्वव्यापक असते. सर्व व्यापकता हा सूक्ष्मतेचा गुणधर्म आहे. माझे नेत्र श्रोत्र ह्यांना पाहण्याची, ऐकण्याची शक्ती केवळ चैतन्यतत्वामुळेच प्राप्त होते. जाणीवतत्व केवळ एकमेकांशी ढवळाढवळ न करता कार्य करीत राहतात. जाणीव तत्वाची उपस्थिती नसती तर त्याच्यापैकी कुणालाही कार्य करता आले नसते. ज्याप्रमाणे जग सुर्याच्या प्रकाशावर अवलंबून राहून कार्यरत असते. त्याचप्रमाणे शरीर, ज्ञानेंद्रीये, मन आणि बुध्दी ही आत्मचैतन्याच्या शक्तीवर आणि जीवन दायित्वावर अवलंबून राहून काय करतात. आत्मा हा निरंतर आनंदस्वरुप आहे. सर्वव्यापी असणारा आत्मा एकमेवाद्वितीय असून तो अस्तित्वस्वरुप आहे. तो नेहमी एकरुप असतो. आत्मा हा अंतर्यामीच्या सर्व अनुभवाचा मन आणि बुध्दी ह्याच्या अवस्था सुख दु:खे ह्यांचा ज्ञाता असतो. आत्मा हा नित्य आहे त्याचा नाश होत नाही ते विकार पावत नाही. आत्मतत्व हे प्रकृती व विकार ह्याहून भिन्न आहे.

## १०) जगत :-

जगत म्हणजे संपूर्ण विश्व हा अर्थ म्हणजे अत्यंत असमाधानकारक भाषांतर आहे. कारण त्यामुळे सामान्यपणे त्या संज्ञेचा संपूर्ण सुचितार्थ समजून घेण्यात आपण अयशस्वी होऊ. आपल्या शब्दसंग्रहातील विश्व ही संज्ञा सूर्य, ग्रह, तारे आणि पृथ्वी व त्यातील गोचर वस्तु

व प्राणीमात्रांसह असलेल्या स्थूल जगताचे केवळ निर्देशन करते. परंतु संस्कृतमधील जगत् ही संज्ञा इंग्रजीतील विश्व ह्या संज्ञेपेक्षा कितीतरी व्यापक आहे. तत्वज्ञानात्मक उपयोगानुसार जगत म्हणजे स्थुल शरीर म्हणून, संवेदन क्षम प्राणी म्हणून, बुध्दीमान व्यक्तिमत्व म्हणून मनुष्य ज्याचा अनुभव घेण्यास समर्थ आहे अशा अनुभवांची सर्व क्षेत्रे होत. ह्याचा अर्थ असा होईल की, जगत् हा शब्द माझ्या ज्ञानेंद्रीयांना ज्ञात झालेलं जगत, भावना, संवेदना ह्याची गोळाबेरीज होय. 'जगती इति जगता', अशी जगताची परिभाषा करण्यात येते. जे सतत परिवर्तनशील आहे ते जगत् म्हणून स्थलकाळाने मर्यादित झालेले संपूर्ण चराचर विश्व की ज्याचे ज्ञानेंद्रीय मन व बुध्दीला आकलन होते. त्याला सामावून घेणाऱ्या संज्ञेस जगत् असे समजून घ्यावयाचे आहे. "जीवन ज्योत" ह्या पुस्तकात जगताबाबत पुढील व्यापक विवेचन केले आहे. जग म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आत्मनिष्ठ आणि विचारांचा प्रत्यक्ष दिसणारा बाह्य आविष्कार होय. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या आंतरिक उपकरणाच्या माध्यमातून जगाकडे पहात असते. त्या उपकरणाने कल्पना केलेले दृष्य त्यास प्राप्त होते. अशाप्रकारे ते जग व्यक्तीच्या आंतरिक उपकरणांनी जशी कल्पना केली असेल त्यानुसार वेगवेगळे भिन्न दृष्य निर्माण करतात. उदा. शास्त्रज्ञाला हे जग म्हणजे ज्ञात आणि अज्ञात अगर भव्य अद्‌भुततेचे महान शक्तीचे आणि अव्यक्त सामर्थ्याचे क्षेत्र वाटते तर कवीला निसर्गाचा सौंदर्य विस्तार वाटते. नैराश्यवादी व्यक्तीला हे जग दु:खातिरेकाने भरले आहे असे वाटते. म्हणजेच प्रत्येकाने दिलेल्या ह्या प्रतिक्रिया त्यांच्या आंतरिक उपकरणाच्या रचनेवर अवलंबून असतात आणि म्हणूनच जगाची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. व्यक्तीगत दृष्टिकोनानुसार त्याचे स्वरुप बदलते म्हणून ह्या आंतरिक उपकरणाची पुनर्रचना करुन ते सुसंस्कारित करणे आवश्यक आहे आणि म्हणूनच ज्याने आपल्या मनावर नियंत्रण मिळविले त्यानेच जगावर नियंत्रण मिळविले. (World control through self control) पण एवढे असूनही मानव हा बहिर्मुखी आहे. ह्याबाबत गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे. महान सिध्दीचे हे अद्‌भूत युग आहे. समृध्दी आणि उत्कर्ष ह्यात मानव डुबला आहे पण त्याच्या जीवनात शांतता नाही. कारण त्याची आंतरिक जडणघडण हीच त्याच्या त्रासाला कारणीभूत आहे. तात्पर्य जगत म्हणजे आपण समजतो तसे केवळ बाह्य जग नाही. जग म्हणजे शारीरिक, मानसिक व बौध्दिक ह्या निरनिराळ्या प्रकारच्या उपकरणांच्या द्वारा तीन अवस्थांमध्ये जागृत स्वप्न

सुषुप्ती ह्यात व्यक्तीने अनुभवलेले एकूण अनुभव होय. थोडक्यात जगत म्हणजे उपभोगासाठी ज्ञानेंद्रीयाद्वारे रुप गंधारी म्हणून जाणल्या जाणाऱ्या मनाद्वरे संवेदना व भावना म्हणून अनुभवल्या जाणाऱ्या आणि बुध्दीद्वारे कल्पना व विचारधारा म्हणून आचरणात आणल्या जाणाऱ्या वस्तु विषयाच्या जगाचा अंतर्भाव होतो. व्यापक अर्थाने पाहिल्यावर स्थूल, सूक्ष्म व कारण शरीराद्वारे मिळविलेले एकूण अनुभव म्हणजे जगत होय.

## ११) ब्रह्मचर्य :-

ह्या शब्दाबाबत आजही अनेक अपसमज व गैरसमजत प्रचलीत आहेत. ब्रह्मचर्य म्हणजे केवळ कौमार्य राखण्याचे व्रत मानले जाते. पण ब्रह्मचर्य ह्या शब्दात खूप मोठा आशय दडला आहे. गुरुदेवांनी काही जवळपास आठ असे वैषेयिक कर्म सांगितले आहे की, ज्याचा त्याग केल्यास मानवाने ब्रह्मर्य पाळले आहे असे मानता येईल.

१) भिन्न लिंगी व्यक्तीबाबत वाईट हेतूने विचार करणे, २) त्यांच्याविषयी बोलणे, ३) त्यांच्याशी क्रिडा करणे, ४) त्यांच्याकडे कामुक दृष्टीने पाहणे, ५) एकांतात त्यांच्याशी बोलणे, ६) त्याच्याविषयी अभिलाषा बाळगणे, ७) त्यांच्या प्राप्तीसाठी धडपड करणे, ८) त्यांचा उपभोग घेणे.

वरील आठ बाबी ह्या ब्रह्मचर्याकरिता निषिध्द मानण्यात आल्या आहेत. ब्रह्मचर्य म्हणजे आपल्या विषयोपभोगाच्या संदर्भात आत्मसंयमाने जीवन जगणे होय. विषयोपभोगाचा संपूर्ण त्याग असा त्यांचा अर्थ होत नाही. वस्तु जगत हे आपल्या उपभोगासाठीच असते. त्याचा उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य धर्म सांगत नाही. आपल्या उपभोगाचे आपण स्वामी असावे त्यांना आपल्यावर वर्चस्व गाजवू देऊ नये. जगाचा उपभोग घ्या पण जगाला तुमचा उपभोग घेऊ देऊ नका. अन्न खा पण अन्नाला तुम्हाला खाऊ देऊ नका.

## १२) संन्यास :-

प.पू. गुरुदेव हे स्वत: सन्यासी होते. त्यांनी सन्यास ह्या शब्दाचा अर्थ असा सांगितला की, ''सन्यास म्हणजे केवळ शारीरिक पलायनवाद नव्हे तर अविवेकी निर्बुध्द अशा

अनात्मवस्तूपासून मानसिक निवृत्ती होय. ती एक मानसिक अवस्था आहे. ते काही बाह्य प्रतिक नाही. म्हणून जो आत्मनिग्रही आहे ज्याने आपल्या सर्व इंद्रियवासना पूर्णपणे नियंत्रणाखाली आणल्या आहेत आणि ज्याने आपल्या अहंकार कोंडीत आणीत कामनाप्रेरित कर्माचा त्याग केला आहे तोच आपल्या अंतरंगातून बाहेर येणारा आनंद, समाधान शांती ह्याचा अनामिक आनंद अनुभवतो व जगतो.

## १३) मेधा :-

पठण करण्याची अचार शक्ती म्हणजे मेधा नव्हे. लांबलचक महाकाव्य पाठ करण्याचे खुळ इंग्लंडमध्ये एकेकाळी होते. मिल्टनचे पॅराडाईज लॉस्ट हे काव्य किंवा शेक्सपिअरचे संपूर्ण नाटक अनेकजण पाठ म्हणून दाखवत पण अशा प्रकारचे यांत्रिक पध्दतीने केलेले स्मरण म्हणजे मेधा नव्हे. घटना घडतेवेळीच तिला अभ्यासकाने तिव्रतेने दिलेला प्रतिसाद की जो त्यानंतर विनासायास स्मृती व अनुभव पातळीवर उद्‌भूत होतो. त्याला मेधा म्हणतात.

## १४) निर्वाण :-

निर्वाण ह्या शब्दाचा अर्थ विझणे असा आहे. मेणबत्तीची ज्योत बाह्यता स्थिर एकसंघ पूर्ण दिसत असली तरी ती अतिवेगाने बाहेर पडणाऱ्या आणि स्वतंत्रपणे लुकलुकणाऱ्या प्रकाशज्योतीची बनलेली असते. जेव्हा पंखा अतिवेगाने फिरत असतो तेव्हा त्याची पाती वेगवेगळी अलग अशी दिसत नसतात तर एक सतत गरगर फिरणारी गती मात्र नजरेत भरते. चल चित्रपट हा पडद्यावर फेकलेल्या अनेक चित्रांचा बनलेला असतो आणि बदलणाऱ्या चित्रांच्या अतिवेगामुळे एक सातत्यपूर्ण चलचित्रांचा अनुभव प्रत्ययाला येतो. ह्याच पध्दतीने मेणबत्तीच्या ज्योतीचा एकसंधपणा लक्षात येतो. मानवाचे मन जे फार महत्वाचे वाटते ते विचार तंत्राच्या गतीमानतेमुळे निर्माण झालेले असते. ज्याने आत्मप्राप्ती करुन घेतली आहे आणि जो मनाच्या अतीत झाला आहे. त्याच्या बाबतीत विचारांचा उठाव त्यानंतर थांबलेलाच असतो. आत्मसाक्षात्काराच्या ह्या स्थितीचे वर्णन निर्वाण ह्या संज्ञेने केले जाते.

## १५) बुध्दी :-

बुध्दीमध्ये वेळोवेळी फरक पडतो. आपल्या कल्पना व आदर्श हे सतत बदलत

असतात. बुध्दी ही स्वत: जड आहे. जेव्हा जाणीव तत्वाचा प्रकाश बुध्दीस स्पर्श करतो त्यातून खेळत असतो तेव्हाच तो सचेतन होतो. विचार तक्र विवेक करण्याकरिता आणि निर्णय घेण्याकरिता ती व्यक्तीमधून प्रकाशते. प्रत्येक बुध्दीला मर्यादा असतात. प्रत्येक जण आपआपल्या क्षेत्रात मोठा असला तरी इतर क्षेत्रात तो असेलच असे नाही. आपणास आपल्या बुध्दीशक्ती माहित असतात. मी मूढ आहे बुध्दीमान आहे हे आपणास माहित असते. बुध्दी हा जाणीवतेचा वस्तुविषय असतो. बुध्दी जागृतावस्थेत उपलब्ध असते. स्वप्नात आपल्या विकृतावस्थेने ती गुलामासारखी वागते. गाढ निद्रेत ती काम करीत नाही.

## १६) योग :-

योग या शब्दाचा आशय अतिशय समर्पक शब्दात गुरुदेवांनी स्पष्ट केला आहे ते म्हणतात, "योग म्हणजे प्रत्येक दु:खाच्या संयोगापासून वियोगाची अवस्था. योग ह्या संज्ञेचा अर्थ संपक्र. आज आहे त्या स्थितीत मानवाचा संबंध त्याच्या अपूर्णावस्थेमुळे जगातील फक्त अनिष्ठ गोष्टीशीच येत असतो. म्हणूनच तो जीवनात अनिष्ट आनंदाची भर घालीत असतो. मानवाच्या शरीर, मन व बुध्दी ह्या उपकरणाच्याद्वारे जगातील सर्व वस्तुशी संबंध येतो. सुखाची समाप्ती ही दु:खाची सुरुवात असते. म्हणून जड प्रकृतीच्या उपकरणाद्वारे उपभोगले जाणारे जीवन म्हणजे दु:ख योगच आहे व या योगापासून वियोग म्हणजे विषयवस्तूचे क्षेत्र व त्याच्या अनुभवापासून स्वत:ला बाजूला करण्याची प्रक्रिया होय.'' इंद्रीयजन्य ज्ञान भावना व विचार ह्यांच्या यंत्रणेपासून स्वत:ला पूर्णपणे अलिप्त करुन घेणे हाच दु:ख योगापासून संपूर्ण वियोग होय. मनाचे अस्तित्व हे त्याच्या संगामुळे सिध्द होते. कशाला कशाला तरी जोडून ठेवल्याशिवाय मन कधीच अस्तित्वात राहू शकत नाही. एका वस्तुपासून जर त्याला अलग व्हायचे असेल तर दुसऱ्या कशाशी तरी ते स्वत:ला जोडून घेईल. मिथ्या वस्तुपासून होणाऱ्या दु:खापासून मनाला अलग होण्यासाठी त्याला स्वत:ला सत्य स्वरुपाच्या आनंदाशी जोडून घेतले पाहिजे. ह्या दृष्टीने खरा योग म्हणजे सत्याचा शोध घेणे व त्याच्याशी टिकणारी आसक्ती प्रस्थापित करणे. ही बाब तेव्हाच शक्य आहे जेव्हा व्यक्ती दु:खाकडे जाणारी आपली बहिर्मुखी वृत्ती थांबवेल व स्वत:मधील जे सत्य व निष्ठ आहे त्याच्याकडे जाण्यासाठी बुध्दीपुरस्सर बरोबर पलटी मारेल. मिथ्यापासून यशस्वी वियोगाद्वारे योग साधला जातो. ज्याच्यामध्ये

एकाग्रतेच्या अभ्यासाने मन स्वत: पूर्णपणे सयंमीत करुन घेते, अशी स्थिती प्राप्त होणे हे योगाचे ध्येय आहे. योगातील सर्व साधना म्हणजेच आपल्यातील विचारप्रवाहाची निर्मिती त्याची गुणवत्ता त्याची संख्या आणि त्याचे स्वरुप संयमित करण्यास ज्यायोगे मन शिकेल असे व्यक्तीने आपल्या मनाला असंख्य विक्षेपापासून निवृत्त केली जाते व बुध्दी जेव्हा परिपूर्ण तत्वाच्या अनंत स्वरुपावरील तिच्या सहज चिंतनाने स्थित होते तेव्हा वृध्दींगत होणारी ती आंतरिक ज्योत होय.

## १७) मानवी देहाची दुर्लभता :-

तत्वज्ञानात एकवाक्य नेहमी वापरात येते ते म्हणजे नयनरण्य दुर्लभ आहे. पण ते कसे ह्याचे विवेचन गुरुदेवांनी जीवशास्त्राच्या आधारे दिले आहे. ते पुढीलप्रमाणे, ''अनिश्चित सूक्ष्म म्हणून अभिव्यक्त झालेल्या जीवाला प्रथम अश्मजीवनात अनिश्चित दीर्घकाळपर्यंत थांबावे लागते. शेवटी ऊन आणि पाऊस ह्यांच्या सूक्ष्म रुपातील निसर्गाच्या बदलांचा आकस्मिक लोंढा त्या फत्तराचे सूक्ष्म कणात चूर्ण करतो. पुढे कण म्हणून त्याला जवळून जाणारे वृक्षाचे एखादे मुळ त्यातून रस शोषून घेण्यासाठी मिठी मारेपर्यंत लाखो वर्ष थांबावे लागते. त्यानंतर तो कण झाडाचे एखादे पान किंवा साल खोडाचा कुठला तरी भाग किंवा छोटासा देठ किंवा पाकळी होत असेल मग तेथून गळून पडून उत्क्रांतीची शिडी चढून जाण्यास कोट्यावधी वर्ष होत असेल समजा तो मग झाडाचे फळ झाले तर ते फळ गळून पडण्याचा आणि मातीशी एकरुप होण्याचा संभव शंभरात एकदाच राहील. पुन्हा एखाद्या प्राण्याने ते फळ खाण्यास त्यातून त्या प्राण्याच्या धडाचा काही भाग निर्माण होईल आणि शेवटी पुन्हा त्याच्या प्राण्याच्या मुखातील घास घेण्यास त्याला किती वेळ थांबावे लागेल. उलट्या सुलट्या फिरणाऱ्या संभवाचे ह्या भाग्य परिवर्तनात ते फळ एखाद्या गाईकडून खाल्ले जाणे त्याचे तिच्या दुधात रुपांतर होते हा संभव खरोखर दुर्मिळ कोणत्या ना कोणत्या कारणामुळे पुन्हा ते दुध वासराच्या तोंडी न लागता विक्रीसाठी गोळा केलेले ते दुध होईल आणि पुन्हा ते पाळीव मांजराच्या तोंडात न पडता प्रत्यक्ष एखाद्या पिल्लाच्या मुखात पडेल आणि तेथे पुन्हा ते त्याच्या धडाचा भाग बनू शकेल. समजा त्या पिलाने प्यायलेल्या दुधाच्या पेल्यात उपस्थित असलेला तो नशीबवान जीव पुन्हा त्याच्या शरीरात प्रत्यक्षपणे बीज बनला आणि फुकट

जाणाऱ्या हजारो बीजातून हा सुंडवी बीजकण एखाद्या सुजाण आणि चांगल्या स्त्रीच्या गर्भाशयात प्रवेश मिळवू शकला तर मग तो शेवटी निरोगी आणि शुध्द कर्तबगार मनबुध्दीचा मानवीदेह धारण करु शकेल. मानव प्रथम जीवाणू असतो. प्रत्येक जण स्वत:मध्ये बीज म्हणून जगतो. प्रत्येक जण आपल्या स्वत:मध्ये स्वत:चे पोषण करीत असतो. म्हणूनच बीज म्हणजेच दुसरे तिसरे काही नसून स्वत:चे छोटे रुप असते. जेव्हा ते पुन्हा उत्पादक बीज म्हणून जननेंद्रीयात विक्षेपीत होते तेव्हा मानवाचे स्वत:मधून प्रगटीकरण होत असते. वैयक्तिक जीवाचा पहिला जन्म म्हणजे तो बीज म्हणून बाहेर येतो व गर्भाशयात ठेवला जातो. म्हणून आपल्या पत्नीच्या गर्भाशयात जेव्हा पती पुंबीज सांडतो तेव्हाच त्याचा तो पुनर्जन्म असतो. मातेच्या गर्भाशयाप्रत आलेले पुंबीज तिचे हृदय यकृत यासारख्या अवयव इतके निगडीत होते व तिने पचन केलेल्या अन्नाच्या सहाय्याने ती आपल्या पतीच्या सारतत्वाचे भरणपोषण करीत असते. त्याचप्रमाणे ती आपल्या विचारांच्या संस्कार क्षमतेने त्याचे मानसिकरित्याही पोषण करीत असते. हिंदुनी आपल्या विवाहाचे हे पावित्र्य ओळखण्याचा हा पाया आहे. विवाह हा ज्यात शरीरसंबंध कर्मातून शुध्द चर्मस्पर्शाच्या योगे उद्‌भवते अशा विषय सुखाकरिता पुरुषचर्माने स्त्री चर्माशी केलेला करार नव्हे. फ्रॉईडप्रणीत मनोविज्ञानांतर्गत लैंगिक मूर्खपणावर पोसलेले आजच्या काळाचे धर्मनिरपेक्ष युग विवाह पावित्र्याच्या विनाशकारी अज्ञानामुळे आपल्या सगळ्या कौटुंबिक सुखाची आणि सामाजिक व राष्ट्रीय मिलाफाची आत्मविनाशकारी थडगी तयार करीत आहेत.

## १८) विवाह :-

हिंदुच्या दृष्टीने विवाह म्हणजे प्रेमाच्या छत्राखाली सत्यतत्व आणि दिव्यत्व यांच्या साक्षीने बांधलेली ती पवित्र गाठ होय. त्यांचे नाते हे दोन व्यक्तिंनी रस्त्याच्या कोपऱ्यावर बसलेल्या कारकुनाच्या टेबलावर कायदेशीर वेश्यावृत्तीचा एक भाग ह्या स्वरुपात केलेला करार नसतो किंवा दुसऱ्या रस्त्यावरील निराळ्या टेबलावर एकमेकांच्या समंतीने करु शकतात. अशा तऱ्हेच्या भ्रामक युक्तीवादाच्या वर आधारलेले जगत हळुहळु पशुजीवनाच्या स्तरापर्यंत येऊन पोहोचते. अनैतिक मानवाची अशा प्रकारची पिढी कुटुंब नियोजनाच्या कितीही योजना आखल्या तरी बेछुटपणे वाढत जाते आणि तीव्र विषयवासना असणारी पिढी

जन्माला घालते आणि बेजबाबदारपणे व अत्यंत निष्ठुरपणे रस्त्यावर सोडून देते.

## १८) कर्मसिध्दांत :-

कृतीशील अध्यात्मिकता हा स्वामी चिन्मयानंदांच्या विचाराचा गाभा आहे. त्यांनी बालकांना, युवकांना कृतिप्रवणतेला प्रोत्साहन दिले आणि म्हणुनच त्यांची 'कर्म' ह्या संकल्पनेच्या संदर्भात असणारी मते महत्त्वाची ठरतात. गीता अध्याय आठव्याचे विवेचन करीत असतांना त्यांनी कर्माची परिभाषा सांगितली व कर्माचा संबंध सृजनशीलतेशी जोडला. ते म्हणतात, "ज्या सृजनशक्तीमुळे सचेतन व अचेतन जग अस्तित्वात येते त्याला कर्म म्हणतात". कर्म म्हणजे व्यवहारातील नुसती उलाढाल नव्हे. उलाढाल जी परिश्रमाने होऊ शकते. कर्म ह्या संज्ञेचा अर्थ अधिक सखोल अधिक सूक्ष्म अधिक दिव्य आहे. प्रत्येक माणसाच्या क्रियाशील बुध्दीमध्ये जी सृजनतेची उर्मी असते तिची अचेतन व सचेतन ह्याच्या निर्मितीमध्ये पूर्णता होते. ह्या सूक्ष्म अध्यात्मिक शक्तीला कर्म म्हणतात. ह्या कर्माचे मानसशास्त्रही गुरुदेवांनी गीता अध्याय कर्म चवथ्या मध्ये वर्णन केली आहे. ते म्हणतात, "जेव्हा आपण एखादे काम करित असू तेव्हा आपली कुवत, शक्ती कर्मफलाबद्दल वाटणाऱ्या चिंतेमुळे कार्याशी असणारी मानसिक पूर्वमग्नता व भावनिक भय ह्यावर वाया घालवू नये. जीवनाचा मार्ग आपले काम चांगल्या रितीने करणे, पार पाडणे, जगणे व जगण्यातील आनंद मिळविणे ह्यासाठी आपल्या ठिकाणी असलेल्या नैसर्गिक शक्तीचा वापर योग्य बुध्दीने कसा करावा ह्यासाठी अधिक समर्थ साधन पुरवितो. जो मनुष्य अशा प्रकारे जीवन जगतो आणि आपले कर्म दक्षतापूर्वक करतो तो हाती घेतलेल्या कामात इतका एकाग्र होऊन जातो व त्याच्या अंतस्फुर्तीच्या आनंदात इतका तल्लीन होऊन जातो की कर्मामुळे ह्याच्या मनावर कसलीही प्रतिक्रिया उमटत नाही. आपल्या मन बुध्दीला उदात्त व दिव्य विचारांचा आधार दिला नाही तर ती नकळत येणाऱ्या संभाव्य अडचणी व संकटे ह्याच्या काळजीमुळे ह्याकडे धावतील.

निष्काम कर्ममार्ग अनुसरण्यास मानवाच्या व्यक्तिमत्वाला झळाळी प्राप्त होते. बाहेरील जगात आपले हातपाय काम करित असतांना त्यात आपले मन व बुध्दी ही रस घेऊ लागतील तेव्हाच त्या कर्मामुळे आपल्या व्यक्तिमत्वावरील ओंगळ सुरकुत्या सरळ होतील. आपल्या आंतरिक व्यक्तिमत्वास निकोपता व उत्साहाची झळाळी चढेल पण ह्या व्यक्तिमत्व

विकासात हे आत्मविकसनाच्या संकल्पनेशी गुरुदेवांनी निगडीत केले आहे व आत्मविकसनाचा मार्ग हा कर्मयोगातून जातो असे ते म्हणतात. गीता तत्वज्ञानाने प्रतिपादीलेला कर्मसिध्दांत व कर्मयोग ह्यावर त्यांची अढळ श्रध्दा होती. कर्मयोगातून आत्मविकसन ही संकल्पना मांडतांना ते म्हणतात, "जो कर्मयोगात स्थित झाला आहे त्याची बुध्दी शुध्द होते. सूक्ष्म शरीरात घडून येणारी कोणतीही शुध्दता म्हणजे आंतरिक शांततेची अधिक चांगली अवस्था होय. वेदांताच्या दृष्टीने आपल्यातील इच्छा किंवा भावनाकडून जितके कमी विक्षेप आपल्या ठिकाणी होत असतील तितक्या अधिक प्रमाणात आंतरिक दृष्ट्या आपण शुध्द असतो. स्वार्थ निरपेक्ष व फल चिंतारहीत कर्माद्वारे साधक अस्तित्वात असलेल्या वासना संपवितो. जेव्हा हे आंतरिक उपकरण त्याच्या वासना लहरीपासून झाडून स्वच्छ केले जाते तेव्हा ते निश्चित अधिकाधिक स्वच्छ व शांत होऊ लागते. अशा व्यक्तीचे भावनिक जीवन आपोआप समतोल होते. कर्मयोगाने व्यक्तिला शारीरिक, मानसिक व बौध्दिक स्तरावर आंतरिक शांतता मिळते. मानव त्या अनंत शाश्वत तत्वाचा प्रतिनिधी म्हणून जर कर्म करणार असेल तर त्याला स्वत:च्या ठिकाणचे संभाव्य सामर्थ्य जे आजच्या घडीला स्वत:च्या सिमीत अहंकाराकडून चुकीने वाया घालविले व उघडले जात आहे ते अधिक परिणामकारकतेने पुन्हा शोधले पाहिजे. कर्मयोगाचा व आत्मिक मनाचा हा सहसंबंध मानवी व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. अशा कर्मयोगाच्या आचरणाने मानवाचा सर्वात मोठा लाभ कोणता होत असेल तर तो म्हणजे त्याच्या अंत:करणात शांतता निर्माण होते. गुरुदेव म्हणतात, "कर्मयोगी आपल्यातील आंतरिक स्थितप्रज्ञतेतून प्रगटलेली अवर्णनीय शांती अनुभवतो. शांती ही कोणत्याही आर्थिक परिस्थितीत निर्माण केलेली परिस्थिती नव्हे किंवा एखाद्या शासन व्यवस्थेतून निर्माण होणारी नव्हे. ती आंतरराष्ट्रीय संस्थाकडून किंवा विधीमंडळाकडून प्रस्थापिली जात नाही. ज्यावेळी व्यक्तीचे आंतरिक विश्व अशांत विचाराच्या भयंकर वादळाने विक्षेपीत झाले नसते तेव्हाची ती मानसिक अवस्था असते. शांती म्हणजे अखंड आनंदाची अवस्था. यज्ञभावनेने अंगीकारलेल्या निस्वार्थी कर्माने शांती मिळविणे शक्य आहे हा क्रांतीकारक विचार ह्या ठिकाणी आहे. कर्मातून ज्या मानव शांतीची अवस्था प्राप्त करुन घेऊ शकतो. जीवनाबाबत सकारात्मक दृष्टिकोन त्याचा ह्या कर्मातून निर्माण होतो. जीवन ही कधीच नकारात्मक नसते, निष्क्रीय नसते. मानवी मनाच्या अभिव्यक्तीतून मानवाची जीवनाबाबत सकारात्मकता अथवा नकारात्मकता निर्माण

होते. गुरुदेव म्हणतात, ''जीवन सदैव सक्रीय व सकारात्मक आहे. जीवन कधीच निष्क्रीय व नकारात्मक रहात नाही. जीवनही कर्माच्या रुपात गतिशीलतेची अभिव्यक्ती आहे. जीवंत असतांना माणूस एक क्षणही बिना कर्माचा राहू शकत नाही. मानवाचे बाह्य कर्म हे त्यांच्या आंतरिक जीवनाची अभिव्यक्ती आहे. कर्मापासून दूर पडणे म्हणजे जीवनापासून दूर पडणे होय'', हे सांगत असतांना गुरुदेव संदेश देतात. ''जीवनातील उतारचढावांचा सामना करा। सक्रीय रुपात उद्योगशील व्हा!'' असा संदेश गुरुदेवांनी दिला आहे. निष्काम कर्मातून श्रमप्रतिष्ठा मूल्य जपण्याचा संदेशही आपल्या विचारामधून गुरुदेवांनी दिला आहे. ते म्हणतात ''श्रमाची प्रतिष्ठा सेवेत आहे. समर्पित आणि उदात्त कर्मच केवळ पशुमानवाला कडक शिस्त आणि खऱ्या संस्कृतीच्या वैभवाला नेण्या इतपत उजाळा देऊ शकते. माणूस आळसात रममाण होण्यासाठी जन्माला आलेला नाही. माणूस म्हणून जन्माला आल्यानंतर एखादी व्यक्ती किंवा समाज किंवा राष्ट्र जर ध्यानपूर्ण जीवन किंवा सतत आणि पराकाष्ठेचे कर्ममय जीवन जगणार नसेल तर तो आत्मघातकीच समजला पाहीजे. अशा राष्ट्राचे अध:पतन होते. समाज जर उच्च जीवन मूल्ये आचरण्यास तयार नसेल तर तो जर आपल्या स्वत:च्या भौतिक कार्यक्रमात कार्यक्षम नसेल तर असा समाज शारीरिक आणि मानसिक ह्या दोन्ही दृष्टीनी हळुहळु अवनत होणारच आणि तो रानटी अतिरेक्याचे जीवन जगणारच. त्यानंतर त्याच्या वाट्याला येते ते पशुचे तत्वज्ञान. त्यानंतरची त्याची तल्लीनता म्हणजे केवळ कमीतकमी श्रमाने अर्थ संपादन करण्याची भरपूर संधी साधणे, जास्तीत जास्त आळशीपणा आणि अनंतकाळचे स्वास्थ्य उपभोगणे, आपल्या मुलाबाळांसंबंधी कोणतीही काळजी न वाहता तारतम्यरहीत प्रजोत्पादन करणे हीच होय. एखाद्या समाजाच्या अस्तित्वाची स्थिती अशा प्रकारची जर होईल तर इतिहासाच्या भाषेत जणु काही आत्माच हरवून बसलेला समाज म्हणून त्या समाजाची गणना केली जाईल आणि तो समाज केवळ काळ योगाच्या दु:खासाठी घाईघाईने बडबड, गोंधळ करणाऱ्या संस्कृतीची स्वत:साठी मागणी करेल जर एखादी व्यक्ती स्वत:ची प्रगती करणारे आणि धारणा करणारे जीवनातील उच्च मूल्यांशी सूर लावलेले व नेमून दिलेले उदात्त कर्म हाती घेण्याचे नाकारत असेल तर तिने जागृकतेने आणि दक्षतेने कर्तव्यकर्म केलेल्या आणि हक्काची मागणी केलेल्या जीवनाचा पाठपुरावा करुन सततच्या आणि थकवा आणणाऱ्या कामाचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे जर एखादी व्यक्ती वर सांगितलेल्या ह्या दोन्हीकरिता

योग्य नसेल व तयार नसेल तर त्या माणसाची गणना एक मृत, जड आणि निरुपयोगी अकर्मात बुडालेली, मनुष्याच्या रुपात वावरणारी, परंतु वस्तुत: किळसवाणा लंगडा असा केवळ जड मानव म्हणून केली जावी.'' कोणते कर्म करावे ह्याबाबत गुरुदेवांनी मार्गदर्शन केले आहे. वेदांत तत्वज्ञानाने सांगितलेले चार प्रकारच्या कर्माचा पुरस्कार त्यांनी केला आहे. शिवाय ह्याला त्यांनी सामाजिक आशय दिला आहे. 'कर्म कोणते करावे' ह्या लेखात ते म्हणतात, ''मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. आपण एकटे रहात नाही समाजात राहतो म्हणून आपली स्वत:साठी जशी कर्तव्ये आहेत तशीच कुटुंबासाठी इतर संबंधीतासाठी, जातीसाठी, देशासाठी व जगासाठीही काही कर्तव्ये आहेत. आपले कर्तव्य क्षेत्र खूप व्यापक आहे. प्रत्येकाने ही नियत कर्म प्रसन्नतेने अनासकीर्तीने व समर्पण भावनेने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे जितक्या अधिक प्रमाणात आपण करु शकू तितक्या अधिक प्रमाणात आपण आपल्या पूर्व संस्कारापासून दडपून टाकलेल्या वासनापासून व भावनिक बंधनातून मुक्त होऊ शकू. म्हणून त्यांनी युवकांना महत्वाचा संदेश दिला आहे. ''नियतं कुरु कर्मत्वम्'' अर्थात आपली नियतकर्मे पार पाडा. आपल्या वेळेचा अपव्यय करु नका, आळशी निष्क्रियतेपेक्षा कमी जीवन नक्कीच श्रेष्ठ आहे. लौकिक व वैयक्तिक समस्यांपासून पळ काढू नका, प्रतिकुल परिस्थिती आपल्या भयंकर राक्षसी छद्मी हास्याने आपल्याला खिजवण्याचा प्रयत्न करतात. पण तेथे लक्ष देऊ नका, स्वत:वर व आपल्या आदर्शावर पूर्ण श्रध्दा ठेवून परिश्रम करीत रहा. ह्या क्रिडेच्या शेवटी तुम्हाला असे जाणवेल की तुम्ही जिंकला असाल किंवा हरला असाल. तरी तुम्ही पूर्वीपेक्षा अधिक सुदृढ, सशक्त व सुस्वस्थ झाले आहात. कधीच घाबरु नका, अळखळू नका व प्रत्येक काम श्रेष्ठतेने करा. गुरुदेवांचा कर्माबाबतचा दृष्टिकोन हा Forward Approach आहे. मानव जोवर जीवंत आहे तोवर तो कर्माशिवाय राहूच शकत नाही. पण प्रश्न असा आहे की ही कर्म सुसंघटीत कशी करावी ह्या कर्माला वळण कसे लावायचे? त्यांना शिस्त कशी लावायची? कर्म ही समाजाभिमुख झाली पाहिजे तसेच ह्या कर्मापासून मानवाला सुख, समाधानही प्राप्त व्हायला हवे? ह्यालाच कार्यकौशल्य म्हणतात. ह्याबाबत गुरुदेवांनी मार्गदर्शन केले आहे. तीन प्रकारचे लोकांमधून तीन प्रकारचे कार्यक्षेत्र उद्‌भवतात.

## १) मजूर (श्रमजीवी) :-

जो बाहेरच्या जगात मजुरी करिता कर्म करतो. ही मजुरी त्याला आपले शरीर पोसण्यासाठी व बायका, मुले ह्यांना सुख देण्यासाठी हवी असते. हीच कल्पना देशातल्या थोर माणसास लागू पडेल तर तोही श्रमजीवी होय. राष्ट्राला अशा माणसाबद्दल आदर वाटत नाही. तो त्याला मिळणाऱ्या नफ्यासाठीच काम करतो. ह्यातून समाजाचे कल्याण व्हावे ही भावना नसते.

## २) कार्यकर्ता :-

कार्यकर्ता हा निव्वळ फायद्यासाठी किंवा निव्वळ मोबदल्यासाठी काम करीत नाही. कार्यकर्त्यासमोर आदर्श समाजाचे रुप असते. समाजरचनेचे ध्येय असते. हे वास्तवात आणण्याकरिता तो धडपडत असतो. कार्यकर्ता जे काम करतो ते निव्वळ स्वत:च्या फायद्याकरिता नाही.

## ३) कृतकृत्य :-

ह्या प्रकारातील लोक समाजात विरळे असतात. हे लोक आत्मतृप्तीसाठी कार्य करतात. अशी माणसे जगात काम करतात ते फायद्यासाठी नव्हे तर कृतकृत्यतेच्या भावनेने. युगाचा विचार न करता आणि आपण आपल्या हयातीत त्याला मान्यता मिळाली नाही याचाही विचार न करता ती कार्य करीत असतात. असे पूर्णत्वाला पोहोचलेले कृतकृत्य लोक असतात. जे काही करावयास हवे होते ते मी उत्कृष्ट केले आहे, असा स्वत:मधील गूढ आनंद अशा कृतकृत्य माणसाला हवा असतो. त्यास इतर मान्यता देतात किंवा नाही ह्याची त्यांना पर्वा नसते.

अर्थात जीवन जगणे आपल्यातून जास्तीत जास्त सुख मिळविणे आपल्याकरिता उत्कृष्ट अशी योजना कार्यवाहीत आणणे यासाठी प्रत्येकापुढे जीवनात एक उदात्त हेतू, ध्येय, स्फुर्तीदायक आदर्श असला पाहिजे आणि त्या आदर्शाकडे पहात त्यावर स्थिर दृष्टी ठेवून बाहेरच्या जगात काम केले पाहिजे. ह्यामुळे कामाला वळण मिळते. काम हेच त्याचे फळ

बनते. तो समाजाला उत्कृष्ट कार्य देतो व त्यामुळेच त्याचे मन अत्यानंदाने भरुन जाते.

कर्मामधील यज्ञ भावनेला गुरुदेवांनी प्राधान्य देऊन हे कर्म समाजाभिमुख कसे करावे ह्याबाबत त्याचा दृष्टिकोन हा अत्यंत सकारात्मक आहे. वास्तविक ''यज्ञ'' ह्या संकल्पनेकडे रुढार्थाने न पाहता त्यातील आशय महत्वाचा आहे. गुरुदेव म्हणतात, ''यज्ञ म्हणजे सर्वांच्या कल्याणार्थ समर्पण भावनेने व स्वार्थ त्यागपूर्ण अंगीकारलेले कोणतेही कर्म. अशा पध्दतीचे हे कर्म अहंकार पूर्ण असूच शकत नाही. आणि म्हणूनच ते मोक्षदायक असते. जेव्हा आपण यज्ञ म्हणजे याचा अर्थ कोणतेही सामाजिक जातीविषयक राष्ट्रीय किंवा वैयक्तिक कर्म, की ज्यात व्यक्ती हे सेवा व समर्पण भावनेने पुढे येऊन समाजातील लोक काम करतील तेव्हाच समाज आपल्या दारिद्रय व दु:खाच्या श्रृंखलातून स्वत:ला सोडवून घेऊ शकेल. ह्या जगात खरे जीवन शक्य आहे व राष्ट्रीय संस्कृती तेव्हाच तग धरु शकते की जेव्हा तिच्या पुत्राकडून आत्मसमर्पण भावनेने केलेल्या कर्माचे सतत पालन होते. हा यज्ञभाव आपणास सृष्टीत आढळतो. वरील सर्व विवेचनावरुन लक्षात येते की, जीवन म्हणजेच कर्म. जेथे कर्म संपते तेथे मृत्यु आलाच. क्रियाशील जीवनातच मानवाची प्रगती होऊ शकते. साठलेले पाण्याचे तळे खराब होते. त्यात लगेच कुजण्याची क्रिया सुरु होते पण नदीचे वाहते पाणी नेहमीच शुध्द स्वच्छ असल्याने उपयुक्त असते. जीवन हे चैतन्ययुक्त असल्यामुळे क्षणभरही त्याची क्रिया थांबत नाही. म्हणून कर्म हा जीवनाचा पाया आहे. मनुष्याने सर्व जन्मभर कार्यरत असले पाहिजे. कर्माचा सर्वकाळ अकर्माचा काळ मोडून आपले जीवन बनते. कर्म हे विधायक तसे विघातकही असते. कर्माचा काळ सृजनशील काळ आहे. व्यक्तीला उत्क्रांतीकडे नेणारे कर्म हे विधायक कर्म व जी कर्मे शास्त्रांनी निषिध्द आहेत ती विघातक कर्म होय. कर्माचे मूल्यांकन त्यांच्या दर्शनी स्वरुपावरुन न ठरविता त्या कर्माच्या मागील हेतूचा विचार करुनच केले पाहिजे. एखाद्याचा हेतू वासना शुध्द व विधायक असेल तर त्याचे कर्मही उदात्त होते. कोणतेही सामान्य कर्माचे रुपांतर हे समर्पित व उपासना स्वरुप कर्मात व्हायला हवे हा कर्मयोग आहे. कारण असेच कर्माने मनाची शुध्दता प्राप्त होते, बुध्दी शुध्द होते.

## ११) ज्ञानमिमांसा :—

Epistem ह्या मुळ ग्रीक शब्दापासून Epistemology हा शब्द तयार झाला आहे. Epistem याचा अर्थ Knowledge व logos याचा अर्थ शास्त्रशुध्द विवेचन आणि म्हणूनच ज्ञान मिमांसा म्हणजे ज्ञानाचे शास्त्रशुध्द विवेचन अशी परिभाषा आपणास करता येते. ह्यात प्रामुख्याने ज्ञानाचा स्त्रोत, ज्ञानाचा उगम, आधार इत्यादी बाबींचे विवेचन करण्यात येते.

प.पू. गुरुदेव हे अध्यात्मवादी व अद्वैत वादाचे पुरस्कर्ते आहे व त्यास अनुसरुन त्यांनी ज्ञानाची संकल्पना मांडली आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ही संकल्पना हा त्यांच्या ज्ञानमिमांसेचा गाभा आहे. ज्ञान म्हणजे आत्मतत्वाचा पुनर्शोध अशी त्यांनी ज्ञानाची परिभाषा केली आहे. ज्ञान हे अनुभवजन्य असते. ह्या गोष्टीवर त्यांनी विशेष भर दिला आहे. ॲसप्रीन शब्दाचा वारंवार उच्चार करुन डोळे दुखणाऱ्यांची डोकेदुखी वाढेल. औषधाचे सेवन करणे व ते आत्मसात करणे हा त्यावर उपाय आहे. त्याचप्रमाणे सत्यतत्व हे व्यक्तिगत आत्मसात करुन अपरोक्ष साक्षात्काराने त्याच्याशी तद्रुप होऊन उच्चतर संस्कृतीच्य दिव्य जीवनपध्दतीच्या सूक्ष्मतर आनंद स्थिती पर्यंत स्वत: उन्नत करण्याचा प्रयत्न न करता वेदातील मंगल सत्यत्वाचा निव्वळ पुनरुच्चार करणे व्यर्थ होय. आत्मतत्वाचा अपरोक्षानुभव म्हणजे ज्ञान होय. अशी ज्ञानाची परिभाषा ते करतात.

इंद्रीयापासून मानवाला ज्ञान प्राप्ती तेव्हाच होते जेव्हा त्यामागे मन हे कार्यरत असते. इंद्रीयाच्या मागे कार्य करणारे मन हे विषयाच्या ज्ञानप्राप्तीचे खरे साधन आहे. पण इंद्रीय विषयामध्ये स्वैर भटकणाऱ्या इंद्रियावर ज्याचा पूर्ण ताण असतो तोच हर्षोल्हासात आनंदात स्थित झालेला खरा ज्ञानी पुरुष होय. ज्ञानी मनुष्य ज्ञान चक्षुने जगाकडे पाहतो. इंद्रीय विषयाच्या संपर्कात येत असतांना सतत विषयामध्ये राहूनही आपली पातळी जो कायम राखतो तोच खरा परिपूर्ण ज्ञानी पुरुष होय. ह्या उलट अज्ञानी मनुष्य जग आहे तसे कधीच पहात नाही तो त्यात आपल्या मनाचे रंग मिसळतो. आपल्या मनाची अपूर्णता ही त्या वस्तुची अपूर्णता आहे, असे समजतो पण गुरुदेव म्हणतात. “आत्मज्ञानासारखे पवित्र ह्या जगात दुसरे काही नाही. ह्यासाठी त्यांनी अतिशय सुंदर उदाहरण दिले आहे ते म्हणतात. ज्याप्रमाणे पाण्यात बुडणाऱ्या माणसाला जीवन सुरक्षा पंख्याशिवाय दुसरे काहीही मोलाचे वाटत नाही

त्याप्रमाणे मोहात पडलेल्या मनुष्याला आपल्या खऱ्या स्वरुपाचे ज्ञान संपादन करणे ह्यापेक्षा अधिक श्रेष्ठ प्रयत्न व महान साध्य दुसरे काहीही नाही. आत्मज्ञान होणे ही मानवाच्या उत्क्रांतीची परिसीमा आहे. आपल्या अस्तित्वाचे सार्थक आहे.

ज्ञानाचे वर्गीकरण त्यांनी दोन प्रकारात केले आहे. १) अनुपाधिक ज्ञान, २) उपाधित ज्ञान आपण सामान्यपणे वस्तुमात्राच्या ज्ञानाचा अनुभव घेतो. या ठिकाणी ज्ञान हे ज्ञात वस्तुंनी उपाधीत झालेले असते. हे उपाधीत ज्ञान स्थलपरत्वे कालपरत्वे बदलत असते. कारण ज्या वस्तु शुध्द ज्ञानाने प्रकाशित होतात. त्या एकमेकांहून भिन्न असतात. निरपेक्ष ज्ञान हे आपल्या शुध्द स्वरुपात त्यांच्याकडून प्रकाशित करणे अशा निरपेक्ष ज्ञानाचे निर्देशन करीत असते. 'ज्ञानम' ह्या शब्दाने आपल्यातील जाणीवतत्व निर्देशीत केले जाते.

अद्वैतवादात ज्ञानाचे तीन उगम मानले आहेत. त्याचाच पुनरुच्चार गुरुदेवांनी केला आहे. ते तीन उगम -

१) प्रत्यक्ष अनुभव (प्रत्यक्ष प्रमाण)

२) शब्द प्रमाण (अनुमान-प्रमाण) संतवचने आगम

३) वेद वचने संतवचने (शास्त्र)

ज्ञान ग्रहाणाची जी प्रक्रिया आहे ती वेदांताचा आधार घेऊन समजावुन दिली आहे. गीता अध्याय २ मध्ये ह्या प्रक्रियेचा उल्लेख आपणास आढळतो. ह्यात असे नमूद करण्यात आले आहे की, "कोणत्याही विषयाचे ज्ञान हे ज्ञानेंद्रीयांनी होत नाही तर त्याच्या द्वारा होत असते." ज्ञानेंद्रीय ही अनुभव घेणाऱ्या जिवात्म्यास वेगवेगळ्या विषयवस्तुचे ज्ञान करुन देणारी उपकरणे आहेत. हाच जर ज्ञानेंद्रीयांच्या मार्फत विषयवस्तुशी संपर्क प्रस्थापित करीत नसेल तर वस्तु स्वत:हून कोणासही स्वत:चे ज्ञान करुन देऊ शकत नाही. एकाच वस्तुचे दोन वेगवेगळ्या व्यक्तिंना दोन वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव येऊ शकतात. वस्तु तीच असतांना अनुभव मात्र वेगवेगळे येत असतील तर हे उघड आहे की हा फरक व्यक्तिच्या मनोरचनेत असलेल्या फरकामुळे पडतो. शिवाय आयुष्यामध्ये अत्यंत प्रिय असणारी वस्तु काही काळाने तीतकीच अप्रिय होते. कारण जसजसा काळ बदलत जातो तसतशी व्यक्तीची मनोरचना बदलते. जोपर्यंत आपले मन ज्ञानेंद्रीयांच्या मार्फत बाह्य विषयवस्तुच्या संपर्कात येत नाही

तोपर्यंत त्या विषयवस्तुची संवेदना आपल्यापर्यंत पोहोचून तिचा अनुभव आपणास येणार नाही. पंच ज्ञानेंद्रीयांच्या उपकरणाच्या मधून चैतन्य शक्ती कार्य करीत असते आणि तिच्या प्रकाशातच आपल्याला बाह्य विषयवस्तुची जाणीव होते. ज्ञान करुन घेण्याची ही उपकरणे मग ती ज्ञानेंद्रीये असोत मन असो की बुध्दी असो रचना जड अचेतन आहेत आणि चैतन्य स्वरुपाकडून चेतना मिळाल्यानंतरच आपल्याला ज्ञान करुन देण्याची शक्ती त्यांना प्राप्त होते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या ज्ञानेंद्रीयामार्फत जेव्हा एखाद्या वस्तुचे आपणास इंद्रीयज्ञान होते तेव्हा ती गोष्ट व्यक्त आहे असे म्हटले जाते. जे ह्या पाच इंद्रीयांच्या पलीकडचे आहे त्याला अव्यक्त म्हणतात. वेदांतातील बाह्य पदार्थ ज्ञानाच्या सिध्दांतानुसार (Theory of perception) चैतन्ययुक्त मन अंत:करणाची वृत्ती पाच ज्ञानेंद्रीयाद्वारा विषयाकडे जाते. तेथेच वस्तुस व्यापून ह्या विषय वस्तुचा आकार घेणे व अशाप्रकारे मनाला त्या विषयवस्तुचे ज्ञान घेणे गुंतण्याचा प्रकाश चेहऱ्यावरील भागातील सात छिद्रांवाटे जणू बाहेर पडतो व एक विशिष्ट किरण एकच विशिष्ट विषय प्रकाशित करु शकतो. उदा. डोळ्यावाटे बाहेर पडणारा प्रकाश रंग व रुप प्रकाशित करु शकतो. कानावाटे पडणारा प्रकाश कळतो शब्द आवाज प्रकाशित करतो. याकरिता भौतिक जगातील विद्युत प्रकाशाचे उदाहरण आपल्याला घेता येईल. साध्या दिव्यातून येणारा प्रकाश खोलीतील वस्तु प्रकाशित करतो तर क्ष किरणातून निघालेला प्रकाश वस्तुच्या बाह्य आकाराल भेदून जातो व सर्वसाधारणपणे उघड्या डोळ्यांनी न दिसणाऱ्या गोष्टी प्रकाशित करतो. अशाप्रकारे प्रत्येक व्यक्तीमध्ये एकाच चैतन्याचे पाच किरण पंच ज्ञानेंद्रीयाद्वारा बाहेर जात असतात व आपणास बाह्य जगाचे संपूर्ण ज्ञान करुन देतात. ह्या पाच ज्ञान मार्गांनी बाह्य जगातील असंख्य संवेदना मनामध्ये येतात आणि जीवनात बाह्य जगाशी संपर्कात आल्यावर मनात जे असंख्य विक्षेप निर्माण होतात ते सर्व बाह्य जगातील ह्या असंख्य संवेदनामुळेच. मी जर आंधळा असेन तर एखादी सुंदर युवती जरी जवळून गेली तर ती माझो मन विचलीत करु शकणार नाही. मी बहिरा असेल तर माझ्या विरुध्द चाललेली टिका मी चोरुन ऐकू शकणार नाही व सहाजिकच त्यामुळे मी विक्षेपीत होऊ शकणार नाही. चव न घेतलेले वा स्पर्श न केलेले वा वास न घेतलेले इंद्रीयविषय कधीही मनात शिरुन दु:ख वा शोक निर्माण करु शकत नाही. जो मनुष्य अज्ञानी आहे तो जग आहे तसे कधीच पहात नाही. तो आपल्या मनाचे रंग त्यात मिसळतो व त्याच्या मनाची अपूर्णता ही त्या वस्तुचीच अपूर्णता आहे

असे तो समजू लागतो. आपण ज्याच्या माध्यमातून जगाकडे पाहतो ते माध्यम अपूर्ण असल्यामुळे आपल्याला जगही अपूर्ण आहे असे लक्षात येते. म्हणून ज्ञाननिष्ठेत पहिला होऊन जो आपली ज्ञानग्रहणाची कवाडे उघडतो व ज्ञानचक्षुने जगाकडे पाहतो तो खरा ज्ञानी पुरुष होय अर्थात.

ह्या Knowledge चे रुपांतर जो पर्यंत Wisdom मध्ये होत नाही. तोपर्यंत ज्ञान खऱ्या अर्थाने प्राप्त झाले आहे असे म्हणता येणार नाही. Conservation of knowledge ला त्यांनी प्राधान्य दिले आहे. जे ज्ञान व्यक्तीला प्राप्त झाले आहे त्याची योग्य जपणूक महत्वाची आहे. अध्यात्मिक साधनेच्या माध्यमातून हे ज्ञान विचारात व कृतीत उतरविता येते. Cultivation of mind is to be taken up hand in hand with the bringing of our knowledge into our personal intimate lives. Knowledge conservation ही संकल्पना मांडतांना ते म्हणतात "Bringing the water of our own knowledge conserved in our understanding into the plains of our mind and the heart is work of sadhana and the sadhak himself will have to weed out plough sow water and watch over the cutivation of his spiritual values in his life.

अशाप्रकारे ज्ञानमिमांसा आपणास आढळते.

## १२) पर्यावरण :-

आधुनिक युगात पर्यावरण ह्या शब्दाचे महत्व खूप वाढले आहे. अनेक पर्यावरण प्रेमी पर्यावरण वाचविण्याबाबत जगाला आवाहन करीत आहेत. याचना करीत आहेत. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरणाचा वाढता ऱ्हास. लोकसंख्येची वाढ झाली त्यामुळे मानवाने नैसर्गिक साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर केला. परिणामी पर्यावरणाच्या संदर्भात अनेक समस्या निर्माण झाल्यात. त्यात शिवाय यांत्रिकीकरणामुळे आधुनिक विज्ञानाचा वापर त्यामुळे आता जगाला तापमान वाढीचा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे. हा इशारा प.पू. गुरुदेवांनी १९९२ मध्येच दिला आहे. निसर्ग वाचवा पर्यावरण! एक आधुनिक वैचारिक गोंधळ

हे के. सी. कॉलेज हॉल मुंबई येथे २६ जुलै, १९९० रोजी दिलेले व्याख्यान आहे. ह्या व्याख्यानात ते म्हणतात, "निसर्गदेवता ही नेहमीच पवित्र असते, तिला आपणच आपल्या वागण्याने अशुध्द करतो. मानवानेच निसर्गाचा नाश चालवला आहे.'' निसर्गाला अशुध्द करण्यापासून थांबविणे आवश्यक आहे, असा इशाराही त्यांनी दिला व त्यासाठी त्यांनी जो उपाय सांगितला तो म्हणजे, गंगा शुध्द करण्यासाची आवश्यकता नाही पण आपण जर पाणी दुषित केले नाही व कुठलीही घाण त्यात सोडली नाही तर हिमालयावरुन खळाळत येणारं पाणी, गंगा काही दिवसातच शुध्द करील हाच नियम पर्यावरणासाठी लावला तर झाडे तोडलीच नाही तर वृक्ष लावा वृक्ष जगवा ही हाकाटीही द्यावी लागणार नाही. ह्यातूनच एका नव्या विज्ञान शास्त्राचा जन्म झाला व ते म्हणजे Ecology अर्थात पर्यावरण शाखा.

निसर्ग हा पवित्र असतो. पर्यावरणाला निसर्गाला नेहमीच तुम्हाला मदत करण्याची इच्छा असते. ही परिकल्पना प.पू. गुरुदेवांनी मांडली आहे. पर्यावरणावर जो आघात होतो आहे त्याचे महत्वाचे कारण हे औद्योगिकरण व औद्योगिकरणाबाबत विकसित व अविकसित देश ह्यांच्यातील स्पर्धा हे महत्वाचे आहे, असे त्यांना वाटते. ह्या औद्योगिकरणातून आपणच पर्यावरणाला असंतुलीत व दुषित करीत असतो आणि आपणच त्याबाबत तक्रार करतो अशीही खंत त्यांनी ह्या व्याख्यानात स्पष्ट केली आहे. ह्याबाबत त्यांनी रिओला येथील जागतिक परिषदेचा संदर्भ दिला आहे. त्या परिषदेतील घटना वर्णन करतांना ते म्हणतात, "ह्या परिषदेत बड्या राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना सल्ला दिला की प्रमाणाबाहेर औद्योगिकरण करु नका त्यामुळेच मानव आणि निसर्ग ह्याच्यात असमतोल निर्माण होतो आहे. याउलट अविकसित राष्ट्राचे म्हणणे असे आहे की, आम्ही श्रीमंत होण्यासाठी औद्योगिकरण चालूच ठेवणार.'' गुरुदेव म्हणतात, "निसर्ग नेहमीच पवित्र असतो. पर्यावरणाला, निसर्गाला नेहमीच तुम्हाला मदत सहाय्य करण्याची इच्छा असते. दुसऱ्या भाषेत सांगायचे झाल्यास निसर्गाचा मदतीचा हात सदैव पुढे असतो. पण त्याला भेटत नाही तो तुमच्या आमच्या मदतीचा हात. कारण तो वाईट वृत्तीत अडकला असतो.'' ह्या ठिकाणी गुरुदेवांनी वास्तविकतेचे अतिशय मार्मिकदर्शन घडविले आहे. गुरुदेवांनी पुढे मानवावरच आरोप केला आहे की, "आपण नैतिकतेच्या निती नियमाप्रमाणे वागण्याच्या गोष्टीकरता म्हणतो मानवाला खुल्या मनाने जगू द्या. त्याला बंधनात जखडू नका. पण अशा स्वैर वागण्यानं आपणच निसर्गाचा समतोल

बिघडवतोय हे आपल्या लक्षात येत नाही. अनिर्बंध हाव, स्वार्थी अप्पलपोटेपणा, त्याग न करण्याची प्रवृत्ती ही आपली जीवन मूल्य झाली आहेत आणि आपण समता वाद व अधिभौतिकवाद असे गोंडस नांव देऊन जगतो आहोत. याचा अर्थ असा निघतो की मी स्वत:च्या कायद्यासाठी जंगल तोडीन. फायदा मिळवीन, उद्याची फिकीर मी का करावी? मानसशास्त्राचा गुरुदेवांचा अभ्यास अतिशय दांडगा होता हे ह्यावरुन लक्षात येते. आज मानवाची वृक्षतोडीची वृत्ती झाली आहे. मानव वृक्षतोड करतो, त्याचे पैसे करतो व त्यावर उदरनिर्वाह करतो हा दोष मानवाचा आहे. मानवी जीवन मूल्यांचा आज ऱ्हास होत आहे आणि ही जीवनमूल्ये जेव्हढी ऱ्हास पावतील तेवढा पर्यावरणाचा ऱ्हास अटळ आहे. गुरुदेव म्हणतात, ''आपली जीवनमूल्ये जेवढी क्षुद्र असतील तेवढा आपण निसर्गाच्या स्वाभाविक चलनात विक्षेप आणणार आहोत. निसर्गाची सहन करण्याची क्षमता खरोखरच विलक्षण आहे. एखाद्या प्रेमळ मातेप्रमाणे ती तुमच्या सर्व चुकांवर पांघरुण घालते. पण कधी तरी तिलाही मुलांना शिक्षा केली पाहिजे असे वाटते आणि मग मात्र तिला थोपविणे कठिण असते. तीच जगावर भडकालीचे रुप घेऊन कोसळते. मग कुठल्या व्यक्तीचा, देशाचा विचार करीत नाही. गुरुदेवांच्या काळाची प्रचिती आज आपल्याला प्रकर्षाने येत आहे. पर्यावरणीय संकटाने जेव्हा आज मानवी जीवन धोक्यात आले आहे तेव्हा गुरुदेवांच्या ह्या वरील वाक्याची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. निसर्ग वाचवा, पर्यावरण प्रदुषित करु नका अशी ओरड म्हणजे गुरुदेवांच्या मते वैचारिक गोंधळ आहे. कारण निसर्गाच्या बारा प्रक्रियेतच नवनिर्मितीचे बीज असतं. पण ह्यासाठी मानवानी सर्वप्रथम स्वत: मध्येच सुधारणा घडवून आणण्याबाबत गुरुदेवांनी सल्ला दिला आहे. व्यक्तिगत सुधारणा केल्याशिवाय बाहेरील जग बदलत नाही. आपण उच्च जीवन मूल्यांची कास धरण्याचे सोडून दिले आहे. व्यक्ती फक्त व्यक्तिगत सुखासाठीच जगतो आहे ही खंत त्यांनी व्यक्त केली आणि म्हणूनच गुरुदेव म्हणतात, ''आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे, आपल्या मनाची भूमिका बदलली अर्थात तुम्ही बदलला नाही तर कुणीही तुमच्यावर जबरदस्ती करणार नाहीत. पण निसर्ग तुम्हाला जरुर धडा शिकविला. जेव्हा जेव्हा अतिरेक होतो तेव्हा तेव्हा परोपकारी निसर्ग आपल्याला तथास्तु म्हणतो.'' आणि म्हणूनच प्रत्येक मानवाने स्वत: मध्ये इष्ट तो बदल घडवून आणला पाहिजे. बाहेरचं जग बदलविण्यापेक्षा स्वत:त बदल घडविणे अधिक कठिण आहे. पर्यावरणाबाबत अध्यात्मिक दृष्टिकोन मांडतांना गुरुदेव म्हणतात, ''जग

म्हणजे तुम्हीच आहात आपण सर्व मिळून म्हणजे ह्या जगताचे विराट रुप होय. ह्यात फक्त मनुष्यप्राणीच समाविष्ट नाही तर त्यात वनस्पती पशु आणि मानव हे सर्व समाविष्ट आहेत''. हा त्यांचा सह अस्तित्वाबाबतचा दृष्टिकोन आहे. गुरुदेव म्हणतात, ''निसर्ग मानवाला जे देतो ते शुध्द आणि उत्कृष्ट स्वरुपातच देतो. मानवाची निर्बुध्द कृती ते दुषित करते.'' मानवाच्या प्रत्येक कृतीला आध्यात्मिक अधिष्ठान हवे. निसर्ग आपल्याच वागण्याचा प्रतिध्वनी करुन आपल्यालाच परत भेट देतो म्हणूनच त्याला Ecology म्हणतात. निसर्गावर प्रेम करायचे असेल तर माणुसकी, समाज ह्यावर प्रेम करावे लागेल आणि प्रेम करणं म्हणजे दुसऱ्यासाठी त्याग करायला तयार असणं आणि म्हणुनच पर्यावरण वाचवायचं असेल तर प्रथम मानवाला बदलावं लागेल. निसर्गाबद्दल आपली कृती ही वृत्तीही अधिक निरोगी व बुध्दीवर आधारित असायला हवी. पर्यावरणाबाबतचा हा विचार म्हणजे पर्यावरण शिक्षणाचे आध्यात्मिक अधिष्ठान आहे, असे म्हणावे लागेल. निसर्ग हे मानवाचे प्रतिबींब ह्या लेखात प.पू. गुरुदेवांची पर्यावरणाबाबतची भूमिका अधिक स्पष्ट होते. ह्या लेखात ते म्हणतात, ''भोवतालचे जग अस्तित्वात नसते तर तुम्ही आम्ही सर्व मानव एक तासभर सुध्दा ह्या पृथ्वीतलावर जीवंत राहिलो नसतो. चंद्र, सूर्य, तारे, वनस्पती, नद्या, सागर इ. सर्व मानवाच्या अस्तित्वाकरिता आवश्यक आहे आणि ह्याच दृष्टिकोनातून आपण ह्या जगताचे दास आहोत. ह्या बाह्य जगताशिवाय आपण जगूच शकणार नाही. इश्वराकडून ह्या सर्व बाबी आपणास फुकट मिळाल्या आहेत. दान स्विकारणारा हा दास असतो ह्याच अर्थाने मानव हा पर्यावरणाचा दास आहे. माणसाने निसर्गात ढवळाढवळ निरर्थक लुडबुड केल्याने फार भयानक परिणाम होतात. असा थोड्याच काळापूर्वी शोध लागून त्यातून इकॉलॉजी नावाचे नवीन शास्त्र निघाले. निसर्गात माणसाने ढवळाढवळ करण्याचे असेच चालू ठेवले तर पृथ्वीतलावरची मानव जातच संपुष्टात येईल, असे त्यांचे म्हणणे आहे. वातावरणातील ओझोनचा स्तरही नाहीसा होत आहे. त्यामुळे ऋतुही अनियमीत होत आहेत. अयोग्यवेळी पाऊस पडतो कधी पडतच नाही. हिमवर्षाव नको तेव्हा होतो त्यामुळे मनुष्याने आखलेल्या योजना सगळ्या विस्कटून जात आहेत आणि आपण मात्र अंधपणे आपल्या उपभोगाकरिता निरनिराळ्या वस्तु बनविण्याकरिता पृथ्वी खणून उधळून कच्चा मालाची लूट करित बसलो आहोत. आपण न्युट्रॉन शोधून काढला हे मानवाला खरोखरच गौरवास्पद आहे. पण त्याचा उपयोग मात्र परस्पर विध्वंसाकरिता

अण्वस्त्रे तयार करण्याकरिता चालू आहे. अस्त्रे तयार तर झाली आता त्याची विल्हेवाट कशी लावणार. पाणी बिघडेल म्हणून समुद्रातही टाकता येत नाही. आकाशात फेकली तर सर्व जगाला धोका आणि आता तर हा स्वनिर्मित आण्विक राक्षस संबंध पृथ्वीला गीळायची धमकी देत आहे. असा स्पष्ट इशारा गुरुदेवांनी ह्या लेखात दिला आहे व ह्याचे भीषण परिणाम स्पष्ट करतांना ते म्हणतात, ''श्रध्दा व भक्ती या ठिकाणी शुध्द भौतिकवादी दृष्टिकोनाची वाढ झाल्याने मनुष्य पराकोटीचा स्वार्थी बनला आणि योग्यता असेल तोच जगेल बाकीची नष्ट होईल अशा विचारसरणीने सर्व जगाच्या आर्थिक घडीत असंतुलन निर्माण झाले. श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. दरिद्री असहाय्य आणखी गरीब होत आहेत. जगातील अफाट लोकसंख्या सध्या अतिशय भयानक परिस्थितीत रहात आहे. ही परिस्थिती व साथ न देणारा निसर्ग हे मानवाचे प्रतिबिंब आहे, प्रतिध्वनी आहे''. मानव निसर्गाशी ज्याप्रमाणे आजवर वागला, निसर्ग त्याचाच प्रतिध्वनी मानवला वापस करीत आहे. आज जागतिक स्तरावर जी पर्यावरणीय समस्या निर्माण झाली आहे ती म्हणजे पर्यावरणाचा नाश व जागतिक तापमानवाढ! ह्याबाबत गुरुदेवांनी खूप आधी सावध केले आहे व खंतही व्यक्त केली आहे की, भौतिक शाखांच्या क्रांतीमुळे श्रध्दा व भक्ती ह्यांना फाटा मिळाला आहे. शास्त्राने बरेच कमावले आहे पण श्रध्दाहीनतेने अनेक संकटांना जन्मही दिला आहे. मानवातील निसर्गदत्त पशुवृत्तीने मानवाचा ताबा घेतला आहे. मानवाचे विचार, कल्पना व कृती ह्या पशुपेक्षाही नीच स्तरावर गेल्या आहेत. ह्यालाच आपण तांत्रिक प्रगती म्हणतो. करुणा, दया, प्रेम, क्षमा इ. माणसाचे वैभव पार निघून गेले आहे''. अशी खंत व्यक्त करुन ते मानवाला सल्ला देतात, ''तुम्ही आपली वागणूक सुधारा निसर्ग लगेच पालटतो. मानवाला हितकारक होतो.'' विश्वरुप हे विराट रुप आहे. सजीव धगधगती ज्योत आहे हे फक्त भारतीय महामुनींनीच जाणले व त्यामुळे त्यांनी उपदेश दिला की त्याचे पोषण नीट केले पाहिजे. त्याला संस्कारीत व्हायला हवे. त्याचा मान राखलाच पाहिजे. Role of Mahatma in National Integration ह्या पुस्तकात पर्यावरण ऱ्हासाबाबत गुरुदेवांनी इशारा दिला आहे ते म्हणतात, "Ecological disaster has come upon us. Pollution, natural calamities many are the plants and animals that have become extinct because they are not able to obey the natures law." एखादे झाड आपण पाहतो तेव्हा ते समाजासाठी उपयुक्त नाही असे

आपणास वाटते त्यामुळे अनेक नैसर्गिक समस्या उद्‌भवतात व आपण देवाकडे त्याचे दूषण लावतो. वास्तविक आपण इश्वराच्या न्यायाशी गैरवर्तन केले आहे. मानवाच्या त्रासामुळे आज नद्या विषारी बनल्या आहे.

'Planet in Crisis' हे पुस्तक म्हणजे युनोला संबोधित केले त्याचे संकलन होय. ह्यात Ecology ह्या विषयावर भाष्य केले आहे. Ecology हे नवीन विज्ञान आहे. जग हे दैवी आहे. आपला लोभी स्वभाव हा जगाचा नाश करु शकत नाही. आपण निसर्गाचा आदर करणे आवश्यक आहे. पण हे सर्व मागील १४ वर्षात घडले ह्याबाबत गुरुदेवांनी आश्‍चर्य व्यक्त केले आहे. वास्तविक पाहता हे पर्यावरण मानवाला कार्य करण्यास प्रेरक शक्ती आहे पण ह्याच पर्यावरणाचा आज नाश झाला आहे. नुकतेच भारत सरकारने गंगा साफ करण्याचा निर्णय घेतला त्यावर बराच पैसा खर्च केला. वास्तविक पाहता प्रत्येक नदी ही स्वच्छच असते. मानव तिला दूषित करतो. आपण नदी खराब करण्याचे थांबवत नाही पण ती स्वच्छ करण्याचे मात्र प्रयत्न करतो. ह्याबाबत ह्या लेखात त्यांनी आश्‍चर्य व्यक्त केले आहे. कारण मानवानेच नदीला अत्यंत विषारी बनविले आहे. हे सर्व मानवाचे Endless Greed मुळे घडले आहे. मानवी मनाच्या नकारात्मक वृत्तीमुळे घडले आहे.

## १३) बालकांबाबत दृष्टिकोन :-

प.पू. गुरुदेवांचा बालकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक आहे. १ नोव्हेंबर, १९८७ रोजी विलेपार्ले येथे दिलेल्या व्याख्यानाच्या पुढील विवेचनावरुन त्यांच्या दृष्टिकोनाची कल्पना येते. या व्याख्यानात ते म्हणतात, ‘‘वर्तमान काळात थोडा कालावधी मिसळला की भविष्यकाळ बनतो. वर्तमान अधिक थोडा काळ म्हणजेच भविष्यकाळ. म्हणून आपले वर्तमान कार्य आणि या अधिकच्या काळातील सामुदायिक कार्य या सर्वांचे फलितच आपले भविष्यातले जग ठरवीत असते. भविष्य हे वर्तमानाचे सातत्य नव्हे. ते कधीच तसे असू शकणार नाही. या अधिकच्या काळात जगतामध्ये सतत नवीन गोष्टी निर्माण होत राहणार नाही. काही जुन्या गोष्टींची मोडतोडही होत राहणार आणि काही जुन्या गोष्टींची मोडतोडही होत राहणार. या सर्वांमधून बरे वाईट, घडलेले, बिघडलेले जे काही शिल्लक राहील ते भविष्यातले जग असेल. ‘आजचे जग हेच उद्याचे जग होणार’ असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा

त्याचा धन्यर्थ असा असतो की आजचे लोक आणि त्यांचे कार्य जगाला आकार देणार आहेत, त्याचा जीवनमार्ग ठरविणार आहेत, भविष्यातील जीवन घडविणार आहेत. तेव्हा वर्तमान पिढीतील माणसे कदाचित जीवंत नसतील, परंतु आजचे बालक तेव्हा असतील अशी आपली अपेक्षा असते. म्हणून साहजिकच आजच्या मुलांचे दृष्टिकोन, जीवन मूल्ये, त्यांच्या कल्पना, ध्येयकेंद्रे आणि आदर्श यांना उत्तम आकार व घडण दिली तर आपल्या सध्याच्या अपेक्षानुसार जग अधिक चांगले, सुसंघटित व आदर्श असे जग निर्माण होईल अशी निश्चित अपेक्षा करु शकतो. जग बदलायला बराच कालावधी लागत असल्याने, भविष्यातील आदर्श जग आपल्या हयातीत कदाचित मूर्त स्वरुपात अवतरु शकणार नाही पण जग बदलेल निश्चित! तो बदल कशा प्रकारचा असेल ते आज वाढत असलेली भावी पिढी ठरविते. आजची मुले हेच आपले भवितव्य आहे. हे जाणून आताच कसून प्रयत्न केले पाहिजेत. जीवन घडविणे म्हणजे अचूक विचार करणे, उतम निर्णय घेणे आणि घेतलेल निर्णय धीरोदात्तपणे जीवनात उतरवणे होय. यासाठी मुलांना योग्य बनविले पाहिजे.

आजच्या भारताच्या या दु:खद स्थितीचे म्हणजे माझ्या भोवतालच्या माणसांच्या व्यक्तिमत्वाच्या ढासळलेल्या पोताचे अवलोकन करतांना, भूतकाळात त्यांच्या बालपणी त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले असावे असे मला दिसते. आज आपल्या देशात विचारवंत बुध्दीवान माणसेच दिसत नाहीत आणि अशा राष्ट्राला भवितव्य नसते.

आजच्या जगातील प्रगत राष्ट्राच्या उज्ज्वलतेचे कारण पाहता, वर्तमान पिढीतील बुध्दीमंतांनी विचारपूर्वक योजना आखून राष्ट्राला उत्तम दिग्दर्शन करुन त्याची प्रगती घडवून आणली आहे, असे ध्यानात येईल. आपल्या देशात मात्र जिकडे तिकडे मला पशुमानवच दिसतात; अत्यंत स्वार्थी दुसऱ्याचा कधीही विचार न करणारे, राष्ट्र व देशबांधवांविषयी प्रेम नसणारे आणि आपल्या देशाच्या संस्कृतीविषयी अजिबात जागरुक नसणारे लोक. उच्च जीवनादर्श आज आपल्यातून पार नाहीसे झाले आहेत आणि आपण जणू काही गुरा-ढोरांचे जीवन जगत आहेत. फक्त आपलेच पोट भरायचे आणि निव्वळ प्रजोत्पादन जोशाने वाढवायचे ! त्यामुळेच लोकसंख्या वाढत आहे. आणि अधिकाधिक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळेच राजकीय, सामाजिक आर्थिक क्षेत्रांत आणि विज्ञानातही भारताची देन जवळ

जवळ शून्य आहे. वर्तमानकाळाचा अभिमान आपण बाळगावा असे काहीच नाही.

आपले इतके अध:पतन कसे काय झाले आहे? आजच्या पिढीच्या बाल्यावस्थेत संस्कार करण्याच्या दृष्टीने आपण दुर्लक्ष केले हेच त्याचे कारण नाही काय? भूतकाळातील ते दुर्लक्ष आणि निष्काळजीपणाची पडछायाच परिणामत: आज दिसून येत आहे आणि त्यामुळे आजची परिस्थिती रुपहीन व कुरुप दिसत आहे. ही अत्यंत दु:खद आणि खेदजनक परिस्थिती आहे. भविष्यात सुध्दा तुम्हाला आपला देश स्वार्थ आणि निर्बुध्दपणा या ढगांनी काळवंडलेला दिसायला हवा आहे की आपल्या मुलांना अभिमानाने जगण्यास तेजस्वी जग घडावसं वाटतं? सध्या आपण याच्यातून ताबडतोब बाहेर येणे शक्य नाही. एका रात्रीत काही हे घडू शकत नाही. कारण हा क्रांतीचा विचार नाही. परंतु देशाची संस्कृती, सामाजिक प्रगती, प्रजेचे वैयक्तिक चारित्र्य यांच्या उत्क्रांतीचा तो विचार आहे. ही संथपणे घडणारी प्रक्रिया आहे. म्हणून भवितव्य उज्वल होण्यासाठी आपण आपल्या मुलांना 'विचारी' बनवले पाहिजे. विनाशगर्तेत लोटणारी आपली विचारपध्दती त्यांना न शिकविता नवउत्साहाने निराळ्या दृष्टिकोनातून त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करुन त्यांच्यात मत जागरुकता निर्माण केली पाहिजे.

Catch the young हा त्यांच्या बालकविषयक दृष्टिकोनाचा गाभा आहे. आजकालची मुले काही वेगळीच वागतात. ह्याबाबत त्यांचा वेगळा दृष्टिकोन होता. हा आक्षेप त्यांनी 'आपली लहान मुले' ह्या लेखात व्यक्त केला आहे. आजची मुले चुणचुणीत असतात. आकलन शक्ती अधिक असते. वर्तमान युगातील गतीमान जीवनाशी लढा देण्यासाठी त्यांनी स्वत:मध्ये खूप वैशिष्ट्ये विकसित केली आहेत. साधारणच आवाका असलेल्या त्यांच्या पालकांपेक्षा त्यांच्यात माहितीही खूप असते. त्यांना खूप समजते. विज्ञान व तत्वज्ञान ह्या क्षेत्राचा झालेला विकास व त्याचा प्रसार ह्यामुळे पूर्णपणे बदलेल्या वातावरणात ह्या मुलांना जीवनाशी संघर्ष करावा लागतो. मुलेही या नवीन परिस्थितीत घडत आहेत. सभोवतालच्या ह्या नवीन जगाशी जुळवून घेता यावे म्हणून निसर्गानेच प्रामाणिकपणे त्यांच्यात एक प्रकारची क्षमता विकसित केली. अशाप्रकारे त्यांच्या या मानसिक घडणीमुळे व बौध्दिक क्षमतेमुळे ती काहीशी वेगळीच वाटतात. म्हणूनच ती बाहेरुनही उठून दिसतात. आजच्या बालकांबद्दल वास्तविकता स्पष्ट होतांना गुरुदेवांची निरीक्षण क्षमता आपल्या लक्षात येते. पण अशा

बालकांकडे त्यांच्या पालकांचे लक्ष हे जसे हवे तसे नसते ही खंत त्यांनी व्यक्त केली आहे. पण असे असूनही ही बालके तिथेही कसे जगावे हे शिकले आहेत. आजूबाजूची आजची समाजातील स्थितीही विपरीत आहे. ह्या परिस्थितीवर त्यांनी ह्याच लेखात विशेष प्रकाश टाकला आहे ते म्हणतात, "आज सभोवताली मुलांना कमालीचा स्वार्थ दिसत आहे. खुल्या स्पर्धा नजरेस पडत आहे. आत्मसंयमनाचे आणि त्यागाचे जीवन कोणी जगत आहे. हे त्यांच्या दृष्टीस कधी पडत नाही. पालकांच्या दृष्टिकोनातूनच व पवित्र असे काहीच नसते. ही मंडळी क्षणिक सुखाच्या व करमणुकीच्या पळवाटा शोधत सर्वत्र धावत सुटली आहे. एका बाजूला अंतर्मनात गोंधळ निर्माण करणाऱ्या या दुर्दैवी असुरक्षिततेच्या भावनेशी या मुलांना झगडावे लागत आहे तर दुसरीकडे बाहेर प्रेमाचा लवलेश नसलेल्या व त्याच्याकडे अजिबात लक्ष न देणाऱ्या जगाशी त्यांना संघर्ष करावा लागतो आहे आणि आपण त्यांना समजून घेण्यात असमर्थ ठरलो आहे. मुलांच्या दृष्टीने आपले जग आणि आपल्या वागणुकीच्या तऱ्हा आपण त्यांच्यात पाहू शकणार नाही. या बाबतीत यश मिळेल अशी आपली लायकीच नाही. अशाप्रकारे मागील शतकात त्यांच्यावर लादल्या गेलेल्या शिक्षणपध्दती त्यांना हळुहळु चिरडून टाकू लागल्या आहेत आणि त्यातूनच निर्माण होत आहेत. क्रुरच विचित्र व्यंगचित्रे ह्या मुलांना राहण्यासाठी त्यांची वाढ होण्यासाठी आणि जगण्यासाठी आपण एक विकृत जग निर्माण करुन ठेवले आहे. याविरुध्द जाण्यासाठी शिक्षणाच्या काही नवीन पध्दती निर्माण करण्याची आज गरज आहे. अर्थात शिक्षणाबातचा हा नवीन दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो. हा शिक्षणाबाबतचा प्रगतीशील दृष्टिकोन मांडण्याचे महत्वाचे कारण म्हणजे या काळातील मुले हुशार आहेत. त्यांचा बुध्यांक उत्तम प्रतिचा आहे. सभोवतालच्या वस्तुचे आणि प्राणीमात्रांचे पृथ्थकरण करुन त्यांना जाणून घेण्यासाठी निर्णय घेण्याची जी एक क्षमता लागते ती त्यांच्याजवळ पन्नास वर्षांपूर्वीच्या मुलांजवळ जेवढी होती त्यापेक्षा अधिक आहे. ही त्यांना निसर्गाने जगण्यासाठी दिलेली एक जादा देणगी आहे. त्यांच्याकरिता आपण जे हे जग निर्माण करुन ठेवले आहे ते अतिशय क्रूर आहे. तिथे प्रेम नाही, सहानुभूती नाही, आदरभाव नाही की कुचभाव नाही. गुरुदेव खंत व्यक्त करतात की, "समोर समस्या मोठी आहे. जी कामगीरी समोर आहे तिच्यासाठी खूप परिश्रम करावे लागणार आहे. त्यासाठी बुध्दीवंतांनी आणि समजूतदार लोकांनी यात तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. अतिशय अशिक्षित व असंस्कृत अशा भावनाहीन पशुचे म्हणून आपले

राष्ट्र वाढत आहे. ह्या सर्वांना लगाम घालण्यासाठी आणि आपल्या राष्ट्राची गाडी पुन्हा रुळावर आणण्यासाठी काही काळासाठी तरी आपल्याला निष्ठुर व्हावे लागेल. पाषाण हृदयी बनावे लागेल. अन्यथा एक दशकानंतर ही शोकांतिका गंभीर रुप धारण करेल. ही समस्या मात्र जोंधळात पाणी आणेल आणि त्यावेळी त्यावर उपाय असणार नाही,'' असाही सल्ला गुरुदेवांनी दिला आहे. ह्याचे कारणमिमांसा देतांना गुरुदेव म्हणतात, "सभोवतालच्या जगात जीवनमूल्यांची घसरण होत असलेली आपण पाहतो. पण ह्यातून मार्ग काढण्यासाठी काही आशेचे किरण मात्र निसटलेलेच असतात ह्यावर त्यांचा दृढ विश्वास आहे हे निसटलेले किरण म्हणजेच देशप्रेम, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांवरच विश्वास आणि प्रचलीत यंत्रणेविरुध्द उठाव करावा ही जाणीव पण आज भारतात जी परिस्थिती आहे तिचे वर्णन गावंढळ परिस्थिती असे केले आहे. कारण चीड आणणारी निष्ठुरता व रानटी स्वार्थ हे गावंढळपणाचे मूळ आहे. पण ह्या ठिकाणी गुरुदेव कळवळीने व पोटतिडकीने सांगत आहेत की, उद्याचे नागरिक होणाऱ्या आपल्या मुलांना तरी आपण ह्यातून वाचवायला हवे. बऱ्याच जणांना हा मार्ग अडचणीचा वाटतो. तरी पण मुलांच्या कुटुंबातील व सार्वजनिक जीवनातील ह्या गरजा आहेत व त्याची यशाची पूर्तता करण्याकरिता एखादे तंत्र विकसित करण्याचा मार्ग आपल्याला शोधायलाच हवा''. हे एकप्रकारे शिक्षण पध्दतीलाच आवाहन आहे, असेच म्हणावे लागते.

बालकांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत भाष्य करतांना 'Brighter world for our children' ह्या लेखात Chinmaya Mission News Bulletin Nov. 2007 प.पू. गुरुदेव म्हणतात "If the future is to be bright we have to mould our children to think in a new patterns and with a new vision. It is not revolution but it is evolution of each individual character". ही भूमिका आपण पाठ्यपुस्तकातून समजून घेता येणार नाही. ह्यासाठी पालकांनी बदलण्याची आवश्यकता आहे, असे ह्या लेखात सुचविले आहे. कारण विद्यार्थी पुस्तकातून अध्ययन करु शकत नाही. ही मूल्ये संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये रुजविता येणार नाही तर मुले आपल्या पालकांचे अनुकरण करतात. ह्या कार्यात आईची भूमिका गुरुदेवांनी अत्यंत महत्वाची मानली आहे. आईच आपल्या मुलांमध्ये उच्च आदर्श व मूल्य रुजविण्यास समर्थ असते. लहान रोपट्याची योग्य काळजी घेतली तरच त्याचे रुपांतर सरळ वृक्षात होते. ह्यासाठी झाड लहान हवे व माळी हा प्रामाणिक हवा. त्याच प्रमाणे

वय वर्ष ६ ते १२ ह्या काळात आपण बालकांना योग्य मूल्य संस्कार देऊ शकतो. त्यानंतर मात्र देऊ शकत नाही. त्यानंतर त्यांच्या विचारांना आपण बदलवू शकत नाही आणि म्हणूनच बाल्यावस्था ही संस्काराकरिता महत्वाची अवस्था आहे व ह्याकरिता आईच जबाबदार आहे. माता ही सेवेचा आदर्श आहे. Mother lives the Ideals of charity goodness, tenderness, affecion and forgiveness. माता आपल्या जीवनात वरील आदर्शाचे दिग्दर्शन करीत असते. बालक ह्या बाबीचे निरीक्षण करते व अनुकरण करते. माता जर आध्यात्मिक मूल्यांना स्पर्श करीत नसेल तर बालकांवर त्याचा परिणाम निश्चित होईल आणि अशी बालके तरुण झाल्यावर आजूबाजूच्या परिस्थितीत जेव्हा मूल्यांची पायमल्ली होतांना दिसेल तेव्हा तेव्हा ते समाधानी तर होणार नाहीच पण त्याच सोबत ते आजूबाजूच्या परिस्थितीशी सामना करावयास असमर्थ ठरतील आणि ते व्यसनांच्या माध्यमातूनच परिस्थितीपासून पलायन करतील आणि म्हणूनच मातेने देशाची सांस्कृतिक मूल्य शिकायला हवी. बालकांना राष्ट्रनिष्ठा, मूल्यनिष्ठा शिकवायलाच हवी. आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी मुलांमध्ये मूल्यनिष्ठा रुजवायला हवी. गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे की, आपण आपल्या बालकांकडे दुर्लक्ष करत आहोत आणि आपण बालके घडविणारे केवळ यंत्र बनलो आहोत. ह्याकरिता गुरुदेव म्हणतात, "We have to take responsibility for moulding and beautifying our children, prepare them to face the world tommorrow and to lead and guide the world of the future". ही जबाबदारी जर लक्षात आली तरच आपण बालकांना चांगले हाताळू शकू. या विचाराचे महत्व स्पष्ट करण्यासाठी त्यांनी प्राण्याचे उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, ‘‘प्राणी सुध्दा आपल्या पिल्लांना जीवन जगण्याचे प्रशिक्षण देतात. एखादे पक्षाचे पिल्लू त्याला बालवयात दुर्लक्षित होऊन त्याच्या पंखातील समतोल कसा राखावा ह्या करिता दुर्लक्षित झाले आहे का! त्याची माता ह्या कार्यासाठी आपला वेळ घालविते. पण ही बाब बुध्दीमान मानवामध्ये आहे तो आपल्या बालकांना दुर्लक्षित करतो पण ह्यावरील उपाय आपल्याजवळ आहे. आपण आपल्या बालकाला आदर आणि प्रेम द्यायला हवे. We must teach the children not only to have right values and convictionof their own but also to have the heroism to live up to them बालक शिक्षणाचे अनन्य साधारण महत्व स्पष्ट करतांना गुरुदेवांनी ही जबाबदारी विशेषत्वाने माता पालकांकडे दिली आहे.

Our Children - Their Education - A National Challenge ह्या लेखात (Tapovan Prasad, June 1996) ह्या लेखात गुरुदेवांनी बालक शिक्षणाची एक योजनाच दिली आहे व ही योजना एक राष्ट्रीय आव्हान म्हणून स्विकारण्याबाबत ठाम भूमिका घेतली आहे. ही निसर्गाची त्यांना मिळालेली देणगी आहे. आजच्या परिस्थितीचे अत्यंत मार्मिक वर्णन गुरुदेवांनी केले आहे ते म्हणतात, "We are definitely growing in to a nation of heartless brutes, extremely uneducated and uncivilised here every vulgarity in politics and commerce in religion and social system in profession and in industry is based upon and springing from a callgus outrageous and barbarouss efishness". ह्या सर्वांपासून आपल्या बालकाला वाचवायला हवे. त्यासाठी गुरुदेवांनी एक शिक्षण योजनाच दिली आहे. ते म्हणतात, "बालक जेव्हा आपल्या शिशु अवस्थेतून बाहेर येतो तेव्हा त्याची ती self education ची अवस्था असते. ह्या अवस्थेचे वर्णन त्यांनी पुढीप्रमाणे केले आहे. "The child's endless wonderment at things, its steady sense of inquisitiveness, its silent but very thoughtfull attention to everything sad and done around it in its world. Its expert inents with live, affection and instincts of acquisition grabbing, fighting kindness the entire gamut of emotional life, is the next stage. During this time education starts and this highly impression period is the most crucial time in building up the childs entire future". ह्या काळात उदाहरणाच्या माध्यमातून अभ्यास (Study from example) आणि अनुकरणातून तो शिकतो. शेजारी, नातेवाईक, मित्र, नोकर ह्या सर्वांपासून ह्यांच्यापासून तो सवयी, कल्पना, शब्द स्विकारतो. ह्या नर्सरी अवस्थेत बाल्याला आनंदी वातावरण व आदर्श प्रेम पुरवायला हवे. जे चांगले आहे त्याची स्विकृती जे आदर्श आहे त्याला स्विकृती, सौंदर्याची ओळख, मानवातील आनंदीभाव हे आदर्श गुणधर्म दिग्दर्शन करायला हवे. ह्या वयात अमूर्ताबाबतची ग्रहण क्षमता कमी असते. पण ह्यावेळी आदर्शाची अभिव्यक्ती दिग्दर्शित व्हायला हवी. त्यांना तुम्ही त्यांच्यावर प्रेम करता हे त्यांना सांगा. ते सुंदर आहेत हे त्यांना सांगा ते हुशार आहेत, आदर्श आहेत हे त्यांना सांगा त्यांना वारंवार सांगा. तुमच्या इतरांसाठी त्याग करण्याच्या वृत्तीचे दिग्दर्शन करा. मुलांना हे कळू द्या की तुम्ही इतरांच्या

मदतीसाठी उत्सुक आहात ही बाब त्यांना प्रभावित करेल आणि Thus noble character is easily formed ह्या काळातील मुलांना अध्यापन हे २४ तास ३६५ दिवस असावे. विद्यार्थी हे शिक्षकांचे चांगले निरीक्षक असतात. विशेषत: अशा शिक्षकांचे ज्यांनी ह्यांच्या मनात आदर आणि प्रेम निर्माण केले आहे. शिक्षकांची कोणतीच कृती ही विद्यार्थ्यांकरिता असंबध्द नसते. ते पाहतात अनुकरण करतात आणि आपल्या वर्तनातून प्रतिबिंबीत करतात.

मूल ५ वर्षाचे झाल्यावर ते शाळेत जायला समर्थ बनते. ह्यावेळी त्यांचे शारीरिक अवयवात सामर्थ्य आले असते. Limbs are steady - A Healthy child has enormous energy to born up and it needs therefore frequent refreshments to replenish the energy drained away in play. ह्याच वयात त्यांच्या वर्तनाला योग्य वळण देण्याचा प्रयत्न आपण करायला हवा. कला व हस्तकलांचे वर्ग हे वर्तनाला आकार देण्याकरिता अतिशय उपयुक्त आहेत. त्यांच्याशी प्रेमानेच वागावे. अतिरेकी परिस्थितीत सर्व मुलांच्या उपस्थितीत त्यांना शासन करावयास हरकत नाही. त्यांच्य सुरक्षेशी व त्यांच्या सुखाशी तुमचा नित्य संबंध आहे हे त्याला अभिव्यक्त करायलाच हवे.

## वय वर्ष ५ ते १० :-

ह्या वयाचे वैशिष्ट वर्णन करतांना गुरुदेव म्हणतात, "In this year the child is stretching his emotional and intellectual abilities in to ever widening fields अशावेळी त्याला उच्च आदर्शाचे धडे देणे महत्वाचे ठरते. हे गोष्टीच्या माध्यमातून घडेल. ह्या गोष्टीतून तो आपले आदर्श उचलेल, पौराणिक कथा, संतांच्या कथा, वैज्ञानिकांच्या, राजकारणी लोकांच्या, समाज सेवकांच्या कथा सांगणे योग्य ठरेल. पंचतंत्राच्या गोष्टी सांगणे योग्य ठरेल. ह्या कथांच्या माध्यमातून हे "They will learn how in the confrontation of the good and the evil. The good alone wins in the end. Recitation, Mass-chanting, group song". ह्या वयाकरिता योग्य आहेत.

## वय वर्ष १० ते १४ :-

बालकाच्या या वयातील गरज सांगतांना गुरुदेव म्हणतात, "They need a

little more material to handle as their minds have unfolded to an extend". ह्यामुळे त्यांना अध्ययनात अधिक रुची निर्माण होईल आणि जीवनाचा मार्ग व दिशा ह्याबाबत त्यांना आकलन होईल. ह्या वयोगटात गुरुदेवांनी काही पुस्तके सुचित केली आहेत. ती म्हणजे Geeta for Children I Love You.

## वय वर्ष १५ ते १८ :-

ह्या वयात त्यांच्या कल्पना त्यांच्या शब्दात अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य द्यायला हवे. त्यांनी ज्याचे वाचन केले आहे त्यातील कल्पना अभिव्यक्त करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करायला हवे. त्यांच्या लाजाळूपणा ह्याचा त्यांच्या व्यक्तिमत्वातून विवरा झाला पाहिजे. त्यांना प्रोत्साहित करा. ह्या वयात त्यांच्या चुकांबाबत टिका करु नये त्यांना वृध्दींगत होण्यासाठी सहाय्य करायला हवे. Leave them alone to grow up do not hasten them.

## वय वर्ष १८ ते २० :-

ह्या वयात बालक शारीरिक व मानसिक दृष्टिकोनातून परिपक्व झालेले असते. अशावेळी त्यांना साधनेतील प्रारंभिक पायऱ्या समजून सांगायला हव्यात. याची आवश्यकता वर्णन करतांना गुरुदेव म्हणतात, "They can all by themselves come to discover that they can with diligence and practice control the mand on rush of their own wild and crazy mind." विद्यार्थ्यांना ह्याच वयात आत्म संयमनासाठी साधना शिकविणे आवश्यक आहे. ह्यासाठी थोड्या वेळाचा जप व अंतर्मनातील शांती अनुभवण्याचा सराव त्यांना द्यायला हवा. ह्यातून मुलांच्या मनात निष्ठा उत्पन्न व्हायला हवी की, "Man needs, self control if he is to control his own mind." मनाला अशा प्रकारे वळविल्या शिवाय त्यांच्या जीवनात सौंदर्य येणार नाही.

## वय वर्ष २० ते २५ वर्ष :-

हा तरुण वयाचा कालखंड. ह्या वयात आपण त्यांना उच्चावस्थेकडे जाण्यास प्रवृत्त करायला हवे. ह्यासाठी गुरुदेव अत्यंत परखडपणे सांगतात, "Without any hasitation

teach them the upanishands (Is a Kena and Kothopnishad) and Geeta (Chapter (II, III, VI, IX, XII, XIII) आणि त्यांना वृध्दींगत होण्याची संधी द्या.

वरील प्रमाणे योजना राबविल्यास त्याचे फायदे गुरुदेवांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

१) This kind of a graded system if followed faithfully we can more effectively complete the education of our growing generation both in their inner values of life and also in their outer objective science.

२) The secular education will make them proficient to meet the challenges in their professions and the value of life incalcuted will mould them to be better person in the society.

हे विचार मांडत असतांना गुरुदेव प्रश्न करतात की अशी आदर्श शिक्षण व्यवस्था आपण तयार करु शकतो का? ह्या कार्याची जबाबदारी ते शिक्षतज्ज्ञांवर टाकतात. कारण हे एक राष्ट्रीय आव्हान आहे. ह्या सर्व विचारांचा परामर्ष घेतल्यास एक बाब लक्षात येते की, गुरुदेवांना शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श मानवाची निर्मिती करायची होती व असा मानव घडविणारी योजना ही Education for man making ची योजना आहे. असेच म्हणावे लागेल व हे एक राष्ट्रीय आव्हान आहे.

प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे 'Catch them young' हे गुरुदेवांच्या बालकांबाबतच्या दृष्टिकोनाचा गाभा आहे. ह्या लेखात ते म्हणात, "children of today are to be inheritors of tomorrow and the future world to be guided on proper lines by the growing children of today. Unless we train them up properly to take up the great responsibility they to shall fail as our fathers had failed and many of us are failing today." ह्याच लेखात मुलांच्या बालकाच्या वाढ व विकासात गुरुदेवांना शाळेतील वातावरण व घरातील वातावरण ह्यावर भर दिला आहे. शिवाय ह्या करिता सर्व बालकांना एकत्र आणून त्यांच्यात सांस्कृतीक आंतरक्रियेवर त्यांनी विशेष भर

दिला आहे. ह्यामुळे होणारा फायदा विषद करतांना ते म्हणतात, "Upon such a sacred personality strength, cultural brotherhood and spiritual companionship alone can a sober world be built up and more harmonious culture for our country be evolved. Parents and elders will perhaps be witnessing the early beginnings of the new Bharat that we, are planning for the glory of the future times to come" चिन्मय बाल विचारांच्या माध्यमातून होणारे हे परिवर्तन त्यांनी ह्या लेखात वर्णन केले आहे.

Our children our future ह्या पुस्तकात गुरुदेवांनी बालकांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी बालकांच्या वर्तमान कामाला अधिक महत्व दिले आहे. कारण बालकांचा वर्तमान काळ + पुढे येणारा काळ - भविष्यकाळ असे भविष्यकाळाबाबतचे समीकरण त्यांनी मांडले आहे. ह्या वर्तमान काळातच बालकांच्या सुंदर स्वभावाची निर्मिती करण्यात यावी असे ते म्हणतात. बालकांना खऱ्या मूल्यांचा आदर करावयास शिकवावे. वर्तमानात मुलाचे विचार महान असतील तर आपण सुंदर भविष्याची निर्मिती करु शकू आणि म्हणूनच बालकांना खरा विचार करावयास शिकवायला हवे. योग्य निर्णय घेण्यास शिकवायला हवे. ह्या निर्णयानुसार जीवन जगण्याचे साहस त्याच्यात निर्माण करायला हवे. आज भारताची एवढी दयनीय अवस्था आहे ह्याचे कारण आजच्या युवकांच्या बालवयाची उपेक्षा केली गेली असावी. जगातील सर्व विकसित देश विकसित अवस्थेत तेव्हाच पोहोचले आहेत जेव्हा त्या पिढीतील प्रतिभावान पुरुषांनी गांभीर्याने विचार केला. योजना बनविल्या व त्यानुसार साहसपूर्ण कार्य केले. आपल्या देशात पशुवृत्तीच्या व्यक्ती स्वार्थी व्यक्ती दिसून येतात. त्यांना कुणाचीही चिंता नाही. देशाच्या उत्थानाची त्यांच्या जवळ कोणतीही योजना नाही. देशप्रेम, समाज प्रेम नाही. ही आदर्श नष्ट होत आहेत. आज आम्ही पोटभरु झालो आहोत व लोकसंख्या वाढवित आहोत. परिणामी देशात अनेक समस्या निर्माण होत आहेत. ह्याचाच परिणाम म्हणून की काय राजकारण क्षेत्र, समाज क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, विज्ञान क्षेत्र ह्या भारताचे योगदान कमी आहे.

"Kids are not pets" ह्या लेखात गुरुदेवांनी शिशुबद्दल आपली भूमिका

व्यक्त केली आहे. बालके ही पाळीव जनावरे नाहीत की ज्यांना केवळ निवारा आणि अन्न लागते. माणसाला त्याच्या शिशु अवस्थेत विशेष देखरेखीची आवश्यकता असते. 'All delinquents are without exception created by negligent parents.' पालकांनी आपला जास्तीत जास्त वेळ बालकांना देणे आवश्यक आहे. त्यांना चांगल्या कथा सांगाव्या ह्यासाठी त्यांनी पंचतंत्र सारख्या तसेच पौराणिक कथांवर भर दिला आहे. जोवर बालक हे शिशु अवस्थेत आहे तोवर पालकांनी त्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. पालक कधी कधी खूप लहान बाबींवरुन आपल्या पाल्यास टोकतात. शिशु जेव्हा बाल्यावस्थेत येतो तेव्हा पालक त्याला अतिशय छोटे छोटे आदेश देतात पण आपणच नकळत आपल्या मुलाची संवेदनशीलता मारत असतो. ह्याबाबत ते अनभिज्ञ असतात. गुरुदेव म्हणतात, "These thoughtless commands can murder the sensetive care of the growing children. The young need companionship, they demand attention, care and love. It is our duty as parents to give our children the blessing of healthy orientation both for their head and for their heart."

"Our children our future" हे पुस्तक म्हणजे बालक शिक्षणाच्या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण असे ठरते. ह्या पुस्तकात त्यांचा बालकांच्या प्रति असणारा दृष्टिकोन लक्षात येतो. ह्या पुस्तकात त्यांनी बालकांच्या वर्तमानावर विशेष भर दिला आहे. वर्तमान आणखी काळ मिसळला की भविष्यकाम बनतो. म्हणजेच वर्तमान + काळ = भविष्यकाळ आहे. वतमान काळातील जे फलीत आहे ते म्हणजे भविष्यकाळ आहे अशी त्यांनी भविष्याची परिभाषा केली आहे. वर्तमानाचे योगदान हे भविष्याचे रूप धारण करित असतात. आजची मुले बालके ही उद्याचे भविष्य आहे आणि म्हणुनच वर्तमान बालकांना सुंदर स्वभाव निर्मितीवर गुरुदेवांनी भर दिला आहे. वर्तमानातच आपण मुलांना उच्च मूल्यांचा आदर करायला शिकवायला हवा. आज मुलांचे आदर्श उच्च असतील विचार महान असतील तरच आपण त्यातून सुंदर भविष्याची आशा करू शकतो. अर्थात बालकांच्या दृष्टिकोनातून त्यांचा वर्तमान महत्वाचा आहे आणि म्हणुनच योग्य विचार करण्यासाठी आपल्याला विद्यार्थ्यांला बालकाला योग्य विचार करावयास शिकवावे लागेल. तसेच योग्य निर्णय घेण्यास शिकवावे लागेल. आज भारतात जी दयनीय अवस्था झाली आहे त्याचे महत्वाचे कारण म्हणजे ह्यापूर्वीच्या बालकांचा वर्तमानकाळ उपेक्षीत

झाला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. आज भारतात प्रतिभावान व्यक्ती नाही, त्यांची खंत गुरुदेवांनी व्यक्त केली आहे, पण प्रतिभावान व्यक्तीशिवाय देशाचा भविष्यकाळ नसतो. जगातील सर्व विकसित देश तेव्हाच विकसीत झाले आहे जेव्हा त्या देशातील प्रतिभावान लोकांनी गांभीर्याने विचार केला आहे. यानुसार नियोजन केले आहे व त्यानुसार कार्यवाही केली आहे. आज आपल्या देशात स्वार्थी लोकांची संख्या जास्त आहे, ह्याबाबत खंत व्यक्त करतांना ते म्हणतात की देशाच्या प्रगतीसाठी ह्यांच्याजवळ योजना नाही, समाजप्रेम अथवा देशप्रेम त्यांच्याजवळ नाही, उच्च आदर्श आज राहिला नाही. म्हणुनच आज राजनैतिक क्षेत्र असो, सामाजिक क्षेत्र असो भारताचे योगदान पाहीजे तसे नाही. आमचे आज एवढे पतन कां झाले ? तर त्यावेळी आजच्या पिढीचा वर्तमान हा दुर्लक्षीत राहिला आहे. आपल्या देशाचा सांस्कृतिक विकास चारित्र्याचा विकास व्हायला हवा. आपल्या देशाचे भवितव्य आपण उज्वल बनविण्याकरिता आपण बालकांना योग्य शिक्षण द्यायला हवे. ते विनाशकारी वृत्तीचा स्विकार करणार नाही ह्याबाबत आपण सजग असायला हवे. ह्यासाठी आपण काय करू शकतो ह्याबाबतही त्यांनी हयाच पुस्तकात उपाययोजनाही दिली आहे. ते म्हणतात "आपली बालके हे आपले भविष्य आहे, हे आपण मान्य करतो पण त्यासाठी काय करायला हवे ह्यासाठी आपल्याकडे निश्चित अशी योजना नाही. केवळ पाठ्यपुस्तकात परिवर्तन करून चालणार नाही. वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनवर मूल्याधारीत शिक्षणाची घोषणा करून चालणार नाही तर सर्वात पहीला उपाय ते सांगतात की, पालकांनीच बदलायला हवे. असे सांगत असतांना त्यांनी पालक शिक्षणाचाही पाया रोवला आहे. बालकाला उच्च मूल्य हे पुस्तकातून, शाळेतून किंवा समाजातून प्राप्त होत नाही तर आपल्या मातापीत्यांच्या अनुकरणातून ते प्राप्त करतात. आणि आज अनेक मातापित्यांचे वर्तन हे असभ्य आहे. रावणाच्या राज्यात सर्व रावणच होणार, हिरण्यकश्यपाच्या राज्यात सर्व हिरण्यकश्यपच होणार. ह्याठिकाणी हिरण्यकश्यपाच्या राज्यातील एक पौराणिक कथेचा उल्लेख करून गुरुदेवांनी जन्मपूर्व शिक्षणाचीही उद्घोषणा केली आहे. भक्त प्रल्हादाने जन्मानंतर पाहिजे तसे शिक्षण प्राप्त केले नाही, पण तो उच्च मूल्यांच्या प्रति समर्पित होता. ह्याचे कारण त्याचे जन्मपूर्व अध्यामिक शिक्षण परिणामी ह्याच बालकाने भौतिकवादाचा विरोध केला व त्याने आपल्या देशाला पुन्हा अध्यात्मिक सौंदर्य प्राप्त करून दिले. शाश्वत मूल्य प्राप्त करून दिलीत, पण आजकाल माता आपल्या बालकाला जन्मपूर्व जे शिक्षण देत आहेत त्याबाबत

गुरुदेवांनी विलक्षण खंत व्यक्त केली आहे. बालकांना जन्मपूर्व अवस्थेत ह्या मातांनी सिनेमा, उपन्यास, होटलींग ई.चे संस्कार आपल्या बालकांना देणे व भविष्यात आपला बालक बिघडला ही तक्रार करणे वास्तविक हा विरोधाभास आहे. ह्या ठिकाणी गुरुदेवांनी स्त्री शिक्षणाच्या संदर्भात मातापालक शिक्षणाचा पाया रोवला आहे.

ह्या सर्व दृष्टिकोनातून आजच्या राक्षसी युगाकरिता आपणच जबाबदार आहोत असे हटल्यास वावगे होणार नाही. जेवढ्या महान व्यक्ती आजवर झाल्यांत त्यांच्या विचारांना वळण हे बालपणीच लागले आहे. ही बाब त्यांच्या आत्मकथेतही त्यांनी नमुद केली आहे व आपल्या मातेच्या प्रति त्यांनी ऋणही व्यक्त केले आहे. घरात केवळ माताच आपल्या बालकांना संस्कार व मूल्य प्रदान करू शकते. ह्याबाबत त्यांचा ठाम विश्वास आहे. माताच बालकांना नविन आदर्शाचे शिक्षण देवू शकते. बालकांमध्ये चिंतनाची योग्य दिशा देवू शकते. ह्याचाच अर्थ माता सुसंसरीत असण्याची आवश्यकता आहे आणि बालकाचे व्यक्तिमत्वाचा समन्वयात्मक विकास झाला तरच त्याचे भविष्य उज्वल बनेल तेच उद्याचा नेता बनतील. म्हणून आज आपल्याला त्यांच्या हृदयात उदात्त विचार भरावे लागतील. पण अश्विनीलच जर बालकाची उपेक्षा करतील तर ही बाब साध्य होणार नाही. ह्यासाठी ते अतिशय सुंदर उदा. देतात. ते म्हणतात रोपटे जेहा लहान असते तव्हाच त्याला सरळ वाढायला शिकविता येईल. पण तो मोठा वृक्ष झाल्यास आपल्याला त्याला पाहीजे तसे वळण देता येणार नाही. आणि म्हणुनच त्याच्या १८ वर्षापर्यंत बालकांना योग्य शिक्षण देता येईल. त्यानंतर मात्र त्यांच्या दृष्टिकोनात परिवर्तन आणणे, त्यांच्या विचारांना योग्य दिशा देणे शक्य होणार नाही आणि ह्याच दृष्टिकोनात आईची भूमिका ही बालक शिक्षणात महत्वाची ठरते. बालकांचे प्राथमिक नैतिक शिक्षण हे घरात होते, आई वडीलांच्या सहवासात होते. आज आईवडील आपल्या बालकांशी नितीमत्त्रेच्या बाबी बोलत नाही, पण त्यांने डॉक्टर बनावे ह्याबाबत सूचित करतात. पण चांगला नागरिक घडावे ह्याबाबत संस्कार करीत नाहीत. माता पीताच आपल्या बालकास सदाचाराचे शिक्षण देवु शकतात अशी आग्रही भूमिका गुरुदेवांनी मांडली आहे. ह्या ठिकाणी काही विशेष मूल्यांचा उल्लेख त्यांनी केला आहे की ज्या मूल्यांचे संस्कार माता आपल्या केवळ वर्तनातून व औपचारिकपणे आपल्या बालकावर करू शकते. ती मूल्ये म्हणजे उदारता, क्षमाशीलता, सहनशीलता, प्रेम, सहानुभूती, दान, दया, सद्‌गुणांचा आदर ह्या बाबी माता

आपल्या बालकावर करू शकते. ह्यासाठी त्यांचेवर वेगळे संस्कार करावे लागत नाही. माता आपल्या आचरणाने ह्या बाबी बालकांमध्ये रूजवु शकते. पण माता जर पुरूषी वागु लागल्या तर बालक कोमल भावनांपासून वंचीत राहतात. बालक जेव्हा युवावस्थेत येतात व आपल्या आजुबाजुचे वातावरण बघतात, मूल्यहिनता बघतात तेव्हा त्यांना त्यांचे शिक्षण अर्थहीन भासु लागते. ते समाजात संघर्ष करू श्कात नाही. म्हणजे पलायनवाद स्विकारतात. आत्मघातकी मार्ग स्विकारतात. ह्या बाबींवर विशेष प्रकाश टाकून गुरुदेवांनी ह्या बाबींवर भर दिला आहे की आता महिलांनी आपल्या बालकांना जन्म देणे बंद करावे व सन्यास स्विकारावा. कारण बालकांना तयार करण्यासाठी मातांची मानसिकता पक्की असायला हवी.

बालकांना संस्कृती शिक्षणावर गुरुदेवांनी भर दिला आहे, पण त्यासाठी कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे, विशेषत: युवतीची आवश्यकता आहे. कारण युवती आपल्या मातृत्व भावनेतून बालकांना शिक्षण देवु शकतील. ह्यासाठी शाळेमध्ये काही कार्यक्रम घ्यावे लागतील. ह्यासाठी शाळेतील शिक्षक शिक्षीकांना आठवड्यातून किमान एक वेळ संस्कृती शिक्षणाचे पाठ द्यावे लागतील. बालकांमध्ये केवळ उच्च मूल्यांचे बीजारोपण महत्वाचे नाही तर ह्या जीवन मूल्यांना धारण करण्याचे साहस त्यांच्यात निर्माण करावे लागेल. आज आपल्या बालकांमध्ये बुध्दीमत्ता आहे, पण ही बुध्दीमत्ता शक्तीहीन झालेली आहे. आज आपण बालकांची उपेक्षा करित आहोत, बालकांना केवळ जन्म देणे पर्याप्त नाही, तर त्यांना योग्य संस्कार देणे महत्वाचे आहे. पशुपक्षी प्राणी सुध्दा आपल्या पिल्लांना जीवन जगण्याचे शिक्षण देतात. मानवानेही आपल्या बालकांना जीवन जगण्याचे शिक्षण द्यायला हवे.

"Future of the Country" ह्या पुस्तकात ते म्हणतात. Our children are intelligent, they are smart, smarter than the last generation. But their goodness is not broughtout because there is nothing to inspire them we must give them an inspiring Idea, which will bring out of them greater, possibilities that are alaready in then.

"Planet in Crisis" ह्या पुस्तकातील Mental Renaissance ह्या लेखात बालकांच्या सुदृढ विकासासाठी पर्यावरणाची आवश्यकता विषद केली आहे व ह्यात त्यांनी

बालक शिक्षणाची दिग्दर्शन पध्दतीवरही भाष्य केले आहे. बालक शिक्षणात दिग्दर्शनाला प्राधान्य आहे. Children understand not by word, but tby demonstration. जर पालक सुशिक्षीत असतील, मूल्य सांभाळणारी असतील तर त्यांच्या वर्तनात ते दिसायला हवे. केवळ पालक, शिक्षण किंवा शालेय वातावरणच नाही तर सर्वच घटकात सकारात्मक बदल व्हायला हवे. आपण ह्या बाबी हजारो वर्षापासून दुर्लक्षीत केल्या आहेत. ह्यासाठी बदल आवश्यक आहे. शिक्षण प्रणालीत बदल करून ह्याबाबी साध्य होवु शकतील. "Reawakening the human spirit" ह्या लेखात The educational system needs changing पण केवळ पाठ्यपुस्तकातील बदल त्यांना अपेक्षीत नाही, तर पर्यावरणातील वातावरणातील बदल त्यांना अपेक्षीत आहे. It must be an atmosphere of serenity and beauty. विद्यार्थ्यांना सौंदर्याचा आस्वाद घेणारे शिक्षण, आज बालकांना सौंदर्याची संकल्पना शिकवायला हवी. त्यासाठी पालक समर्थ हवे. पालक सौंदर्य शोधून काढण्यास समर्थ हवे. Parents must be able to paint out beauty show them beauty of sunrise and sunset , Train them to see beauty and love. पालकांनी प्रेम अभिव्यक्त करायला हवे व वातावरण निर्मिती करायला हवी. असे केल्यास बालक स्वत:ची मूल्य व मूल्य प्रणाली विकसीत करू शकतो. बदल हा बंदुकीने घडून येत नाही तर शिक्षणाने घडून येतो. ही पंचवार्षिक अथवा दशवार्षिक योजना नाही तर ती आजन्म चालणारी प्रक्रिया आहे. बालकांसाठी Spiritual Education ची एक Informal योजना गुरुदेवांनी आपल्या Advice to Housholder ह्या पुस्तकात दिली आहे. बालक आपल्या पालकाचे निरिक्षण करतो व त्यातून तो शिकतो. पण त्या पलीकडे त्याला Spiritual education देता येईल कां ? ह्या प्रश्नाचे अतिशय सुंदर उत्तर गुरुदेवांनी दिले आहे. बालकांच्या आध्यात्मिक शिक्षणाचे बीज त्यांनी रोवले आहे. ते म्हणतात बालक हा निष्क्रीयपणे आपल्या पालकांचे निरिक्षण करित नाही तर आपण जेव्हा मोठे होतो तेव्हा आपण Art of Passive हस्तगत करतो. कारण जर बालक हा passive observor असेल तर त्याने भाषा कशी हस्तगत केली असती ? मानसशास्त्रीय म्हणतात ह्या वयात बालकाला शैशवावस्थेत जास्तीत जास्त Feeding पेक्षा Rest ची आवश्यकता असते. कारण शैशवावस्थेत ते सजग असतात आणि पुढील आयुष्यापेक्षा ते अधिक शिकतात. ज्ञानग्रहणाची त्याची क्षमता ह्या वयात अत्यंत आश्चर्यकारक असते आणि म्हणुनच ह्या वयात त्यांच्या समोर

आध्यात्मिक वातावरण असणे अत्यंत गरजेचे आहे. ह्यामुळे बालकांचे मानसिक आयुष्याला वळण लागेल.

वय वर्ष ३ ते ५ वर्ष वयात बालकाला राम कृष्ण, येशु, बुध्द ह्यांच्या कथा सांगायला हव्यात. ह्या कथेपासून त्यांच्यात आंतरिक उर्जा निर्माण व्हायला मदत होते.

जेवणाच्या पूर्वी त्यांना प्रार्थना करायला शिकवावे, आणि जेव्हा जेव्हा ते निसर्गाबाबत प्रश्न विचारतील तेव्हा ह्या सर्वांमार्ग इश्वरी ऐश्वर्य कसे आहे ह्याच्या आशयावर आधारीत उत्तरे द्यावी. घरामध्ये एक कोपरा अवश्य असावा. कोपरा प्रार्थनेचा, आपले आईवडील प्रार्थना म्हणतात ह्याचा त्यांना दररोज दिसायला हवे. मूल जेव्हा ८ ते १० वर्ष वयाचे होईल तेव्हा पालकांनी वेळ काढावा व त्याच्या सोबत "The Gospel of Ramkrishna" हे पुस्तक वाचावे.

बालकांना योगासने शिकविण्याची गरज नाही, पण त्यांना सूर्यनमस्कार शिकवावे. पुराणातील तसेच थोर व्यक्तींच्या कथा त्यांना सांगाव्या. ह्या कथातून ते श्रेष्ठ मूल्यांचे संकलन व आकलन करू शकतील व त्यांच्या आदर्शाचे एक मानसिक चित्र त्यांच्या समोर उभे राहील. ह्याच वयात त्यांचे आदर्श घडणे आवश्यक आहे. ह्यावयात त्यांना आसन किंवा प्राणायमाचे धडे देणे अयोग्य होईल. आपल्या बालकाचे भविष्य आपणास उज्वल हवे असेल तर त्यांला योग्य दिशेला वळवावे लागेल.  नविन दृषीकोन नविन पध्दतीचा विचार करायला शिकवावे लागेल. ही अत्यंत हळु चालणारी प्रक्रिया आहे. हे परिवर्तन नाही हा विस्तार आहे, प्रत्येक व्यक्तीच्या चारित्र्याचा.  ही बाब पाठ्यपुस्तकातून साध्य होणार नाही. ह्यासाठी पालकांनीच बदलायला हवे. हे मूल्य संस्कार शाळेतून संथेतून समाजातून होणार नाही तर मूल आपल्या पालकांचे अनुकरण करित असते. आई बालकांना मूल्य व आदर्श देते. ज्याप्रमाणे रोप लहान असतांनाच त्याला योग्य वळण देता येते, त्याच प्रमाणे बालकांला ६ ते १२ वर्षाच्याच काळात संस्कार देता येतात. पण ह्यानंतर मात्र त्याचा Thought Pattern मार्ग बदलता येत नाही. म्हणून ह्या लहान वयातच बालकांना मूल्यांचे प्रशिक्षण द्यायला हवे. ह्याठिकाणी आईची भूमिका महत्वाची आहे. कारण It is the mother alone who imparts the tender emotions and values, who live the Ideal of charity, goodness, tenderness,

affection and Forgiveness. ह्या मूल्यांचे केवळ आइच आपल्या वर्तनात दिग्दर्शन करू शकते. जर आईचीच आध्यात्मिक मूल्ये कमकुवत ठरली तर त्याचा परिणाम बालकांवर होतो. ही बालके मोठी झाल्यावर जेव्हा आपल्या आजुबाजुची मूल्य ठासळतांना पाहतात, तेव्हा ते पलायन स्विकारतात व व्यसनाधीन बनतात आणि म्हणून आईने सर्वप्रथम सांस्कृतिक मूल्ये शिकून घ्यावी आणि म्हणुनच आपण बालकांना केवळ मूल्यच शिकवू नये, केवळ निष्ठाच शिकवू नये तर त्यांचे आदर्श निश्चीत करण्याची व त्या आदर्शानुसार जीवन जगण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करावी. जर आपण आपल्या बालकांच्या बाबतीत असे करू शकु तरच आपण एका सुरक्षीत भविष्यकाळाची निर्मिती करू शकु. आपण दुर्दैवाने आपल्या बालकांनाच दुर्लक्षीत करित आहोत. आपण आपल्या मुलांना वळण देण्याची व त्यांचे व्यक्तिमत्व सुंदर घडविण्याची जबाबदारी घ्यायला हवी.

## १४) युवकांप्रती दृष्टिकोन :-

प.पू. स्वामी चिन्मयानंदांनी जेव्हा युवा केंद्राची स्थापना केली तेव्हा युवकांना root व chwings प्रदान करणे हा त्यांचा दृष्टिकोन होता. अर्थात root of culture व wings of beauty, joy a service ह्या दोन बाबींशिवाय मानवाचे जीवन व्यर्थ आहे, असे त्यांचे मत होते. १९७५ मध्ये त्यांनी युवा केंद्राची स्थापना केली. युवकांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा चिन्मय युवा केंद्राच्या स्थापनेची जी उद्दिष्टे आहे त्यात आढळतो. ह्याचा उल्लेख पहिल्या प्रकरणात करण्यात आला आहे. युवक हे कोणत्याही चळवळीचे आधारस्तंभ असतात. मग ती चळवळ ही क्रांतीची असो किंवा उत्क्रांतीची असो. युवकांनी अशा प्रत्येक चळवळीतून आपले तेज व्यक्त केले आहे. ह्याला जगाचा इतिहास साक्ष आहे. राणी लक्ष्मीबाई, भगतसिंग, राजगुरु, आदी शंकराचार्य हे ह्याची ज्वलंत उदाहरणे आहेत. आधुनिक काळात युवकांनी आपली सुप्त शक्ती ओळखायला हवी, व्यक्तिमत्वाचे विकसन समाज विकासासाठी करायला हवे. ह्यासाठी त्यांनी मार्ग सुचविला तो असा की अशा प्रकारे किमान १०० युवक जमवा जे प्रामाणिक आहेत. जे आपल्या अभ्यास कार्यात विद्वत्तेत हुशार आहेत. ज्यांच्यात आध्यात्मिक आकलन क्षमता आहे. भारतीय सांस्कृतीक प्रेम आहे. ह्यातून गुरुदेवांचे युवकांप्रती असणारे vision लक्षात येते. गुरुदेवांनी युवकांमधील ही क्षमता जाणली होती. त्यांचे मत होते की, "If

the youth are guided properly if their potential is chanalised in the right direction. If they are booted with wholsome amount of spiritual discipline and if their convictions are firmely rooted in the right understanding of our value base system, then such youth nourished with love powered with divine zeal can achive anything. Sky is the limit to their accomplishment, provided someone points out to them how to fly about correctly" आणि हीच जबाबदारी खऱ्या अर्थाने गुरुदेवांनी आपल्या खांद्यावर घेतली. युवकांप्रती त्यांचा विश्वास हाच चिन्मय युवा केंद्राच्या स्थापनेस कारणीभूत ठरला. युवकांना घडविणे म्हणजे राष्ट्राची पुनर्बांधणी करण्याइतके महत्वाचे आहे. युवकांच्या व्यक्तिमत्वातील समन्वय त्यांना अत्यंत महत्वाचा वाटतो. राष्ट्राची पुनर्बांधणी करायची असेल तर युवकांच्या व्यक्तिमत्वाचा समन्वयात्मक विकास व्हायला हवा व त्यातून "Integreted youth" निर्माण व्हायला हवा व ह्यासाठीच त्यांनी युवा केंद्राची स्थापना केली होती. ह्या युवा केंद्राच्या स्थापने मागे त्यांचे जे उद्देश होते ते पहिल्या प्रकरणात देण्यात आले आहेत. त्यावरुनही त्यांचा युवकांच्या प्रति असणारा दृष्टिकोन लक्षात येतो. आज हीच युवा केंद्र अनेक युवकांना आपल्या मानसिक शक्तीचा, क्षमतेचा जास्तीत जास्त वापर कसा करायचा व आपल्या क्षेत्रात कसे यशस्वी व्हायचे याबाबत मार्गदर्शन करीत आहेत. युवकांचे आध्यात्मिक जागरण व त्याचे कृतीत रुपांतर हाच युवाकेंद्राच्या स्थापनेमागील दृष्टिकोन आहे. ह्यालाच गुरुदेवांनी Dynamic Spirituality असे नाव दिले आहे. युवकांमध्ये ही गुणवत्ता विकसित करण्याचे कारण स्पष्ट करतांना ते म्हणतात, "Never before the world needed such dynamism as today and our country needs its most your future job is to uplift the country revitalise and make it a nation." देशाचे रुपांतर जर राष्ट्रात करायचे असेल तर युवकांमध्ये आध्यात्मिकता जागृत करावीच लागेल असे त्यांचे स्पष्ट मत होते. आजचा युवक पाहिल्यावर गुरुदेवांचे हे मत पटल्याशिवाय रहात नाही. कोणतेही भौतिकाचे शास्त्र हे कार्य करु शकत नाही. ही जबाबदारी शिक्षणाची आहे. शिक्षणाच्या माध्यमातून अशाप्रकारचे नेतृत्व निर्माण व्हायला हवे ज्यांच्यात explosive expression, personal magnatism आणि dynamism असेल. ह्यासाठीच धर्म ग्रंथाच्या (seriptures) अभ्यासावर त्यांनी भर दिला आहे. युवा केंद्राच्या माध्यमातून

त्यांना Learning a study atmosphear निर्माण केले आहे. आधुनिक शिक्षण शास्त्रात learning atmosphere ला अत्यंत महत्व आहे. हे निर्माण करतांना युवकांना अभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य निर्माण व्हावे हे महत्वाचे आहे हे म्हणजे knowledge as a excellence आणि perfection in their interaction ह्या दृष्टिकोनातून cultural revival हा त्यामागील महत्वाचा उद्देश आहे. कृतीयुक्त व निष्ठायुक्त जीवन ह्यावर त्यांचा महत्वाचा भर होता. स्वत:च्या कृतीतून इतरांना प्रेरित करण्याची प्रेरणा त्यांनी युवकांना दिली. युवकांची strong army of spiritualing enlightened निर्माण करायची होती. आध्यात्मिक तेजीने युक्त असा युवक असावा. ज्याचे जीवन हे मूल्यांनी परिपूर्ण असावे. आदर्शांनी भारावलेला असा युवक असावा असे त्यांचे मत होते. युवकांमध्ये कार्य प्रेरणेसोबतच कार्यनीतीही असावी. Team work असावे. युवकांनी सातत्याने पुढील बाबींचा विचार करावा. कारण युवकच ही हिम्मत करु शकतो. ह्या बाबत त्यांनी अतिशय मार्मिक विधान केले आहे. "Youth must look ahead youth alone can dare to look ahead the will tend to look back and live in memories. The young is ever full of aspiration hopes plans to build a new world to fit in their demands in life. हे पुढे पाहणे म्हणजेच भूतकालीन अनुभवांच्या आधारावर ज्ञानाची दृष्टीने पाहणे होय. भविष्याची संकल्पना करतांना We must in the wisdom gathered in the past mould the present in to the charm beauty, shape and glory of desirable future. मानवाच्या जडणघडणीची ही संकल्पना अत्यंत महत्वपूर्ण अशी आहे. from past to future हे vision ह्यातून आपल्या लक्षात येते. युवकांना केलेल्या प्रत्येक मार्गदर्शनात गुरुदेवांनी उज्वल भवितव्याबद्दल मार्गदर्शन केले आहे. चिन्मय युवा केंद्राच्या स्थापने मागील आणखी महत्वाचा उद्देश होता तो समाज निर्मिती व सामाजिक आर्थिक सांस्कृतिक विकास हा होय. ह्यासाठी गुरुदेवांचे योगदान श्रेष्ठ आहे. ह्या मागील त्यांचा संदेश आहे try to be independent and self employed आजच्या काळाचा विचार करता व आजची परिस्थिती विचारात घेता हे विचार अत्यंत महत्वपूर्ण वाटतात. प्रत्येक चिन्मय युवाकेंद्र हे work centre बनावे अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी प्रत्येक युवकांनी स्वत:पासूनह्या बाबीची सुरुवात करावी व मनात भावना जनत करावी. "My own city is beautiful each one of you must starts in your own street Senior

chyks should open nursery schools in their premises for maintaining themselves for their means of livehood would not be corrupt" युवकांच्या बद्दल हा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. अर्थात प्रत्येक शिक्षित युवकाने बालकांना शिक्षण देणे व त्यासोबत स्वत: ती मूल्ये धारण करणे ही संकल्पना त्याच्या पाठीमागे आहे. कार्य हे माणसाचे मन व आत्मा शुध्दी करीत असतो. इतरांसाठी कार्य करुन त्यातून स्वत:चाही विकास युवकांनी साधून घ्यावा. ह्या पध्दतीने युवकांनी आपली उपजिविका सुरु केल्यास तो आपल्या तत्वांशी तडजोड करणार नाही. मग हे कार्य केवळ अध्यापनाचेच असेल असे नाही. ते कार्य कोणतेही असू शकेल पण हे कार्य सृजनशील असेल म्हणून युवकांनी सृजनशील विधायक कार्य हाती घ्यायला हवे. युवकाला ज्या कार्याची आवड आहे ते कार्य हाती घेऊन त्याचा मन:पूर्वक सराव करुन त्यात युवकाने प्रावीण्य संपादन करावे. Self funded कार्यावर त्यांचा भर होता. युवकांना सक्षम करण्याची त्यांची ही भावना होती. पण त्यासाठी युवकांनी आपल्यातील सुप्त गुण ओळखायला हवे व त्यातूनच त्या गुणांच्या आधारे सृजनशील व विधायक कार्य हाती घेऊन त्याचे सखोल ज्ञान प्राप्त करुन त्याचा सराव करावा व ह्याच गुणामध्ये कौशल्य प्राप्त करुन त्यचा उपयोग self funded work साठी करावा. त्यायोगे युवकाला उपजिविका प्राप्त होईलच पण आपल्या तत्वांशी व आदर्शाशी प्रामाणिक राहण्याची त्याची धारणा पक्की होईल. तो स्वत: सक्षम होईलच पण त्याचसोबत समाजाचा सुध्दा सृजनशील व विधायक विकास घडून येईल. समाजाचा आर्थिक विकास घडून येईल व आज समाजाला बेकारीमुळे ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे आज समाजातील युवकांची शक्ती ही विधायक मार्गाकडे जाते आहे अशी परिस्थिती आपणास दिसते त्या परिस्थितीवर निश्चितपणे आळा बसेल, नियंत्रण बसेल.

हिंदु तत्वज्ञानाचा हिंदु धर्माचा आज जो चुकीचा अर्थ काढला जातो तसेच आज जी धर्माची हानी झाली आहे त्यात युवकांनी आपले योगदान देवून ही हानी थांबवायला पाहिजे. ह्यासाठी cultural revival महत्वाचे आहे, असे त्यांना वाटते. युवकांबद्दल आणखी महत्वाचे vision म्हणजे राष्ट्रभक्त तयार करणे. गुरुदेवांची राष्ट्रभक्ती प्रखर होती. त्यांना युवकांमध्ये भारतीयत्व व राष्ट्रीयत्व पहायचे होते. एक खरा आध्यात्मिकच खरा राष्ट्रभक्त होऊ शकतो ही त्यांची निष्ठा होती आणि खरा राष्ट्रभक्त खरा आध्यात्मिक असू शकतो ही त्यांची धारणा होती. त्यांनी युवकांसमोर अशा नेत्यांची उदाहरणे दिली ज्यांच्या निष्ठा मूळ हे भागवद् गीता,

उपनिषदात आहे पण त्याचे राष्ट्रीयत्व प्रखर आहे व ज्यांची ध्येये ही राष्ट्रीयत्वाशी निगडीत आहे व हे राष्ट्रीयत्व इतर राष्ट्रांचा नाश करण्यासाठी नाही तर आपल्या देशाची समृध्दता संस्कृती जपणारे हे राष्ट्रीयत्व असावे ही त्यांची इच्छा होती. ते म्हणतात, "He has to make maximum sacrifices. He has a concept of unity to make the country great because he respresents those cultural values. He is the real devoted servent of country. Work for the nation. Regain the past glory of our nation.

युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे हे त्याचे जीवितकार्य होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. राष्ट्राचे उत्थान युवकच करु शकतो. हा त्यांचा दृढविश्वास होता. Youth alone can usher the nation into a new era of cultural revival, spiritual upliftment socio-economic development and mass enlightment.

वर्तमान स्थितीबाबत गुरुदेव समाधानी नव्हते. कोणत्याही देशाची प्रगती ही पूज्यभाव असणाऱ्या बुध्दीवादी माणसांमुळे होत असते. परंतु आज सर्वत्र पशुमानव दिसतो आहे. ह्याबाबत त्यांना अतिशय खंत होती. आज ह्या पशुमानवाला कोणाचीही चाड राहिली नाही. देशाबद्दल पूज्यभाव राहिला नाही. देशाबद्दल प्रेम राहिले नाही. उच्च आदर्श नाही. लोकसंख्या वाढते आहे. तसेच अनेक समस्याही वाढत आहेत. आज कोणत्याही क्षेत्रात भारतीयांचे योगदान कमी आहे. ह्याचे तीव्र दु:ख त्यांनी व्यक्त केले आहे आणि उद्‌गार काढले की, "we can not be proud of our present time." ह्याचे कारण व्यक्त करतांना ते म्हणतात, "we have neglected to tend the present generation when they were young." आपण वर्तमानच दुर्लक्षित करीत आहोत. जर भविष्यकाळ आपल्याला उज्वल बनवायचा असेल तर गुरुदेव म्हणतात, "If the furure is to be bright we have to mould our children to think not in our pattern which is disastrous we have understood but in a new pattern with a new inspiration and with a new vision in their minds." पण आज माता जन्मपूर्व शिक्षण आपल्या बालकांना देत आहेत का? असा प्रश्न गुरुदेवांनी Moulding the youth ह्या लेखात केला आहे. आज आपण

सिनेमा, हॉटेलिग, नाटके ह्याचेच संस्कार त्यांचेवर जन्मपूर्व स्थितीत करतो आणि मग मात्र मूल राक्षसी वृत्तीचे आहे ह्यावर खेद व्यक्त करतो. ह्यावर त्याचा आक्षेप होता ही आपली चूक आहे.

आजच्या वर्तमान स्थितीला आपण स्वत: कारणीभूत आहोत आणि म्हणून उज्वल भविष्याला आकार द्यायचा असेल तर आज बालकांना आकार द्यावा लागेल. ज्यांच्या हाती उद्याच्या भारताचे नेतृत्व आहे त्यांना आपल्याला जीवन दृष्टी (vision) पुरवावे लागेल. पण आज पालकच आपल्या पाल्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. हिटलर एवढा क्रूर झाला कारण त्याचे बालपण कोठेतरी दुर्लक्षित झाले. त्याच्या मनातील वादळ अभिव्यक्त झाले व संपूर्ण जग त्याने उध्वस्त केले. गुरुदेव म्हणतात, "Only when a plant is young and we are sincerly watching it we can train the plant to grow straight a plant can be trained but not a tree." ह्या वाक्यावरुन त्यांचे शिक्षणाबाबतची दृष्टी लक्षात येते. लहानपणी होणारे संस्कार महत्वपूर्ण आहे. मूल संस्कारक्षम अवस्थेत असतांना त्यावर योग्य संस्कार झाले नाहीत तर हेच मुल जेव्हा युवक बनते व आजूबाजूची परिस्थिती न्याहाळते तेव्हा त्याला मूल्य ढासळलेली आढळतात. त्यांना आजूबाजूच्या परिस्थितीत समाधान आढळत नाही वा ते ह्या परिस्थितीतून पलायनवाद स्विकारतात व ते व्यसनाकडे वळतात. आत्मघाताचा मार्ग ते स्विकारतात. पण हे टाळायचे असेल तर त्यांचा वर्तमान हा सुंदर बनवावा लागेल. ह्यासाठी गुरुदेवांनी महिलांना सल्ला दिला आहे तो सांस्कृतिक शिक्षणाचा, मूल्य शिक्षणाचा. आता संस्कृती शिक्षण व मूल्य शिक्षण हे महिलांनी घेणे, मातांनी घेणे अनिवार्य आहे. ज्याप्रमाणे शारीरिक दृष्ट्या आजारी असणाऱ्या महिलांनी बालकांना जन्म देऊ नये असा डॉक्टरी सल्ला दिला जातो. त्याचप्रमाणे मानसिकदृष्ट्या सक्षम नसणाऱ्या मातांनी सुध्दा बालकांना जन्म देऊ नये. युवकांच्या शिक्षणात माता म्हणून स्त्री शिक्षण विषयक त्यांचा दृष्टिकोनही अत्यंत महत्वाचा ठरतो.

ह्या ठिकाणी एका वास्तविकतेकडे ते सर्वांचे लक्ष वेधू इच्छितात. "Dont point out that it is a political situation political and economic situation are lived by whom? By people so it is the people who creat the good or bad

destiny for the society or country and the people were once children but when not moulded carefully they became ugly in their charachter in their attitude in their behavior and as a result the chaos came."

युवकांची कर्तव्य कोणती आहेत ह्याबाबत 'Youth your duty' ह्या लेखात त्यांनी युवकांना मार्गदर्शन केले आहे. आजवर सर्व क्रांतीकारी बदल हे युवकांमुळे घडले आहे. त्यांना योग्य निर्णय व क्षमता यांचे नियोजन करण्याचे ज्ञान आवश्यक आहे. धर्म विज्ञान, राजकारण ह्यांच्यातील चांगल्या पध्दती राखण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी असायला हवे. नवीन विचारांना त्यांनी आकार द्यायला हवा. ते आपली शक्ती अनावश्यक ठिकाणी खर्ची टाकत आहेत. नियोजनबध्द अभ्यास त्यांनी सर्व परिस्थितीचा करायला हवा. त्यांनी स्वत:ला Judge करावे व क्रिया त्यांच्या निष्ठेतून घडावी व त्यातून त्यांनी जीवनाची प्रेरणा मिळावी. Their plan and vision must come from within their patriotism, love for society and loyalty to the country असे नेतृत्व खूप मोठा बदल घडवून आणू शकते. युवकांच्या बुध्दीमत्तेने चुकीच्या दिशेने जाणे त्यांना मान्य नव्हते. वर्तमान हा भूतकाळातून निर्माण झाला व वर्तमानातूनच भविष्याची निर्मिती होणार आहे आणि म्हणूनच आजच्या युवकांवर जबाबदारी आहे. युवक एकत्र यायला हवा. त्याने सशक्त राष्ट्रासाठी कार्य करायला हवे. समाजातील corrupted व cancerous personalities ह्या युवकांच्याच विरोधातून नाहीशा होवू शकतात. हे सर्व गुंडागर्दीने साध्य होणार नाही तर नियोजन व नियोजनाची निष्ठापूर्वक अंमलबजावणी ह्यासाठी महत्वाची ठरते आणि म्हणूनच युवकांनी काय करावे ह्याबाबतही मार्गदर्शन केले आहे.

१) acquire knowledge

२) judge yourself

३) learn to sit togather to take decision to curve out the future

४) you must get inspired by an ideal then dedicate to it

५) you must take the nation to a new sunrise but not with guns

युवकांना दिलेला हा सल्ला अत्यंत मोलाचा आहे. आपला देश हा विविधतेने नटलेला देश आहे. पण एक बाब सर्वांना बांधून आहे. गुरुदेवांच्या मते ही बाब म्हणजे Hinduism होय. युवकांच्या ध्येयात, कार्यात सुव्यवस्थित पणा असायला हवा. अशा सुसंगतीत पणातच सौंदर्य असते. ज्या ठिकाणी सुसंगत पणा नसतो तेथे कुरुपता असते. मानवी शरीराच्या बाबतीत जशी ही बाब लागू आहे तशीच सृष्टीतल्या प्रत्येक बाबतीत ही बाब आपणास मान्य करावी लागते आणि म्हणूनच त्यांचे हे वाक्य अतिशय प्रसिध्द आहे. Symmetry is the secret of beauty आजच्या शिक्षणप्रणालीतून नेमकी हीच बाब दुर्लक्षित झाली आहे. युवकांचा Integrated Development होत नाही. ह्याची वारंवार खंत त्यांच्या लेखनात आपणास जाणवते. आजच्या युवकांमधून असा युक्त पुरुष निर्माण व्हायला हवा. ज्याचा शारीरिक, मानसिक, बौध्दीक, भावनिक व आध्यात्मिक विकास हा सुसंगतपणे झाला असेल. असा युवकच केवळ वर्तमानाला आकार देऊ शकतो. आज समाजात युवकांची जी परिस्थिती आहे. त्यावर ह्याच लेखात गुरुदेवांनी प्रकाश टाकला आहे. आज युवकांमध्ये बुध्दीमत्ता आहे पण आपल्या कुटुंबाबद्दल, समाजाबद्दल, राष्ट्राबद्दल कुठलेही प्रेम नाही. हा केवळ बुध्दीवाद आहे. ह्यासाठी ऋषिंनी जो आत्मचिंतनाचा (contemplation) मार्ग सांगितला त्याचा पुनरुच्चार गुरुदेवांनी केला आहे. आत्मचिंतनातून वैश्विक प्रेमाची भावना मनात रुजून ती वृध्दिंगत व्हायला हवी ह्यावर त्यांनी भर दिला. आपले आदर्श आपण पक्के करायला हवे व त्याची नित्य पूजा करायला हवी. Heart and Head must be developed. कारण बौध्दिक दृष्ट्या आपल्याला जीवनाचा चांगला मार्ग कोणता हे कळते आणि जेव्हा मी त्याचे आचरण करतो व त्याचे महत्व मला कळते तेव्हा मी माझी जीवन निष्ठ बनते. हीच बाब आपल्या देशात युवकांमध्ये नाही हे त्यांचे दु:ख होते. ते म्हणतात, "We must strive hard to live that conviction" अशा निष्ठेतूनच संस्कृती संरक्षण व राष्ट्राची निर्मिती होते. युवकांच्या पाश्चात्य अनुकरण करण्याच्या वृत्तीला त्यांचा कडाडून विरोध होता. युवकांमधील "I know who I am" ही भावना विकसित करण्यावर त्यांनी भर दिला आहे ही केवळ राष्ट्रनिष्ठेतूनच निर्माण होऊ शकते.

युवकांमध्ये समस्या सोडविण्याचे सामर्थ्य निर्माण व्हायला हवे असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. समस्या सोडविण्याची प्रत्येकाची क्षमता सारखी नसते. कारण

difference in quality of personality अर्थात व्यक्तिमत्वाच्या गुणवत्तेवर त्यांनी भर दिला आहे. Sky is limit ह्या लेखात ते म्हणतात, excellence in personality depends upon certain inner qualities of one who is putting forth of the work. युवकांनी स्वत: आदर्शप्रत न्यायला हवे. आदर्श हे आध्यात्मिकच असेल असे नाही. स्वत:चा आदर हाच इतरांच्या आदराचा मार्ग बनू शकतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीमध्ये self respect असायला हवा. Self respect हा इतरांकडून आदर मिळविण्याची पहिली पायरी आहे. हे करीत असतांना मानवाला अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागेल. पण लक्षात ठेवा Sky is limit. Prepare your self to face all situation and challenges with excellence on your part युवकांच्या व्यक्तिमत्वाचा हा भाग त्यांना अत्यंत महत्वाचा वाटतो.

अशा ह्या असमतोला पासून फक्त युवकच देशाला वाचवू शकतो. हा दुर्दम्य आशावाद त्याच्याजवळ आहे. ह्यासाठी युवकामध्ये पुढील गुण आवश्यक आहेत, असे ते मानतात. ते गुण म्हणजे, self confidence, self respect, proud of their country, prepared to work to rebuilt it. आपण देशाला काय देऊ शकतो ह्याचा प्रत्येक युवकाने विचार करायला हवा. देशासाठी काही करण्याची नेत्यांकडून अपेक्षा करण्याच्या ते विरोधात होते. म्हणूनच March of youth ह्या लेखात ते युवकांना आव्हान करतात, "When you start maching in the right direction with the right inspiration in your self you shall find a long. Crowed behind you. So rise above the limitation see in one sweep the past present and the possible future." युवकांना केलेले हे आव्हान आजच्या काळात ही अतिशय योग्य आहे. जोवर युवक हा संस्कृती आपल्या जीवनात प्रत्यक्ष उतरवीत नाही जोवर तो स्वत:च्या संस्कृतीवर प्रेम करायला शिकत नाही तोवर तो विश्व संस्कृती आत्मसात करु शकत नाही. आज शिकलेला मानव हा जागतिक दहशतवादास कारणीभूत ठरतो आहे ही वेदना young ambassador ह्या लेखात आपल्याला आढळते. ह्यात भारतीय युवक विदेशात जातात पण तेथे स्वत:ची संस्कृती नेत नाहीत. ह्या उलट विदेशी संस्कृतीचे ते चटकन अनुकरण करतात पण पाश्चात्य लोक भारतात येतात व भारतीय संस्कृतीविषयी जिज्ञासा बाळगतात आणि म्हणूनच किमान ६ महिने पर्यंत भारतीय संस्कृतीचे

प्रशिक्षण युवकांना द्यावे असा आग्रह त्यांनी धरला आहे. भारतीय किनारा सोडण्यापूर्वी हे प्रशिक्षण अनिवार्यपणे देण्यात यावे. मानवाचे मन दुर्लक्षित झाले आहे मनाचे उपकरण हे सक्षम असणे आवश्यक आहे. मन:शांती अतिशय महत्वाची आहे. प्रत्येकाने आपल्या मनाची शांती अबाधित राहील ह्याची खबरदारी घेणे आवश्यक आहे ह्यासाठी गुरुदेवांनी योगशास्त्राचा अभ्यास महत्वपूर्ण मानला आहे. Hoby of loving ह्या लेखात गुरुदेव म्हणतात, "The yoga shastra prescribe various method of tunning the mind and when the mind is tuned up action will be excellent and ultimately give you achievement." कृतीमध्ये सर्वोत्कृष्टता येण्यासाठी मनाची शांतता व समत्वता महत्वाची आहे. Is God Blind Deal and Dumb? ह्या लेखात गुरुदेवांनी युवकांच्या व देशाच्या आजच्या स्थितीचे अतिशय मार्मिक वर्णन केले आहे. ह्या लेखात युवकांना पुरेसा अनुभव नाही. युवकांचे अनुभव समृध्द नाही. ह्याबाबत खेद व्यक्त केला आहे. युवका हा अनुभव समृध्द होण्यासाठी युवकाला सामाजिक व राजकीय क्षेत्राबाबत विचार व कृती करण्याची क्षमता विकसित करण्याचे प्रशिक्षण द्यायला हवे. आजच्या सामाजिक स्थितीचे वर्णन त्यांनी ह्याच लेखात अतिशय मार्मिकपणे केले आहे. "The inexperienced, unprepared leaders lead the society and every department of its activity into a mess. Commerce is ruined, finance gets shaky, economics become jeopardised, production alwindle, communications stalled education distributed, religions lost, culture blasted." आज देशाची परिस्थिती अत्यंत भयावह आहे. समाजाची परिस्थिती बिकट आहे. अशा परिस्थितीत आज आपण युवकांना कोणत्या प्रकारे घडवित आहोत हे महत्वाचे आहे. आज युवक अत्यंत तुटपुंज्या ज्ञानावर राजकारणात प्रवेश करतो आहे. आपल्या मागे अत्यंत असंतुलीत गर्दी खेचतो. They are a screaming crowd of unbalance, unintelligent unprepared young people in no way sane and faroeeing and more than the noisy wild, mad, irresistible mob, that they stir up and lead to destruction." ह्याचे परिणाम अत्यंत विघातक झालेले आहेत. हे परिणाम म्हणजे sacrifice without social benifit, distruction without social progress, sorrow and poverty in crease, national security and strength weaken." आज स्वातंत्र्याचा आशय हा

विसरत चालला आहे. आज कुणातही स्वयंशिस्त राहिली नाही. पालकांनी सुध्दा आपल्या पाल्याला शाळेत काय शिकविले जात आहे. ह्याबाबत जागृत राहण्याचा सल्लाही ह्यात देण्यात आला आहे. एक अत्यंत महत्वाच्या बाबीवर ह्यात प्रकाश टाकण्यात आला आहे. तो म्हणजे parents need to be parents कारण आज अनेक युवक हे गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहेत. नवनवीन गुन्हेगार घडत आहेत. युवक आज धार्मिक संकल्पना, मूल्य, संस्कृती नाकारत आहेत. ही अत्यंत भयावह बाब आहे व ह्याबाबत खंत त्यांनी व्यक्त केली आहे. "Bharat is no more Bharat" ही अत्यंत महत्वाची खंत आहे. कोणत्याही समाजाची प्रगती शांतता, सामर्थ्य, समृध्दी, आरोग्य, शिक्षण, कायदा हे सर्व त्या देशातील व्यक्तीच्या त्यागाचे प्रतिफल असते. देशाच्या प्रगतीसाठी चार बाबी महत्वाच्या आहेत. त्या म्हणजे sacrifice, vigilance, teamwork and self discipline जो समाज ह्या बाबी नाकारतो त्या समाजाची अधोगती होते, असा इशाराही ह्या लेखात ते देतात. ह्यासाठी महत्वाची बाब व्यक्त करतांना ते म्हणतात अशा व्यकतींना शासन करा. Curb them, punish them, letus grow in to a nation of self disciplined self controlled men and woman young in body but wise in head असा अत्यंत प्रेमाचा सल्लाही त्यांनी दिला आहे. Our Debts ह्या लेखात ऋण संकल्पना व्यक्त करुन युवकांच्या मनाला त्यांनी प्रशिक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाने प्रत्येक घटकाचे ऋणी असायला हवे. मग त्यात निसर्ग, राष्ट्र, समाज, कुटुंब ह्या सर्वांचा समावेश आहे. भारतीय संस्कृती ऋण संकल्पनेवर आधारीत आहे.

Youth Fortification ह्या लेखात (Chinmaya Udghosh Sept. 2005) ह्या लेखात युवकांची संकल्पना गुरुदेवांनी मांडली आहे. तसेच युवकांना आपल्या यशस्वी जीवनाबाबत संदेश दिला आहे. तसेच युवकांना कोणत्या प्रकारच्या शिक्षणाची युवावस्थेत आवश्यकता आहे. ह्याचेही मार्गदर्शन ह्यालेखात आढळते. ते म्हणतात मानव हा एकमेव असा प्राणी आहे. तो हळूहळू विकसित होतो. ९ महिने आईच्या गर्भात एक वर्ष आईच्या मांडीवर व त्यानंतर आईचे बोट धरुन तो चालायला शिकतो. वयाच्या १२ व्या वर्षी त्याला अचानक पणे जाणवायला लागते, तो निर्णय घेऊ शकतो. पण कसे हे त्याला ठाऊक नसते. ह्या काळात त्याला त्याच्या नवीन उपकरणाचा शोध लागलेला असतो. ते उपकरण म्हणजे त्याची बुध्दीमत्ता. ह्याच उपकरणाचा उपयोग शिक्षण प्रक्रियेत करावा. ह्या संदर्भात गुरुदेव म्हणतात,

"In order to teach him how to judge using the new equipment he has found the intellect. The education process goes on till the age of 20 or 22. Then he requires 2-3 years to practice in proffession. So it is only by 25 years that the student realy becomes equipped with the right understading in a perticular profession in life."

२५ व्या वर्षापर्यंत युवक हा व्यावसायिक दृष्ट्या तयार व्हायला हवा व ह्याच वयात आपल्या बुध्दीमत्तेचा वापर कसा करावा हे त्याला समजायला हवे कारण जेव्हा तो खऱ्या अर्थाने जीवनाच्या दालनात प्रवेश करतो त्यावेळी सर्व बाजूंनी त्याला आव्हानांना सामोरे जावे लागते. ही आव्हाने टाळता येण्या सारखी नसतात. अशावेळी त्याच्या समोर काही प्रश्न असतात.

१) How to meet the problems

२) When it is solved then is it moraly right or wrong?

३) It is beautiful or ugly?

अशावेळी युवकाची स्थिती ही रणांगणावरच्या अर्जुनासारखी होते. पण ज्याप्रमाणे शेवटच्या अध्यायात अर्जुन पुन्हा युध्दाला तयार झाला कारण त्याच्यातील आंतरिक शांततेचा शोध लागला व समस्या ही समस्या म्हणून त्याला वाटेनासी झाली. ह्या ठिकाणी व्यक्तीच्या स्वत:चा आंतरिक विकास महत्वाचा ठरतो. भागवद्गीतेतील १८ व्या अध्यायात बाह्य परिस्थिती तीच आहे पण Mental attitude बदललेला आहे, हा महत्वाचा आहे. माणसाचा Mental attitude बदलला की त्याला त्याच्या अंतर्गत शक्तीचा शोध लागतो व तो समस्या सोडवू शकतो. आज प्रत्येक व्यक्ती जीवन संग्रामात उभी असतांना जर व्यक्तीला आपल्या अंतर्गत शक्तीचा शोध लागला नाही तर तो समस्यांशी सामना कसा करणार? गुरुदेव म्हणतात, "Problem are not faced by the physical body" शरीर हे केवळ साधन आहे. मन आणि बुध्दीची सक्रियता महत्वाची आहे. जर मन आणि बुदीची निष्क्रीयता असेल तर व्यक्ती कितीही चांगल्या ठिकाणी असली तरी तिला दु:खाचीची प्राप्ती होते. जर मनाची शांत अवस्था नसेल तर सृजनशीलता कार्यरत होत नाही. म्हणून शांत मनाचा सृजनशील युवक ही काळाची मागणी

भविष्यात असेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला आहे. अशा प्रकारच्या युवकांची गरज व्यक्त करतांना ते म्हणतात, "Be prepared right now on a warfooting because the situation has become suffocatingly insufferable. At all realsm at all levels there is immorality vulgarity and it has gone to the very sout of our society it is the time to grow up" राष्ट्राच्या अपेक्षा आता युवकांकडून आहेत. युवकांना आव्हान करतांना गुरुदेव ह्याच लेखात म्हणतात, "The Nations hopes and expectations rest on you. It has been proved in the past it is being proved today and it shall be proved in the future. It is a call to share this knowledge for which we have called you here." युवकांना केलेले हे आव्हान आजच्या काळातही अतिशय महत्वपूर्ण असे आहे.

युवकांकरिता आणखी एक अत्यंत महत्वाची बाब ते मानतात ते म्हणजे राष्ट्रऋण, भारतीय संस्कृतीचे, मातृऋण, पितृऋण, समाजऋण, देवऋण मानले ह्या ऋण संकल्पनेत गुरुदेवांनी अत्यंत महत्वाची अशी भर टाकली व ती म्हणजे राष्ट्र ऋणाची युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी ही संकल्पना अत्यंत महत्वाची ठरते. मानवाने प्रत्येकाच्या प्रति आपली ऋणाची भावना ठेवणे आवश्यक आहे. ह्या जगतात समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक घटकांच्या प्रति आपण ऋणी असायला हवं हा दृष्टिकोन त्यांनी Our Debt ह्या लेखात मांडला. केवळ बाह्य जगताच्याच बद्दल ऋणी असावे असे नाही तर मानवाला प्राप्त झालेल्या ज्ञान उपकरणाच्या मागील शक्तीच्या प्रतिही आपण ऋणी असावे, असा महत्वपूर्ण विचार ह्या लेखात आपणास आढळतो. ही शक्ती फक्त मानवातच आहे. पण ह्या शक्तीचा उपयोग मानव करीत नाही. त्याची त्याला जाणीव होत नाही. ह्याबाबत त्यांनी खंत व्यक्त केली आहे. "Man may be born as a congenital idiot but he can grow in to greatet genius of the era." पण मानव तसे करत नाही. गुरुदेव म्हणतात प्रत्येकामध्ये वृध्दींगत होण्याची क्षमता व शक्यता असते. त्यासाठी त्यांनी गौतमबुध्द, जीझस व विवेकानंद ह्यांचे उदा. दिले आहे. त्यावेळी हा अपघात होता अशा युवकांच्या संभाव्य उत्तरावर ते प्रश्न करतात की हे अपघात भूतकाळात घडले मग ते वर्तमानात का नाही ? We don't study Shastras आजच आपण आपल्या मुलाच्या मनात राष्ट्रऋणाची भावना निर्माण

करायला हवी. निसर्गाचा कायदा प्रत्येकाने पाळायला हवा. If you can make use of fire you can cook food. Misure it and the whole house can burn in it. बंदुकीने माणूस स्वत:चे संरक्षण करु शकतो त्यासोबत इतरांना मारु शकतो. म्हणून प्रत्येकाने देवऋण, शास्त्रऋण पाळायलाच हवे. पण त्या सोबत आत्मऋण ही सांळायला हवे. आत्मऋण फेडल्या शिवाय आध्यात्मिक प्रगती होत नाही व त्याकरिता ज्ञानाची कास धरालया हवी. त्यासोबत ह्या सृष्टीतील चैतन्याचे भान प्रत्येकाने ठेवायला हवे. युवकांकडून ते अपेक्षा व्यक्त करतांना म्हणतात, "Chyks you are hopeful youngster who are growing up to be the next leaders of our country. The future of the Nation is weighting upon your shoulders. You must slowly understand that we have to repay these debts and redeem our Nation as mush as we can. But to the extent you get released from these debts, you burst forth upon the surface of the earth with your abilities capacities and the excellence of your performance and become great contributors to the history of this country." हे कार्य युवक करु शकतात असा त्यांना दृढ विश्वास आहे पण हे सर्व शास्त्राभ्यासानेच शक्य आहे.

युवक हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहे. ते सामाजिक कार्य करणारी समाज सेवकांची सेवा आहे पण समाज त्यांना तेव्हाच स्विकारेल जेव्हा ते आत्मविकसनाचा व मानवनिर्मितीचा अभ्यास करतील आणि ह्यासाठीच त्यांनी युवा केंद्राची स्थापना केली व युवा केंद्राची ध्येय निर्धारीत केली (प्रथम प्रकरणात त्याचा उल्लेख आहे) व युवाकेंद्राकडून त्यांनी अपेक्षा व विश्वास व्यक्त केला.

If One Gandhi could inspire so many at that time, our chyk members can inspire the youth our chyk members alone have the vision, the understanding the readiness to make sacrifices if only they take it up.

युवकांप्रति दृष्टिकोन व्यक्त करणारे त्यांचे पुढील वाक्य अत्यंत महत्वाचे ठरतात. भाषांतरातील दोष टाळण्यासाठी ते जसेच्या तसे ह्या ठिकाणी देण्यांत येत आहे.

1) Youth has to be geared up to work to acquire and having acquired to distribute for a healthy Nation. Unless the yough of today are vigilant dynamic and smart, the nation and their future will sink.

2) Youth must look ahead, youth alone can dare look ahead. The old will tend to look back and live in memories. This looking ahead must be through the eyes sharpened with the knowledge of his past experiences.

3) Fix up a goal appart from a mere carreer and live through professional and domestic life, ever determined to move ahead towards that goal of subjective perfection peace and cheer balance and goodness. Shraddha and Samadhan are the very archways to the palace of truth.

4) You chyks are now our only hope when the younger generation comes to feel inspired by a programme of revival. It gathers momentum and floods the hearts of that generation with a new spirit of coverage and goodwill.

5) Out of the country be prepared. It is not going to be a rossy future. You have to be pioneers of rebuilding the nation. We might have got political freedom but we have psychologically relieved ourselves from the medievialism of our mind. By a little Lock and Roll you do not become modern. You become modern only after re-integrating the personality.

6) A true and selfless Sankalpa when it rises in an individuals heart and when that sankalpa is constantly worked out by disciplined team of workers becomes Lords own expression success alone must rise from it.

7) Never before the world needed dynamism as today and our country.

गुरुदेव जेव्हा युवकांचा विकासाबाबत अथवा शक्तीबाबत भाष्य करतात तेव्हा त्यांना शारिरीक विकास अपेक्षित नाही तर त्यांचसोबत युवकांचा चारित्र्य विकास व अध्यात्मिक आत्मविकसन अपेक्षीत आहे आणि ह्याचा शोध घेण्याची पात्रता युवकांमध्ये विकसित व्हावी असाच त्यांचा दृष्टीकोण होतो व ह्यासाठी गुरुदेवांनी युवकांना मार्गदर्शन केले आहे. यवुकांच्या अध्यामिक विकसनाची त्यांनी आपल्या विचारातून एक योजनाच दिली आहे. ज्यांच्यावर राष्ट्राचे भविष्य अवलंबून आहे असा युवक त्यांना अपेक्षित होता व त्यासाठी त्यांचा शारिरीक मानसिक, बौध्दिक व अध्यात्मिक घटकांचा अध्यात्मिक विकास होणे अनिवार्य आहे. शिवाय हा विकास समन्वयात्मक असावा व त्याकरिता त्यांना योग्य ते वातावरण समाजाने उपलब्ध करून द्यावे. जेणे करून त्यांच्या मनात राष्ट्रप्रेम, संस्कृतीप्रेम, राष्ट्राभिमान निर्माण व्हावा. शिवाय युवकांना नि:स्वार्थ पणे कार्य करता येईल अशी परिथिती समाजानेही त्याला उपलब्ध करून द्यावी. समाजातही उपलब्ध असावी. हे कार्य करित असतांना त्याच्या मनात कोणताही अहंकार येवू नये ही बाब महत्वाची ठरते. ह्यासाठी युवकांनी गीताभ्यास, उपनिषदांचा अभ्यास करावा असे त्यांनी ठामपणे नमुद केले आहे. कारण गीताभ्यासातून जीवन परिवर्तन शक्य आहे. गीताभ्यासातून गुरुदेवांना ‘‘कर्मयोगी तरूण’’ अपेक्षित आहे आणि म्हणुनच गुरुदेवांनी युवकांवर मनापासून प्रेम केले. युवकांप्रती त्यांनी नेहमीच उच्च विचार केला. युवकांमधील सुक्ष्म शक्तींवर त्यांचा विश्वास होता. समाजाच्या राष्ट्राचा विकासात युवकांचे योगदान महत्वाचे ठरते असेच त्यांचे मत होते. युवक हा राष्ट्राचा कणा आहे. स्वामी चिदात्मानंद म्हणतात, "Pujya Gurudeo saw the youth as an avalanche of energy, brimming within them for expression. He respond his hope in them fully. Hence the yough came to occupy the uppermost place in his heart. युवकांमध्ये त्यांनी पूर्ण जगाचे भवितव्य पाहिले होते. युवकांच्या हाती राष्ट्राचे, जगाचे भवितव्य सुरक्षित आहे असा दुर्दम्य आशावाद त्यांच्या ठिकाणी होता. आणि म्हणुनच राष्ट्राचा नागरिक म्हणून त्यांना घडविणे ह्याला त्यांनी प्राधान्य दिले. स्वामी चिदात्मानंद युवकांबद्दल गुरुदेवांची दृष्टी स्पष्ट करतांना म्हणतात, "Tremendous source of potential energy if given a right guidance, unleashes great dynamism and actieves mighty possibilities. Gurudeo saw this tremendous resource base in our nations

youth. Hence they meant the most to him".

स्वामी मित्रानंद म्हणतात, "The youth of Gurudeo's heart was one who channelised ones energies and brought out the best at every moment unfolding the latent potential".


गुरुदेवांच्या मनात युवकांबद्दल dynamic vision होते. स्वामींनी शारदा प्रीयानंदा गुरुदेवांची दृष्टी व्यक्त करतांना म्हणतात, "Break the shell, spread the wings and soar to hights. This is the clarion call given by Pujya Gurudeo to the youth all over the world". युवकांमधील शक्ती गुरुदेवांनी ओळखली होती. स्वामिनी सविदानंदा म्हणतात, "The youth was Gurudevs hope and he visualised them to be dedicated patriots and dynamic Youngsters. स्वामिनी निरंजानंदा म्हणतात, "The youth in the heart of Gurudev was strong youth ready to sustain one and all through selfless work and devotion".

प. पु. गुरुदेवांनी युवकांवर निरातिशय प्रेम केले. युवकांकडुन तीन मूल्याचरणांवर त्यांनी भर दिला आहे. सत्य, अहिंसा व ब्रम्हचर्य युवकांसाठी त्यांनी आपल्या अनमोल वाणीचे द्वार नेहमीच उघडे ठवेले. ते युवकांचा आदर करित असत आणि म्हणुनच चिन्मय युवा केंद्राच्या सदस्यांना ते Soldiers for protection of the rich Indian ethos, Hindu culture असे संबोधित असत. उच्च विचार करण्याबाबत त्यांनी युवकांना नेहमीच प्रोत्साहीत केले.

आजचे शिक्षण व युवक ह्यावर 'मानव निर्माण की कला' ह्या पुस्तकात प्रकाश त्यांनी टाकला आहे. ते म्हणतात, "शिक्षणाच्या माध्यमातून युवकांमध्ये सामान्य कार्यकुशलता निर्माण झाली आहे. पण त्यांना आपल्या ज्ञानास आपल्या कार्यक्षेत्रात सफलतापूर्वक उपयोग कसा करावा याची युक्ती अद्याप निर्माण झाली नाही. यवुकांमध्ये विविध योजना बनविण्याचा स्वभाव असतो, कार्य करण्याची दुर्दम्य इच्छा असते, तो नवनविन कामना इच्छा करित असतो. नवनविन कल्पना करित असतो. युवकांच्या ह्या साहसी क्रियाशक्तीला योग्य


वळण देण्याची आवश्यकता आहे. जीवनातील समाजाचे अध्ययन करण्याची व जीवनाचे आकलन करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होणे आवश्यक आहे. ह्या अध्ययनामुळे त्यांच्यात एक विशेश प्रकारचे मानसिक संतुलन निर्माण होईल आणि ज्या क्षेत्रात ते कार्य करतील तेथे त्यांना विशेष त्रृटी निर्माण होणार नाहीत. मन आणि बुध्दीच्या संतुलनाने युवक रचनात्मक योजना बनवू शकतील व ते आपल्या कार्यक्षेत्रात यशस्वी होतील. "आत्मविकास कि निदेर्शिका" ह्या पुस्तकात त्यांनी युवाशक्तीच्या प्रगटीकरणाबद्दल विवेचन केले आहे. व्यक्तीमध्ये सुक्ष्म असणारी शक्ति ही बाल्यावस्थेत अथवा वृध्दावसेत अभिव्यक्त होत नाही, ती युवावस्थेत प्रगट होते. युवकांमध्ये प्रचंड शक्ती असते, ती सूक्ष्म असते, युवक इतिहास घडवु शकतो. त्यांच्यात ते सामर्थ्य असते, परंतु त्यांच्या शक्तीला योग्य दिशा द्यावयास हवी, त्यांची शक्ती उत्पादक कार्यात लावायला हवी. अन्यथा ही शक्ती उपद्रवी कार्याकडे वळेल हा अत्यंत महत्वपूर्ण विचार त्यांनी मांडला आहे. इतिहास घडविण्यात युवाशक्ती ही अग्रेसर असते, ही शक्तीच त्यांच्या जीवनाची अभिव्यक्ती असते. ह्या शक्तीच्या बाबतीत तीन बाबी महत्वाच्या ठरतात. १. शक्ती उत्पन्न करणे, २. शक्ती संग्रहीत करणे, ३. निर्दीष्ट दिशेत त्या शक्तीचा उपयोग करणे.

युवकांमध्ये वरिल तीन घटकांबाबत जाणीव उत्पन्न करायला हवी व ह्यासाठी त्यांच्या समोर उच्च आदर्श ठेवावे लागतील व आदर्शाबाबत त्यांच्या मनात प्रेम उत्पन्न करावे लागेल. आदर्शाप्रति समर्पणाची भावना निर्माण करणे आवश्यक ठरते. ह्या आदर्शामुळेच त्यांच्या ठिकाणी शक्ती संचार होईल. ह्या ठिकाणी योग्य आदर्शांची निवड करण्याची पात्रता युवकांमध्ये निर्माण व्हायला हवी. हे आदर्श प्रेरणादायी हवे, आदर्श जेवढे उच्च तेवढे कार्य उदात्त होईल व आतल्या शक्तीचा अखंडे स्त्रोत त्यांना प्राप्त होईल. ही बाब पुढील आकृतीवरून अधिक स्पष्ट होते.




## ४.३) मानवी शक्ती संचय

ह्या शक्तीचा संबंध माणूस करतो पण त्याचा क्षयही होतो.




## ४.४) मानवी शक्ती क्षय

ह्या बाबत युवकांना सजग करायला हवे. गुरुदेवांनी ह्यासाठी तीन बाबींवर भर दिला आहे, त्या तीन बाबी म्हणजे, १. स्वाध्याय, २. जप, ३. श्रवण. हे तीन अध्ययनाचे मार्ग यांनी सांगीतले आहे.

अशारितीने युवकांप्रती दृष्टिकोन मांडण्यात आलेला आहे.

## १५) सद्यस्थिती :-

आज समाजाची स्थिती अत्यंत बिकट झालेली आहे. ह्या स्थितीवर आपल्या विविध लिखाणातून गुरुदेवांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने प्रकाश टाकला आहे तो पुढीलप्रमाणे.

### १) कुटुंबव्यवस्था :-

हिंदू संस्कृतीनुसार कुटुंब हा समाजाचा घटक मानला जातो. जुन्या वळणाच्या कुटुंबात वडील, चुलते इत्यादी कडक शिस्त राखीत व कुटुंबातील मंडळींमध्ये पूर्ण एकता आणि त्यायोगे संपूर्ण कुटुंबाच्या जीवनाचा आदर्श राखला जाई. याउलट आजकाल युवक मिसरुड फुटली नाही तोच लग्न करतो. वडीलधाऱ्यांचा शिस्तपूर्ण प्रभाव झुगारुन देऊन आणि सर्व सामाजिक रितीरिवाज झिडकारुन मन मानेल त्याप्रमाणे स्वैराचारी जीवन जगू लागतो. अर्थातच अशा स्थितीत कोणतेही आत्मसंयमन अथवा आत्मशिस्तही नसते. आताचा क्षण साजरा करणे हाच तेथे जीवनाचा नियम बनतो आणि कसेही करुन आपल्या स्वत:ची इच्छापूर्ती करणे ती कितीही हलक्या दर्जाची असो. त्या काळात समाजाचा घटक जीवनाच्या दर्जाची standard of life ची काळजी करित होता पण आज व्यक्ती standard of living ची काळजी करतो. वरील विवेचनावरुन लक्षात येते की, आज कुटुंबव्यवस्थेचे महत्व हे नगण्य मानण्यात येत आहे. कुटुंबव्यवस्थेचे विघटन झाले आहे ते माणूस हा standard of living जपण्यासाठी अक्षरश: धावतो आहे. अशा काळात गुरुदेवांचे हे विचार अत्यंत महत्वपूर्ण ठरतात.

### २) राजकीय व सांस्कृतिक परिवर्तन :-

कोणत्याही समाजात एखादा राजकीय बदल जसा घडवून आणला जातो तसे

सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले जात नाही हा गुरुदेवांचा आक्षेप आहे. शिवाय त्याचे जतनही केले जात नाही. एखादा घटनात्मक बदल ठराविक संख्येच्या लोकप्रतिनिधीने मूलभूत सिध्दांताला मान्यता देऊन सहज घडवून आणता येतो. आज लोकशाही देशामध्ये बहुसंख्य लोकांना जर प्रचलीत राजकीय चौकट बदलण्याची गरज भासली तर अस्तित्वात असलेल्या घटनेच्या विरुध्द ते मत देऊ शकतात. घटनेत योग्य ते बदल करुन नवीन प्रकारचे शासन आणू शकतात. त्यानंतर कायदे कानून करुन त्या घटनेचा मान राखण्यास शासनास भाग पाडले जाऊ शकते. जरुर पडली तर पोलिस यंत्रणेच्या द्वारा ते कायदे पाळण्याला भाग पाडले जाते. परंतु संस्कृती ही काही अशा प्रकारच्या कशाबशा राजकीय पध्दतीनींना निर्माण केली जाते, ना बदलली जाते, ना राखली जाते. ज्याप्रमाणे शेती संशोान केंद्रात अत्यंत काळजीपूर्वक व नाजूक हाताने प्रयोग करुन उच्च जातीचे बियाणे तयार केले जाते. त्याचप्रमाणे नीतिनियमांच्या आधारे मानवी समाजाला उच्च व दिव्य जीवन शिकविला जाऊ शकते.

जेव्हा समाजामधील सर्वसाधारण नीतिमत्ता ठासळली जाते तेव्हा तरुण-तरुणी अनिर्बंध वासनांनी अंध होऊन बेलगामपणे एकमेकात मिसळू लागतात. भोगलालसेला ना तक्रसंगती, ना अधिक चांगले व सुसंस्कृत बनण्याची वर्ण, त्यानंतर मग विसंगत सांस्कृतिक लक्षणे एकमेकांशी अनिष्ठ सरमिसळ होत जातात.

अध्याय ३ च्या विवेचनात गुरुदेवांनी मानवी आनंदाच्या संदर्भात भाष्य केले आहे. कामनांची इच्छा करण्यास खरी शांती व आनंद मिळणार नाही हा आधुनिक भौतिक जगाच्या समजुतीच्या अगदी विरुध्द आहे. कामना प्राप्त करण्याने व जास्तीत जास्त पूर्ण करण्याने आनंदासाठी व सुखाने आयुष्य जगता येणे असे भौतिकवादी मंडळी मानतात. औद्योगिकरणावर आधारीत आधुनिक सुधारणा नवीन नवीन कामना करण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि आता हा प्रयत्न इतका काही सफल झाला आहे की शतकापूर्वी आपल्या पूर्वजांनी बाळगल्या नसतील त्यांच्या लाखोपट कामना आज एखाद्या सर्वसामान्य मानवाला असतात. आधुनिक शास्त्रीय ज्ञानाच्या मदतीने भांडवलदार उद्योगपती नवनवीन कामनांची पूर्ती करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत आणि एखाद्या व्यक्तीच्या नव्या उत्पन्न केलेल्या कामना जितक्या प्रमाणात पूर्ण होतात तितक्या प्रमाणात आपण सुखी आहोत, असे मानण्यास संस्कृतीने

त्याला शिकविले.

आधुनिक युगात सुखाचे मापदंड कोठे आहेत. हे सुख भौतिक समृध्दीच्या तुलनेत पाहिले जाते. परिणामी सुखी होण्याच्या ह्या अत्याधिक वृत्तीने माणूस खऱ्या सुखाला मुकला आहे. अशावेळी गुरुदेवांचे हे विचार अत्यंत प्रेरक असे आहेत.

आधुनिक शिक्षण पध्दतीतील काही घटकांवर गुरुदेवांनी प्रकाश टाकला आहे. गीता अध्याय ४ चे विवरण करतांना ते म्हणतात, "ऐहिक शास्त्र कोणताही शिक्षक विद्यार्थ्याला यशस्वीपणे शिकवू शकतो व ते त्याच्या मेंदूत भरवू शकतो ह्या शिक्षण पध्दतीमध्ये अशा शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांच मनात प्रेम किंवा आदर श्रध्दा असण्याची मुळीच आवश्यकता नाही. ह्या ज्ञानदानाच्या बाबतीत शिक्षक म्हणजे केवळ एक शिक्षण देण्याचे उपकरण असतो. अशा तऱ्हेने आज आधुनिक कॉलेजमधील प्राध्यापक म्हणजे वर्गातील फळे, प्लॅटफॉर्म किंवा बाक यांच्या इतकेच बोलके उपकरण असते. परंतु उलटपक्षी मानव संस्कृतीचा दरवळ नैतिक दर्जा किंवा सदाचारांची झळाळी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला प्रदान करायची असेल तर विद्यार्थ्याने आपल्या मनात प्रेम पूज्यभाव भक्ती व सख्यत्व ह्या भावना मनात बाळगून गुरु सान्निध जाणे आवश्यक असते. ही अतिशय वास्तविक परिस्थिती आहे. गुरु शिष्य संबंधाच्या संदर्भात हल्लीच्या काळात जे गुरु शिष्य संबंध इत्यादी बाबींवर त्यांनी आपल्या लेखनातून प्रकाश टाकला आहे.

'मानव निर्माण की कला' ह्या पुस्तकात आधुनिक युवकाच्या स्थितीचे अतिशय मार्मिक वर्णन करण्यात आले आहे ते असे, "आज नवयुवकांसमोर कोणताही उद्देश नाही ज्यासाठी तो आपले अहंकार केंद्रीत कामना समर्पित करुन नि:स्वार्थ भावनेने कर्म करु शकेल. सामान्य व आदर्श नेता थोडे असतात. संचार साधनाच्या या युगात जेथे राष्ट्रीय सीमा नाममात्र आहेत. त्यात नवयुवकांमध्ये पर्याप्त राष्ट्रीय भावना नाहीत. ज्यामुळे तो राष्ट्रासाठी समर्पण भावनेने कर्म करु शकेल. स्वाभाविकपणे आम्हास संपूर्ण जगात लज्जाहीन अहंकार व त्याच्या घृणास्पद कामना याच्या व्यापक क्रिडेचे दर्शन होतांना आढळते.'' आजच्या समाजाचे व नवयुवकांचे अत्यंत विदारक चित्रण व्यक्त करण्यात आले आहे. आज संस्कृतीचा झालेला विपर्यास व त्यामुळे झालेली मानसिक घसरण ह्याचे भीषण वर्णन त्यांनी प्रश्नोप

निषदाच्या विवेचनात केले आहे. ते म्हणतात, “संभोगातिरेकातील भ्रष्टाचाराने आजच्या मानवाचे चारित्र्य जितके विकृत केले आहे तितके प्राणीमात्राच्या राज्यातील दुसऱ्या जातीने कधीही केले नाही. भौगोलिक परिस्थिती सांस्कृतिक वारसा आणि शारीरिक गरजा लक्षात न घेता. जगात सर्वत्र संभोगासक्तीचा अतिरेक इतका वाढला आहे की, संपूर्ण जग आता अति लोकसंख्येच्या अवजड भाराखाली कुरकुरत आहे. अशावेळी जागतिक आरोग्य संस्था आणि महान चिंतक ह्यानी संयम आणि आत्मनिग्रहाची भाषा बोलण्यास सुरुवात केली आहे. पण ते सांस्कृतिक गरजेपेक्षाही आर्थिक निकड म्हणून त्याचे प्रयत्न आता त्या कृत्याला नकार देण्यापेक्षा अधिक करुन संतती प्रबंधाकरिता अधिक आहे. पण ही भौतिक संस्कृतीची तिरस्करणीय कुरुपता जाहीर करणारी विकृती होय. अशावेळी आपल्या अनादी धर्म ग्रंथाचे प्रतिगामी जुनाट म्हणून म्हटले गेलेले ऋणी, गृहस्थाश्रमी लोकांना केवळ डॉलर व रुपया यांच्यातील व्यवहारी संबंध निकोप राखण्याची तात्पुरती सोय म्हणून नव्हे तर मानवला निश्चित सांस्कृतिक समतेवर राखण्यासाठी अनिवार्य असणारा जीवनाचानियम म्हणूनआत्म संयमन करण्यास सांगतांना दिसतात. हे एक उत्तेजीत करणारे आश्चर्य आहे. परिस्थितीने आपल्यावर लादलेल्या परकीय शिक्षण योजनेने प्रशिक्षित झालेल्या आणि त्यात वाढलेल्या आधुनिक विचारसरणीने आज आपल्याला आपण पूर्वी होतो त्यापेक्षाही अधिक ओंगळ हास्यचित्र बनविले आहे. संस्कृतीने आज आपण ना भारतीय ना युरोपीयन आपल्याला ना पूर्वीचे माहित आहे ना वर्तमान काळाचे खरोखरच सांस्कृतिक दृष्ट्या आज आपण ज्यांना मातृभाषा नाही वा पितृ अभिमानही नाही असे अनाथ आहोत, असे असल्या कारणाने आपल्या स्वत:च्या नीति भ्रष्टतेमुळे आणि सांस्कृतिक दिवाळखोरीमुळे आपणास विचाराच्या शैलीचे गुणग्रहण करणे शक्य होत नाही.

## १६) प्रौढांच्या प्रती दृष्टिकोन :-

प. पू. गुरुदेवांनी बालकांबद्दल व युवकांबद्दल दृष्टिकोन मांडला व त्यातून त्यांची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी प्रौढांबद्दल आपला दृष्टिकोन मांडला Advice to Householders ह्या लेखात त्यांचा हा दृष्टिकोन आपणास प्रकर्षाने जाणवतो. गृहस्थी जीवन जगत असतांना व्यक्तीने आपले जीवन सार्थकी कसे लावावे ह्याबाबत त्यांनी आपला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात नित्य नवीन आव्हाने येत असतात व ह्या आव्हानामधुन त्याचे शिक्षण सुरूच असते. ह्या आव्हानांना तोंड कसे द्यावे हयाबाबत गुरुदेवांनी ह्या लेखाच्या सुरवातीला मार्गदर्शन केले आहे. मानवी आयुष्यात एका पाठोपाठ एक अशी आव्हानांची मालीकाच असते. अशा आव्हानांना आपण प्रभावीपणे कसे करतो ह्यावर त्या व्यक्तीचा पुरूषार्थ अवलंबून असतो. काही वेळा आपण ह्या आव्हानांवर मात कतो तर काही वेळा आव्हाने आपल्यावर मात करतात. पण असे असले तरी ह्या आव्हानांना आपल्याला भेटावेच लागते. तेथे आपल्याला पर्याय नसतो. पण आपण त्यांना Courage व Faith मनात ठेवून भेटलो तर आपला विजय नक्की असतो. पण आपण कृतीशील नसलो तर ह्या समस्या ही आव्हाने आपणास संपवितात, हा जीवनाचा नियम आहे. जीवनभर चालणरा खेळ म्हणून आपण त्यांना स्विकारायला हावे. ह्यासाठी आपले मन हे चैतन्य शक्तीने परिपूर्ण हवे. थकलेले मन ह्या आव्हानांचा सामना करू शकत नाही. ह्यासाठी गुरुदेवांनी जो मंत्र सांगीतला आहे तो आहे "Be yourself" प्रत्येक Weakness वर आपण स्वार व्हायला हवे. जीवनाचा प्रवाह कधीच एक सारखा नसतो. प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाणे हाच खरा पुरूषार्थ आहे. अनेक व्यक्ती आपल्यावर टिका करतात, त्यात तथ्य असेल तर त्या स्विकारायला हव्यात पण त्यात तथ्य नसेल तर त्या दुर्लक्षीतही करायला शिकले पाहिजे. ही टिका कृतज्ञतेने आपणास स्विकारता आली पाहीजे व त्यानुसार आपणास आपल्यामध्ये परिवर्तनही करता यायला हवे.

### गृहस्थी जीवनातील कर्तव्ये :-

गृहस्थी जीवनात आपल्याला बरीच कर्तव्ये पार पाडावी लागतात. ही कर्तव्य कशी पार पाडावी ह्याबाबत गुरुदेवांनी अतिशय चांगले मार्गदर्शन ह्याच लेखात केले आहे. गृहस्थ हा समाजाचाही घटक असतो आणि म्हणूनच समाजाचा एक घटक म्हणुन आपले

समाजातील स्थान लक्षात घेऊन प्रत्येक Householder ने आपले कर्तव्य हे योग्य मार्गाने पार पाडावयास हवे. गृहस्थी म्हणुन कुटूंबा प्रति असणारे कर्तव्य, समाजाचा घटक म्हणून समाजाप्रति असणारे कर्तव्य, आणि ह्या स्पर्धात्मक युगातील एक घटक म्हणून आपल्या व्यवसायाप्रती असणारी आपली कर्तव्ये ही सर्व कर्तव्यनिष्ठेने व पूज्यभावाने करायला हवी. आपल्या घरातील वृध्द मंडळींबद्दल सुध्दा आपली काही कर्तव्य असतात ही कर्तव्ये सुध्दा आपण पार पाडायला हवीत. वर्तमान ही भूतकाळाची निर्मिती आहे. वृध्द व्यक्तीनींच वर्तमानाला आकार दिला आहे आणि त्यांचा वृध्दापकाळ सांभाळण्याची जबाबदारी आता गृहस्थींवर आहे. प्रत्येकांनी आपले पालक व पाल्य ह्यांच्या कडे योग्य लक्ष पुरविल्यास एका सुरक्षीत समाजाची निर्मिती होईल. पण आज व्यक्ती तसे करतांना आपणास आढळत नाही, ह्याबाबत गुरुदेवांनी खंत व्यक्त केली आहे. आणि ह्याचे कारण माणसाची आनंदाची अवाजवी संकल्पना व त्याची स्वार्थी वृत्ती हे सांगितले आहे. आज बालके दुर्लक्षीत रहात आहेत. युवक हे हिन पशुसमान वर्तन करित आहेत त्यांच्या समोर जीवनाबाबतची निश्चित ध्येय नाही. नैतिकता लयाला पावली आहे ही आजची सद्यस्थिती आहे.

**स्वत:च्या प्रती कर्तव्ये :-**

वरिल सर्व परिस्थितीचे वर्णन गुरुदेवांनी केल्यावर ह्याच लेखात त्यांनी प्रत्येक व्यक्तीचे स्वत:बद्दलचे पण काही कर्तव्य आहेत असे बजावले आहे आणि हे कर्तय आहे, ''आत्मसंयमनाने जीवन जगणे''. प्रत्येक व्यक्तीने कोणताही अतिरेक करू नये तर आपले जीवन आत्मसंयमनाने जगणे आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन जीवन क्रिया ह्या आत्मसंयमीत असाव्यात. त्याचसोबत त्यांने सर्वांशी संबंध हे शांतापूर्ण व प्रेमाच्या भावनेचे ठेवावे. अध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ती करून घ्यावी, त्यामुळे आपण आपल्या भोवतालच्या व्यक्तीप्रती सेवाभाव ठेऊ शकु. ह्यासाठी गुरुदेवांनी जों भर दिला आहे तो Self-study, Meditation, Prayer ह्यावर. ह्यात नियमीतता असल्यास जीवनात गोडवा निर्माण होतो. प्रत्येकाने Attachment आणि Love ह्याचा आशय जाणून घ्यायला हवा. ह्या ठिकाणी त्यांनी Attachment ची परिभाषा केली आहे.

Ego + Selfish desire = Attachment

व्यक्तीने आत्मसंयमनाने कसे रहावे ह्याचे हे उत्कृष्ट मार्गदर्शन आहे. ह्या ठिकाणीच Education fof sefl control हे गुरुदेवांचे Vision लक्षात येते. गृहस्थाने खालील बाबी टाळायला हव्यात. Overeating, overworking, over activity, over ambition, over exertion, oversleeping.

पण ह्यासाठी मानवी मनाला उच्च आदर्शात गुंवतून ठेवावे लागेल. ह्यासाठी दैनंदीन प्रार्थना, अध्यात्मिक वाचन ह्या बाबी उपयुक्त ठरतील. पण सर्वसामान्य माणूस स्वार्थाशिवाय कार्य करू शकत नाही. पण ह्या वृत्तीवरही त्याला मात करावी लागेल हे सांगतांना गुरुदेवांनी नि:स्वार्थी वृत्तीने कसे कार्य करावे ह्याकरिता सुध्दा मार्गदर्शन केले आहे. ते म्हणतात उच्च ध्येय व समर्पण वृत्तीने कार्य व मनातील पूज्य भाव ह्याबाबी मानवी मनाचे शुध्दीकरण करतात व व्यक्ती आपले कार्य निष्काम बुध्दीने करू शकतो.

हे कार्य कोणत्याही प्रकारचा ताण न होता कसे करावे, आहार कोणता ठेवावा ह्याबाबतही ह्या लेखात मार्गदर्शन आढळते. ताण रहित कार्य व्यक्ती तेव्हाच करू शकतो जेव्हा माणसाचे मन हे शांत असेल. आज situation and problem च्या ऐवजी सर्वत्र crisis हा शब्द वापरला जातो. आज समस्या कोणत्याच बदलल्या नाही पण त्यांच्याशी संघर्ष करण्याची मानवाची क्षमता मात्र कमी झाली आहे. ही मानसिक क्षमता वाढविण्याची आज आवश्यकता आहे. ह्यासाठी शांत मनाच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला आहे.

## १७) व्यवस्थापन संकल्पना :-

प.पू. गुरुदेवांनी आपल्या लेखनात अनेक व्यवस्थापकीय संकल्पनांचा उहापोह केलेला आहे. आजच्या व्यवस्थापनाच्या युगात ह्या संकल्पना प्रत्येक क्षेत्रात मार्गदर्शक ठरतात. गुरुदेवांचा Values Based Management वर अतिशय भर होता व त्या अनुषंगाने त्यांनी काही संकल्पना मांडल्यात. त्या पुढीलप्रमाणे -

कोणत्याही कार्यात मानावाला अनेक अडथळे येतात. ह्या अडथळ्यांना पार करणे ही बाब अत्यंत निकडीची आहे. ह्या बाबींवर गुरुदेवांनी अत्यंत उत्कृष्टपणे प्रकाश टाकला आहे. अडथळा म्हणजेच OBSTACLE ह्यातील प्रत्येक अक्षरांची फोड गुरुदेवांनी

पुढील प्रमाणे केली आहे.

१) O - Objective knowledge : Knowledge is power. क्रियात्मक ज्ञान प्राप्त करा आणि आपल्या निवडलेल्या कार्यात यश संपादन करा.

२) B = Broadmindedness : Life when properly turned can round the sharped edges in our character. In broader vision of life in its entirely obstacles are stepping stones to cultivate an inner perfection and an outer perfection.

३) S = Sensitivity : Be like a flower - Give happiness and fregrance to all.

४) T = Toughness : The suffering depends not on the factual happening but on the texure of ones mind, cultivate tough mind through study of the scripture faith in a higher reality value based life.

५) A = Alertness : Alert and vigilant living is a Sadhana.

६) C = Concentration : Never complain about the number of hours you have put to do job.

७) L = Love of God : Dont tell God how big your problem is. Tell your probelm how Big god is.

८) E = Enthusiasm : Real men of achievement are proples who have the heroism to fuel more and more enthusiasm in their work, when they face more and more difficulties. Be agressively good.

## Art of Communication :-

Practice of Vedanta हे गुरुदेवांच्या विविध आचार्य ब्रह्मचारी सेवक इत्यादींना लिहिलेल्या पत्रांवर आधारीत असे पुस्तक आहे. ह्या पुस्तकात त्यांनी अनेक टिप्स दिल्या आहेत. त्यातील एक महत्वाचा हा मुद्दा Orlando (USA) येथून लिहिलेले हे पत्र. ह्या पत्रातून त्यांनी Art of Communication बाबत तात्विक अधिष्ठान व्यक्त केले आहे. ह्या

पत्रात ते म्हणतात, संप्रेषण हा तुमचा व्यवसाय आहे. तुमच्या ज्ञानाचे इतरांना आकलन व्हावे म्हणून तुम्ही संप्रेषण करता. तुमच्या समोर असणाऱ्या श्रोत्यांचा वर्ग हा वेगवेगळा असतो. त्याची आकलन क्षमता वेगवेगळी असते. यशस्वी वक्ता तोच असतो जो श्रोत्यांची मानसिकता समजून त्याप्रमाणे बुध्दीमत्तापूर्ण आपल्या विषयाला आकार देऊ शकतो, वळवू शकतो. श्रोत्यांच्या अभिरुचीनुसार वळवू शकतो आणि म्हणून ते संदेश देतात. Learn to care your listener आणि त्याच्या कल्याणाची भावना जोपासा. राग आणि ताल तुम्हाला श्रोत्याच्या मानसिकतेनुसार बदलावा लागेल. विविध विषयांना श्रोत्यांच्या आकलन क्षमतेनुसार कसे वळवायचे याचे नियोजन करणे महत्वाचे ठरेल. तुम्हाला शंभर संकल्पना माहीत असतील पण त्यापैकी तुम्ही तुमच्या श्रोत्यांना २० संकल्पना जरी व्यवस्थित पोहचवू शकलात तरी ते तुमच्या संप्रेषणाचे यश ठरते. ह्यासाठी गुरुदेवांनी पुढील सूचना केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१) चेहऱ्यावर हास्य ठेवून श्रोत्यांशी नजर भिडवून बोला.

२) कोणत्याही एखाद्या मुद्यावर अडखळू नका सातत्य ठेवा.

३) शेवटच्या श्रोत्यापर्यंत तुमचा आवाज पोहोचेल ह्याची दक्षता घ्या.

४) जेव्हा शेवटच्या रांगेतील श्रोताही तुमचं वक्तव्य अभिरुचीपूर्ण ऐकतो तेव्हा तुम्ही श्रोत्यांना जिंकलेलं असतं.

५) श्रोत्यांना तुमचा मुद्या आकलन झाला आहे. ह्याची त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव जाणून घेतल्यावरच आपला मुद्या संपवा तोपर्यंत ते समजावून सांगण्याचा प्रयत्न करा.

६) Extra sweetness in your words can come only as a result of his grace invoked by your regular "Anushthana" असे आपल्या जीवनात अनुष्ठान महत्वाचे आहे.

७) आपल्या वक्तव्यात बाधा आणणाऱ्या अनेक बाबी असतात. त्या वक्त्याचे लक्ष विचलीत करु शकतात. भाषणाच्या वेळी त्याकडे दुर्लक्ष करावयास शिका.

८) आपल्या वरील नकारात्मक टिका स्विकारा. त्यामुळे विचलीत होऊ नका जर ह्या टिकेत तथ्य नसेल तर त्याकडे दुर्लक्ष करा.

९) जर त्यात तथ्य असेल तर त्याचा मोठ्या मनाने व कृतज्ञतेने स्विकार करा.

१०) Thus improvement come to shine more than ever before. Be greatful to all the creative critics all through your life.

११) रोज उपनिषदासारख्या धर्मग्रंथाचे वाचन करा, गीतेचे वाचन करा. Thus keep your heart inspired one ever a fire with enthusiasm to live the nobler life of meaningful strile.

**True Worker :-**

Chinmaya Centre of World Understanding ह्या पुस्तकातील हा लेख कार्यकर्त्यांच्या गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणारा लेख आहे. ह्यात ते म्हणतात, ''प्रत्येक व्यक्ती सेवा करतेच असे नाही. पैसे देवून, मजूरी देवून आपण कितीही मजूर कामावर ठेऊ शकतो पण खऱ्या कार्यकर्त्याला त्यांनी सेवक अर्थात Dedicated Worker असे संबोधले आहे. अशा कार्यकर्त्यांचे गुण त्यांनी ह्याच लेखात खालीलप्रमाणे वर्णन केले आहेत.

१) खरा सेवक हा आपल्या कार्याच्या recognition ची मागणी करीत नाही.

२) Worker must be capable of serving both neglect and appreciation.

३) जेव्हा व्यक्ती आपल्या कार्याच्या खऱ्या प्रेमात पडतो तेव्हाच त्याला आपल्या खऱ्या क्षमतेची ओळख होते.

४) एखादे कार्य तीव्र निष्ठेने केल्यासच त्याला सेवक म्हणता येईल.

५) Without conviction no real work is possible for the true worker ही निष्ठा ही अंतरप्रेरणेतून निर्माण व्हायला हवी.

६) We must fall in care with our Idea the very purpose of our work.

७) From the glory of our vision within will come a gloriously effective work out side.

८) Your work must compel you to act. It must be as intimate as your breathing.

९) It is not always by money that you become useful. Give your spiritual

wealth. Give those Idea that you have thought out, understood and lived. So that a man having once come near you should always hanger to come back. This is the quality of worker.

१०) Dont wait for the consolation or of getting appreciation from others Discover goodness in yourself. Seek in others and do as much good as you can you will then find that every moment is rewarding. You will and your happiness in the feeling of doing what you want to do in the world. This must be the attitude of Sevaks.

**The Secret of Management :-**

व्यवस्थापनाचे यश हे गुरुदेवांच्या मते मनाच्या स्थितीवर अवलंबून आहे. मनाची अवस्था ही जेवढी शांत असते. त्या प्रमाणात व्यक्ती व्यवस्थापनात यश संपादन करतो. ह्यासाठी आपला अहंकार हा ईश्वरचरणी समर्पित करायला हवा. दुराचारी (Dissipated) मन हे योग्य विचार करु शकत नाही आणि म्हणून शांत मनाची आवश्यकता ह्या ठिकाणी व्यक्त करण्यात आली आहे. व्यवस्थापनात यश प्राप्त करण्याचा मार्ग आहे. "Bring the mind where the hand is working". ही कृती केल्यास व्यवस्थापन विकसित होते. पण ह्या दोन मूलभूत गोष्टींची आवश्यकता व्यक्तिला आहे. 1) Mental Strength, 2) The physhic vitality.

मानवाचे मन जेव्हा दुराचारी बनते, भरकटते त्याचा जगावर विशेष परिणाम होणार नाही. पण मानवावर, स्वत:वर त्याचा तीव्र व सखोल परिणाम होतो. त्याला गुरुदेवांनी "Own suicidal disaster" असे संबोधले आहे. कारण मानवाचे मन दुराचारी बनले आहे आणि अशा मनामध्ये सर्वोत्कृष्ट प्राप्त करण्याची क्षमता नसते आणि म्हणूनच ह्या ठिकाणी गुरुदेव मार्गदर्शन करतात, "Let us learn to integrate the mind and bring out the best in us". आपल्या मनामध्ये समन्वय निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मानसिक समन्वयाने मानवाच्या कृतीत उत्कृष्ठता निर्माण होते. "This extra glory of performance the excellence in your own works is that whichis going to creat not only a

revolution in your own personality but also a change in the very desting of our country". देशाचे भवितव्य घडवणारी ही व्यवस्थापनातील अतिशय मूलभूत असणारी ही बाब ह्या ठिकाणी नमूद करण्यात आली आहे.

## Art of listening :-

जीवनातील प्रत्येक घटनेपासून आपण काही ना काही शिकत असतो. योग्य श्रवणाच्या माध्यमातून मानव आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढवू शकतो. योग्य श्रवणाने खालील क्षमता विकसित होतात.

1) Ability of understanding
2) Self Awareness
3) Self Application

केवळ ऐकणे म्हणजे श्रवण नाही. poor hearing मुळे खालील समस्या उद्‌भवू शकतात.

1) Frustration, 2) Indifference, 3) Misunderstanding, 4) Misleading judgement, 5) Embarrasment, 6) Poor human relation, 7) Many other pcychological blocks and maladjustment.

काही वेळा आपल्या आवडणाऱ्या बाबींवर आपण लक्ष केंद्रीत करतो व परिणामी वास्तवतेचा बराच मोठा भाग आपण block करतो. बऱ्याचदा आपण समोरील बाबींवर पूर्वग्रह मनात ठेवतो, मत बनवितो. त्यामुळे श्रवणात बाधा उत्पन्न होतात. बऱ्याचदा ऐकणाऱ्या बाबींना आपण unimportant, boaring समजतो. ह्यामुळे मन अंतर्मुख होण्या ऐवजी बहिर्मुख बनते. काही लोक वक्त्याला खूष करण्याकरिता लक्ष देतात. काही लोकांना ऐकतांना व्यत्यय आणण्याची सवय असते.

श्रवणात अडथळे आणणारे घटक खालीलप्रमाणे आहेत :-

1) Faculty memories

2) Shades of ego

3) Tendencies and attitudes

4) Beliefs

5) Images of past experiences

6) Prejudice of past

7) Like and dislike

8) Expectations and anxieties for future.

मानवाजवळ listening mind असावे. Listening mind ह्याचा अर्थ "A mind that is open, unprejudiced, objective, alert, alternative and relaxed.

त्याचसोबत मानवाजवळ खालील गुण असावे.

1) Balanced out look, 2) Enjoying spiritual strenth, inner stability, mental beauty and physical perfection.

## Art of Action :-

व्यवस्थापन संकल्पनेतील ही आणखी महत्वाची संकल्पना आहे. कृती हे मानवाचे जीवन आहे. मानवाची कृती थांबल्यास त्याचे जीवन संपते. प्रत्येक क्षेत्रात मानव कृतीला महत्व आहे. ही संकल्पना 'Inevitability of Action' ह्या पुस्तकात मांडली आहे. कृतीच्या कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करतांना युवकांच्या मनात standard of living बद्दल अनेक विचार असतात. पण त्याच सोबत Standard of life दुर्लक्षित होतं. परिणामी कृतीच्या क्षेत्रात Unhealthy Competition निर्माण होते. व्यक्तीच्या कृतीचा प्रवाह अव्याहतपणे चालतो. ह्या सगळ्या मध्ये समन्वय साधने कसा साधावा. आपल्या कृतीतून आपल्या अवतीभवती आनंद व समाधान ह्या सर्वांना Art of Action म्हणता येईल. Actionis signature of life and life express its self in action. कृती ही कार्याशी निगडीत झालेली तीचे खालील प्रकारात विभाजन होते.

**1) Labour :-**

पैसा कमविण्यासाठी व स्वत:चा आनंद प्राप्त करण्यासाठी व्यक्ती कृती करते.

**2) Worker :-**

ह्या प्रकारात माणसाला समाजात यश प्राप्त करायचे असते. यशस्वी समाजाचे चित्र प्रत्येक worker समोर असते. आदर्श चित्र प्रत्येक समाजासमोर असते. हे आदर्श प्रत्यक्षात आणण्यासाठी तो धडपडत असतो. Thus each has an ideal in his mind and he struggle to make the ideal an actual fact such men are called worker.

**3) Men of achievement :-**

Working for own fulfillment. Such people as are working in the world not for profit nor for success but with a feeling of कृतकृत्य. I did what best I could not in that matter.

कृतीच्या माध्यमातून प्रत्येक क्षेत्रात Man of achievement व्हायला हवे. कृतीच्या गुणवत्ता त्याच्या उद्देशाच्या गुणवत्तेवर आणि मनाच्या व बुध्दीच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. The glory of action depend upon the intention of motive behind the work. कृतीचे सौंदर्य तेव्हाच वाढते जेव्हा त्या कृती मागील ध्येय व आदर्श अधिकाधिक उच्च असते. आपल्या आयुष्यातील goal व vision चा शोध घेणे हे मानवाचे उच्च ध्येय आहे. ह्या ध्येयाबाबत गुरुदेव म्हणतात, "Discovering a goal or vision in life is a great Ideal and to Inspire surroundering oneself to that Ideal and working in the world outside seems to be the secret of discovering new dynamisom in our action." कार्याचे यश हे मानसिक आरोग्यावर अवलंबून असते. हे मानसिक आरोग्य तेव्हाच चांगले राखले जाऊ शकते जेव्हा आपल्याला कार्यप्रेरित करणारे एखादे उदात्त ध्येय आपल्या समोर असेल तेव्हा आपल्यातील नवीन ऊर्जेचा शोध आपणास लागतो. म्हणून गुरुदेव सल्ला देतात, ''जीवनाचे ध्येय ठरवा. त्याच्याप्रती समर्पित व्हा. त्या

प्रमाणे कार्य करा. हे ध्येय आपली कार्य प्रेरणा जागृत करते. ह्यामुळे नवीन कार्यशक्तीचा शोध लागेल. We can discover our joy in the pricision and perfection of the work that we turn out.

कार्या मागील हे ध्येय उदात्त असण्यावर गुरुदेवांचा भर होता. म्हणजेच social, national असावे अस त्यांचा कटाक्ष होता. प्रत्येक कार्यामध्ये त्याचा वापर अनिवार्य आहे. When the hand is working if the head and heart are present there comes the artistic perfection. कृतीमधील ही खरी enjoyment आहे. उद्योजकता शिक्षणात हे philosophy of work चे अधिष्ठान आवश्यक आहे. ही कामाची गरज आहे, देशाची गरज आहे. Without this philosophy the best in each of us can never be brought out and poured into our productive work. The earlier we give them an uplifting philosophy of work in sooner we shall find them ready to bring into their fields of work the subtler power of integrity and efficiency.

## Leader :-

Leader कसा असावा, त्याच्या अंगी कोणते गुणधर्म हवे. ह्याबाबत गुरुदेवांना The Leader ह्या लेखात (Tapovan Prasad in 2006) मार्गदर्शन केले आहे. कोणत्याही संस्थेत त्या संस्थेला ऊर्जा देणारा महत्वाचा घटक म्हणजे leader असतो. ह्या नेतृत्वाच्या अंगी कोणते गुण असावे हे सांगतांना त्यांनी खालील गुण सांगितले आहे.

Leader must have vision.

A true leader should give his sirious attention continuely to foster a spirit of teamwork.

He must use discrimination at all times in communicating information.

Leader should set the trend with possitive and healthy communication.

**योजना :-**


आधुनिक युग हे योजनांचे युग आहे. या युगात योजना यशस्वीपणे राबवायच्या असतील तर काही तत्व आपणास लक्षात ठेवावे लागेल. ह्यावरील एक महत्वाचा निष्कर्ष गुरुदेवांनी तैतरीय उपनिषदात मांडला आहे. ते म्हणतात, ''योजनेमध्ये समाजातील सध्याच्या दौर्बल्याचे व दु:खाचेच केवळ यथार्थरुप दर्शनाचा समावेश असावा. सद्यस्थितीच्या सुधारणेसाठी चालू योजनांचा तपशील त्यात असावा. इतके नव्हे तर योजनेच्या परिपूर्तीच्या वेळी राष्ट्राचे किंवा देशाचे ध्येय काय असावे याचेही वास्तविक चित्रण त्या योजनेने द्यावे. योजनेला हातभार लावणाऱ्या लोकांना योजनेच्या ध्येयाचे जर यथार्थ दर्शन घडून आले नाही तर त्या त्या योजनेच्या परिपूर्तीसाठी आपल्याला त्या लोकांवर अवलंबून राहणे शक्य होणार नाही. आपल्या अस्तित्वाच्या ध्येयावर आपला दृढविश्वास असल्या खेरीज आणि त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्याकरिता अस्तित्वात असलेला घटक म्हणून आपण त्याची वास्तव प्रचिती घेतल्याखेरीज कोणतीही योजना यशस्वी होण्याची आशा नाही.

**नफ्यातील रहस्य :-**

Vedanta in Action ह्या पुस्तकात वेदांतातील काही व्यवस्थापन संकल्पनांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. ह्यातील पहिली संकल्पना आहे. 'नफ्यातील रहस्य' आज सर्वांच्या मनात ही समस्या असते का? प्रामाणिक प्रयत्न, सखोल नियोजन, पुरेसा खर्च होत असतांना अर्थव्यवस्था ही वृध्दींगत का होत नाही? आज परिश्रमात वाढ होत आहे व त्यामुळे ताणतणाव, रक्तदाब, हृदयविकार ह्यासारख्या विकारात वाढ होत आहे. ही आजच्या उद्योगपतीची तक्रार आहे. आपण ह्या विकाराचे शारीरिक कारण पाहू शकतो पण ह्याचे खरे कारण मानसिकतेत आहे. कारण शरीर हे केवळ उपकरण आहे. मन हे त्याचे प्रमुख कारण आहे. मन ही मानवाची अंतर्गत व्यक्तिमत्व आहे. उपकरण आवश्यक आहे पण ते स्वत:हून कार्य करीत नाही. उपकरणाचे कार्य हे टेक्नीशिअनच्या ज्ञान व क्षमतेवर अवलंबून आहे. आपल्यातील हे टेक्नीशियन म्हणजे मन आणि बुध्दी आहे म्हणून When the mind is exhausted, dissipated, moody or sorrowful it drugs laboriously through its work. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे आपल्या व्यक्तिगत कृतींना निश्चित ध्येय नाही. आपली

भावनिक, बौध्दीक ताणामुळे शारीरिक कार्यक्षमता कमी होते. परिणामी जीवनातील आव्हाने पेलण्यास आपण असमर्थ ठरतो. ही मानवाची जुनी समस्या आहे. ह्या समस्येचे निराकरण आपल्याला भागवद्गीतेत आढळते. आपण ज्या आव्हानांना टाळण्याचा प्रयत्न करतो तेच आव्हाने आपल्यापुढे येतात. माणसाच्या समस्या ह्या त्याच्या स्वार्थी प्रवृत्तीतून उत्पन्न होतात. ही वृत्ती म्हणजे, ''मी केवळ माझ्या कुटुंबासाठीच कार्य करेन'', ही भावना माणसाला स्वार्थी विचार करायला भाग पाडते. येथे गीता मानवाला मार्गदर्शन करते. जीवनातील आव्हाने पेलण्याकरिता courage ची आवश्यकता आहे. हे साहस तेव्हाच निर्माण होते जेव्हा मन हे सशक्त व शांत असेल. त्यामुळे व्यक्ती आपल्यातील efficiency, ability आणि beauty of performance सिध्द करु शकतो. पण ह्याकरिता तो संकुचित दृष्टिकोनाचा त्याग करायला हवा व त्याचे रुपांतर Macro Vision मध्ये व्हायला हवे अर्थात, "The whole univerve arisen in him exists in him and disappears in him." हा त्याचा दृष्टिकोन असायला हवा. Developing Macro Vision is the practical need of the way. हा विशाल दृष्टिकोन मानवामध्ये एकाएकी येत नाही तो निर्माण करावा लागतो. समस्या ही समस्या नसतेच त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा बदलावा लागतो. If you really want to become in industrial visionary a developer of a macro economy the attitude of mental poise is unavoidable.

Macro Vision ही संकल्पना भारताकरिता नवीन नाही. भारतीय संस्कृती तत्वज्ञानाच्या Macro View च्या आधारे तग धरुन आहे. जीवनात अर्थात कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करण्यासाठी गुरुदेवांनी पुढील मार्ग सांगितला आहे. ह्याला आपण Hirarchy of large profit म्हणू शकू -




## ४.५) Hararchy of Large Profit

कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करायचे असेल तर Macro Vision ची आवश्यकता आहे. व्यवस्थापनाचे हे अत्यंत महत्वाचे सूत्र आहे.

**Right attitudes for success :-**

कोणतेही कार्य पार पाडायचे असेल तर त्या कार्याबाबत आपली अभिवृत्ती योग्य हवी. सकारात्मक हवी तरच त्या कार्यात यश प्राप्त होते. ह्यासाठी जो योग्य attitude आहे तो म्हणजे

1) Working for an Ideal
2) Working with Joy
3) Integrity
4) Responsible Living

## पुढारी / नेता :-

प्रत्येक प्रकारच्या संस्थेत खऱ्या अर्थाने प्राण ओतण्याचे कार्य त्यांचा नेता करीत करीत असतो. तो सर्वांना सोबत घेऊन जहाजावरील कॅप्टन प्रमाणे समोर एक ध्येय ठेवून सर्वांना सोबत घेऊन चालत असतो.

नेत्याला दृष्टी असणे आवश्यक आहे. स्वप्नाळू नेता बनू शकत नाही. नेता नेहमी समोरच पाहण्याचे काम करतो, किती अडथळे आले तरी तो ते पार करुन आपले जहाज आवश्यक त्या बंदरापर्यंत नेतोच.

जर आपण आपल्या सभोवताली पाहिल्यास आपल्याला मुख्य तीन प्रकारच्या संघटना दिसून येतात. अशा संस्था ज्या शक्तीवर आधारलेल्या असतात. त्या व्यवस्थापकाची शक्ती किंवा संपत्ती ते आपल्या संस्थेच्या विकासासाठी विस्तार करतात. ह्या हुकुमशाही संस्था संस्थेच्या प्रमुखाला स्वत:चे अती महत्व वाटते आणि त्याच्यामध्ये अतिरेकांची भावना निर्माण होते. इतरांना दुय्यम लेखले जाते. अशा प्रकारे संस्थेचा ऱ्हास होतो.

दुसऱ्या प्रकारच्या लोकशाही संस्था या अतिशय लोकाभिमुख आणि लोकप्रिय संघटना यामध्ये सदस्यांना समाधानी ठेवले जाते. त्यामुळे संस्थेची प्रगती होते. हे समाधानी सदस्य असंतुष्ट सदस्य आणि शत्रूंच्या नायनाट करतात.

दीर्घकाळ टिकणाऱ्या संस्थांची रचना ही परस्पर सामंजस्य आणि नेत्याचा आदर यावर आधारलेल्या असतात. प्रत्येक घटकामध्ये संस्थेचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यावर भर असतो. येथे संघटना ही डोक्याच्या विचारांवर आधारित असते. ही ऐक्याची भावना आणि परस्परांप्रती आदर, स्नेह तेव्हाच निर्माण होतो. जेव्हा संस्थेचे सर्व घटक संस्थेचे ध्येय साध्य करण्यासाठी त्याग भावनेतून काम करतात. अशा संघटना बाहेरील दबावापासून मुक्तपणे काम करतात, कारण तेथे काम करणारे अनेक हात असले तरी डोके आणि हृदय एकच आहे. या विचारासाठी काम केले जाते.

अशा संघटनेमधील सदस्य आणि व्यवस्थापक ध्येयाने प्रेरित होऊन एकोप्याने

उत्साहपूर्ण आणि जोशपूर्ण वातावरणात काम करतात. परिणामी तेथे पोषक असे अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. यालाच गीतेमध्ये कर्मयोग असे म्हटले आहे.

आमच्या 'स्व' आणि आमच्यातील 'स्वार्थीवृत्ती' ह्या आमच्या दैनंदिन कामातील ऐक्य आणि आनंद नष्ट करतात. परंतु सदस्यांची संस्थेप्रती असलेली आपुलकीची आणि त्यागाची वृत्ती संस्थेचे ध्येय गाठण्यामध्ये आणि संस्थेच्या प्रगतीतील अडसर ठरत नाहीत. योग्य कार्यामुळे शेवटी सदस्य आणि समाजाच्या सभोवती चांगल्या भावनांचे जाळे विणले जाते.

नियमांची जंत्री किंवा एका व्यक्तीचे नेत्रदीपक कार्य संघटनेच्या फार काळ यश देवू शकत नाही. जर संघटना आपल्या सेवा केवळ नफा कमविण्यासाठी देत असेल तर ती फार काळ टिकणार नाही. तिचा विस्तार व विकास होईल परंतु मोसमी पावसाप्रमाणे तिचे अस्तित्व संपेल त्याकरिता उद्दिष्ट्ये आणि कृती यामध्ये सारखेपणा अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येकाला माहिती पाहिजे की जो काय करतो आहे. कशासाठी करतो आहे आणि तो कोणाला कशासाठी जबाबदार असेल.

व्यक्तिगत ध्येये आणि संघटनेची ध्येये यात जर ऐक्य नसेल तर त्या व्यक्तीला काम करण्यात आनंद मिळणार नाही. त्याचे विचार उच्च असू शकतील, त्याला संघटनेच्या बाहेर राहून त्यनुसार कार्य करता येईल. जर व्यक्तीचे ध्येय आणि विचार हे संघटनेचा ध्येय आणि विचारांशी जुळत असतील तर ती अतिशय आनंदाची बाब आहे. परिणामी सर्वांच्या कल्याणाचा मार्ग मोकळा होईल.

योग्य आणि प्रभावी संदेशवाहनाच्या अभावी अनेक संस्थांमध्ये मतभेद सुरु होतात. ती एक कला आहे. अनेक बाबींचा गौप्यस्फोट झाल्यास भितीदायक वातावरण निर्माण होते. परंतु संदेशवहनाची मुक्त पध्दती सुध्दा संघटनेच्या विकासात अडथळा ठरते.

पंचतंत्रामध्ये अतिशय प्रभावीपणे संदेशवहनाची पध्दती अनुभवाला मिळते यामध्ये म्हटले आहे. एक व्यक्ती आपल्या मित्रांना, पत्नीला काही गोष्टी सांगतो. काही गोष्टी आपल्या मित्रांना, काही गोष्टी आपल्या मुलाला हे सर्व विश्वासु लोक आहेत. परंतु तो सर्वच गोष्टी प्रत्येकाला सांगत नाही. आपण सुध्दा संदेशवहन करतांना प्रत्येक वेळी फरक केला

पाहिजे. नेत्याने नेहमी याबाबतीत दक्ष असावे. त्यामुळे सकारात्मक आणि योग्य ते संदेशवहन शक्य होईल.

याचे कारण अतिशय क्षुल्लक आहे की सर्व दुखणी केवळ आपल्या स्वार्थापोटी आहोत जसे की प्रत्येक जण विचार करतो, ''मी फक्त मझ्या कुटुंबासाठी काम करेल, मला जगाशी काहीच घेणे-देणे नाही'' आपल्या उद्योगपतींना देवाकडून जर समाजासाठी किंवा देशासाठी संपतती निर्माण करण्याची क्षमता प्राप्त झाली असेल तर आपण तसे यशस्वी प्रयत्न करता काय? स्वत:साठी नाही तर इतरांसाठी.

अशी प्रवृत्ती अजून विकसित झाली नाही. अजूनही आपल्यामध्ये केवळ सूक्ष्म दृष्टिकोनच आहे. आपण अजूनही विचार करतो, ''मी एवढे श्रम का करावेत, मी इतरांसाठी का झटावे? मी केवळ स्वत:साठीच काम करेल''. जेव्हा आपल्या अशा भावना होतात तेव्हा आपण विचार करतो, ''एखादे लहानसे दुकान का थाटू नये? किंवा रस्त्याच्या कडेला काहीतरी का विकु नये?'' जर मी पापकॉर्न विकलेत तर मी व्यवस्थित जगू शकेल, मी या यंत्राच्या धकाधकीत का जगावे? या शंका आपल्या मनात निर्माण व्हायला कारण म्हणजे आपल्यात असलेल्या मूल्याचा अभाव आणि त्यांना न जाणून घेणे.

औद्योगिक क्षेत्रातील उच पदस्थांना लक्षातच येत नाही आहे की, एवढे सगळे प्रामाणिक प्रयत्न, सविस्तर नियोजन आणि भरपूर खर्च करुन सुध्दा आपली अर्थव्यवस्था म्हणावी तशी विकसित होत नाही. तिचा जो काही विकास झाला तो येथील श्रमाच्या आधारेच. फक्त त्यामुळे मानसिक तणाव निर्माण झाला आहे. त्यामुळे निद्रानाश, उच्च रक्तदाब आणि हृदयाचे त्रास सुरु झाले आहेत. ह्या सर्व आधुनिक काळातील उद्योगपतींच्या तक्रारी आहेत. ही सर्व लक्षणे केवळ ताण, तणावामुळे त्यांच्यात दिसून येतात. आणि औद्योगिक व तंत्रज्ञानातील बदलामुळे.

अशा परिस्थितीत आपण सर्व हतबल होतो. आपण अनेक आव्हानांना तोंड देत आहोत. जी की आपण टाळू इच्छितो. अर्जुनाला सुध्दा आपल्या चुलत भावंडासोबत युध्द नको होते. पण त्यांच्यापुढे ते आव्हान घेऊन उभे ठाकले होते आणि त्याला ते स्विकारावेच लागले. त्याला ते कोणत्याच परिस्थितीत टाळता येण्यासारखे नव्हते. अशा परिस्थितीत

कोणताही बुध्दीमान व्यक्ती विचार करेल की, "मलाच का त्रास व्हावा? पेलण्यासाठी आमच्याकडे धाडस लागेल, हे धैर्य तेव्हाच येईल जेव्हा आमचे मन शक्तीशाली असेल जे की आपल्यातील कार्य क्षमता, योग्यता आणि उत्कृष्ट सादरीकरण करेल, त्यामुळे जीवनात यश आणि लाभ प्राप्त होईल.

हा न्यूनगंड कसा जाईल? हे तेव्हाच दूर होईल जेव्हा मनुष्यामध्ये दिव्य दृष्टीच येईल. त्यचे जीवनातील महत्व त्याला कळेल, त्याची योग्यता आणि आपल्या आयुष्यात त्याला काय अपेक्षित आहे. व्यक्तिमध्ये संकटांना धैर्याने सामना करण्याची शक्ती निर्माण होईल. त्याला वाटेल की या कामासाठीच माझी निवड झाली आहे. त्याला स्वत:चे महत्व पटेल.

भगवद्गीतेतील उपदेशामुळे ही मानसिकता अर्जुनामध्ये परत आलेली आहे. त्याच्या व्यक्तिगत दृष्टीमुळे आणि स्वयंस्वार्थामुळे तो गडद छायेखाली आला होता. त्याच्यामध्ये स्थूल दिव्यदृष्टी विकसित झाली होती त्याला लक्षात आले हाते की, तो एकटा कुणीही नाही. तो या विश्वाचा एक घटक आहे. तो ईश्वराने निर्माण केलेला एक सुबुध्द व्यक्ती आहे. संपूर्ण विश्व त्याच्यामध्ये निर्माण झाले आहे, अस्तित्वात आहे, त्यांच्यामध्ये सामावले आहे. ज्याप्रमाणे सागरात लहरी निर्माण होतात, सागरात खेळतात आणि सागरात सामावतात. अर्जुनाला आपल्यातील एकत्व लक्षात आले होते.

जेव्हा तुमच्या लक्षात येईल की, संपूर्ण जग एक आहे. आणि संपूर्ण लोक एकमेकांशी संबंधित आहेत. आपल्या प्रत्येकाची समाजाप्रती काही कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आहेत. गुरुदेव म्हणतात, "माझी माझ्या शेजाऱ्याप्रती काही जबाबदारी आहे, असे मला का वाटावे?'' तुम्हाला तुमच्या शेजाऱ्याप्रती निश्चितच काही जबाबदारी आहे, असे वाटेल कारण तो तुमच्यापेक्षा वेगळा नाही, असे तुम्हाला वाटेल.

"आपल्या शरीराचे अवयव हे वेगवेगळे आहेत. त्याचे कार्य वेगवेगळे आहे. ते तुमचे आहेत. कारण तुम्ही त्याच्यामध्ये राहता. त्यांचा आनंद तुमचा आनंद, त्यांचे दु:ख तुमचे दु:ख आहे. जर तुम्हाला हे कळले तर निश्चितच तुमच्या हे लक्षात येईल की, संपूर्ण विश्व हे एक आहे. सर्वांचे जीवन हे सारखे आहे आणि मग तुमच्यात सहजच स्थूल दिव्यदृष्टी येईल''.

व्यक्तिला आधुनिक जगात रहायचे असेल तर हे प्रॅक्टिकल तत्वज्ञान अतिशय आवश्यक आहे. प्रत्येकामध्ये स्थूल दिव्यदृष्टी निर्माण होणे काळाची गरज आहे. काळ हा झपाट्याने बदलणारा आहे. देशाची सीमा सीमा राहणार नाही, समुद्राचा किनारा सुध्दा सुरक्षित नाही. जर अणुयुध्द एकाचवेळी सुरु झाले तर ते दोन महाशक्तींमधील असेल त्यात संपूर्ण जग होरपळून निघेल. अणुबॉम्बचा स्फोट मास्कोमध्ये झाला आणि वारे जर दक्षिणेकडे वहायला लागले तर संपूर्ण आशिया खंडात त्याचा प्रभाव जाणवेल. दोन देशांच्या सीमांमधील युध्द संपेल. विश्वाच्या एका कोपऱ्यात घटना घडेल आणि त्याचे परिणाम सर्व जगावर होतील. सध्या सर्वच देश एका सुतामध्ये गोवला गेला आहे.

ही स्थूल दिव्यदृष्टी व्यक्तीमध्ये सहजच येणार नाही. ती निर्माण करावी लागेल. अर्जुनाला मानसिक कलह घालविण्यासाठीच तर भगवद्गीता त्याला सांगितली गेली. एकदा अर्जुनाचे मन स्थिरावले आणि त्याला त्याच्या कार्यक्षमता आणि शक्तीची जाणीव झाली.

हे लक्षात घेतले पाहिजे की, श्रीकृष्णाने परिस्थितीला बदलविले नाही त्याने परिस्थिती बदलावी अशी आज्ञाही केली नाही. कौरव आणि पांडव युध्दासाठी एकमेकापुढे उभे ठाकले होते. श्रीकृष्णाने अर्जुनासाठी नवे सैन्यबळ आणले नाही. त्याने केवळ त्याच्या मनातील कलह दूर केला.

अर्जुन जेवहा मानसिकदृष्ट्या खचला होता. तेव्हा तो तेथून पळ काढू इच्छित होता. त्याला अतिशय नैराश्य आले होते. त्याची यत्किंचितही आशा नव्हती. तो तात्काळ पळून जावू इच्छित होता. परंतु जसे त्यांचे मन स्थिर आणि शांत झाले. अर्जुनाला स्वत:मध्येच नवीन धैर्य आणि विश्वास जाणवू लागला. त्याने त्याच्या कार्यक्षमतेचा पुन: शोध घेतला आणि कृष्णाला म्हणाला, ''मी ह्या परिस्थितीचा निश्चितच सामना करेल,'' समस्या ही फार काळ समस्या नव्हती. तो एक खेळ होता. खुल्या मैदानात खेळावयाचा खेळ. आत्मविश्वासाच्या बळावर अर्जुनाने विजय प्राप्त केला.

जर मानवाला औद्योगिक दूर दृष्टी आणि स्थूल अर्थव्यवस्थेचा विकास करणारे व्हायचे असेल तर अशा प्रकारची मानसिक वृत्ती आवश्यक आहे. आज विद्यापीठामधून सुध्दा

सामान्य अर्थशास्त्राची चर्चा होत नाही, तर स्थूल अर्थशास्त्र शिकविले जाते. सूक्ष्म जग संपुष्टात आले आहे. परंतु आपल्या मनात, दूरदृष्टीत आणि दृष्टीक्षेपात अजूनही हे समायोजन झालेले नाही.

## प्रेरणादायी नेतृत्व :-

मानवतेचे नेतृत्व करणाऱ्यावर अतिशय महत्वाची जबाबदारी आहे. कारण त्यांनी अनेकांना मार्गदर्शन करण्याचे कार्याला वाहून घेतलेले आहे, असे कृती प्रवण लोक उत्साही असतात आणि ते समाजाला कधीच घातक ठरत नाहीत, असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

समाजाची बांधणी ही काही मंत्रांचा उपयोग करुन होत नाही. काळ आणि परंपरा ह्या समाजाच्या शक्तिला आणि सौंदर्याला आकार देत असतात. समाजाच्या सुव्यवस्थित बसलेल्या घडीला न बिघडवता खरे नेतृत्व लोकांना उचित मार्गदर्शन करुन त्यांना योग्य त्या दिशेने जाण्यासाठी प्रेरीत करते.

कोणत्याही पिढीचा विश्वास न बसणे ही बाब धोकादायक आहे. हिंसेमुळे व्यक्तिचे चारित्र्य बिघडते. इतिहास याला साक्षी आहे. अतिउत्साह आणि रागाच्या भरात नेत्यांनी आपल्या अनुयायांच्या शक्तीचा दुरुपयोग केल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच कृष्णाने म्हटल्याप्रमाणे समाजाच्या पुनरुज्जीवनासाठी प्रथम नेतृत्वामध्ये देवच येणे आवश्यक आहे. ज्यामुळे समाजाला योग्य दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी मार्गदर्शन मिळेल.

एखाद्याला चांगला नेता बनायचे असेल तर त्याने सर्वप्रथम समतोलवृत्ती विकसित केली पाहिजे आणि द्विधा अवस्थेचा त्याग केला पाहिजे. आदर आणि अनादर, मित्र आणि शत्रू याचा त्याने विचार करु नये, त्याने सर्वगुण संपन्न व्हावे.

चांगले कर्म करणारी व्यक्ती तम या गुणांच्या पलीकडे पोहोचते. अशा थोर व्यक्तिंमध्ये दैवी गुणधर्म जसे की सर्वसंग, परित्याग, सत्य, अविचल धैर्य आणि निरुपद्रवी पणा विकसित होतो. अशी व्यक्ती अजातशत्रू बनते. ती सर्वांना सारखीच भासते मग तो मित्र असो वा शत्रू. संपूर्ण सहकार्य आणि त्यागी वृत्तीने पुढे आलेल्या नेत्यामुळे समाजातील दारिद्र्य, दुःख,

अज्ञान, लोकभ्रम आणि मूर्ख समजुती दूर होतील.

जर आपल्यामध्ये अशा प्रकारचे संतुलीत विचार आणि त्यागाची भावना निर्माण झाली तर आपण आपल्या सभोवताली असणाऱ्या गोष्टींशी एकरुप होऊन जाऊ. मनामध्ये शांत वृत्ती आणि एकात्मिक वृत्ती विकसित होईल. वैश्विक प्रेमाची भावना विकसित झाल्यास मी पणा आणि माझे-माझे म्हणण्याची वृत्ती नाश पावेल. भगवान कृष्ण म्हणतात, भितीपासून मुक्तता, हृदय, मनाची शुध्दता, योग्य क्रियेचे ज्ञान, सहकार्याची वृत्ती, कर्मेंदियांवर ज्ञानेंद्रियावर नियंत्रण, त्याग, निष्कपटता, सत्य, रागावर विजय, शांतपणा, दयाळूवृत्ती, थोरपणा, निरुपद्रवीपणा, शुध्दता, मत्सरापासून दूर राहणे, निगर्वीपणा इ. गुण हे आपल्याला श्रेष्ठ क्षेत्रात जन्माला येण्यासाठी आवश्यक आहेत.

एक नेता म्हणून कुणीही आपल्या कर्तव्याकडे डोळेझाक करु शकत नाही. यामध्ये सामाजिक कर्तव्ये किंवा देशातील परिस्थितीचा समावेश होईल. यामध्ये कृष्णाने अर्जुनाला जनकाचे एक अतिशय आदर्श असे उदाहरण दिले आहे. नेत्यांना हे चांगले माहित असते की, त्यांचे अनुयायी त्यांचे वर्तन आणि विचारांना समाजामध्ये अतिशय प्रभावीपणे सांगत असतात. ते त्यांच्या प्रत्येक कार्याला आदर्श मानतात, हे आपण अनेक देशातील उदाहरणावरुन सांगू शकतो. देशाची पुनर्बांधणी ही शक्य आहे ती ही फक्त त्या देशातील नेत्याच्या एकात्मिकता ह्या गुणधर्मावर.

हे सर्व अभ्यासल्यानंतर लक्षात येते की, आपणापुढे कुणाचा तरी आदर्श असणे अत्यंत आवश्यक आहे. तो आदर्श की जो सर्वांना एकत्र काम करण्याची प्रेरणा देतो, उत्साही जीवन जगण्याचा मंत्र देतो, प्रत्येकामधील चांगल्या गुणांना वाव देतो आणि एकात्मता आणि ऐक्य वाढीस लागण्यासाठी अथक प्रयत्न करतो. नेत्याच्या प्रत्येक कृतीमधून ऐक्य आणि शांतता प्रस्थापित झाली पाहिजे. त्यातून खरी सेवा आणि त्याग दिसला पाहिजे. त्यातून प्रत्येकाला आपल्या वासनांवर विजय मिळविता आला पाहिजे. त्यातून आदर्श व्यक्तिमत्व आकाराला आले पाहिजे. येणाऱ्या पिढीला सर्व यश आणि सुख प्रदान करण्यासाठी अशाप्रकारे सर्वगुण संपन्न नेतृत्वाची आवश्यकता आहे जे की बदलत्या जगातील सर्व समस्या सहजरित्या सोडवू शकेल.